THE

JEWISH NEW YEAR'S DA

ראש השנה

वर्षप्रतिपदेची प्रार्थना.

THE

PRAYERS

OF THE

JEWISH NEW YEAR'S DAY:

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI·

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

BOMBAY.

PRINTED AT GUNPUT KRUSHNAJEE'S PRESS.

1862—5623

Price 1 *Rupee.*

ראש השנה

वर्षप्रतिपदेची प्रार्थना.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

व

इस्राएल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीचे चिटणीस

यांणीं

भाषांतर केलें.

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीनें

लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापिलें.

इ० स० १८६२

इस्राएली ५६२३

किम्मत १ रुपाया.

प्रस्तावना.

या ग्रंथांत ज्या प्रार्थनेचें भाषांतर केलें आहे, ती प्रार्थना तिशरी महिन्याच्या प्रतिपदेस करितात. तिशरी म्हणजे आश्वीन महिन्याची प्रतिपदा हीच इस्राएल लोकांची वर्षप्रतिपदा; कारण या दिवसापासून त्यांच्या राजकीय वर्षास आरंभ होतो. आणि नीसान म्हणजे चैत्र महिन्याच्या प्रतिपदेच्या दिवशीं त्यांच्या धर्मसंबंधी वर्षास आरंभ होतो. या प्रमाणे इस्राएल लोकांत दोन प्रकारचे शक चालतात. राजकीय शक पृथ्वीच्या उत्पत्तीपासून चालू आहे, आणि तो बहुदा शास्त्राखेरीज जीं पुस्तकें आहेत त्यांत सांपडतो; आणि धर्मसंबंधी शक इस्राएल लोकांच्या मिसरांतून निघण्यापासून चालू असून फार करून शास्त्रांतच सांपडतो.

राजकीय शकाच्या वर्षप्रतिपदेस, म्हणजे ज्या दिवशीं ही प्रार्थना करितात त्या दिवसास अनेक कारणा वरून "वर्षप्रतिपदा" "स्मरणाचा दिवस" "न्यायाचा दिवस" आणि "गजराचा दिवस" असीं निरनिराळीं नामें आहेत. वर्ष प्रतिपदा हें नाम यादिवसास कोणत्या कारणावरून दिल्हें आहे, हें मागे दर्शविलें आहे. जे ईश्वरी भक्त होऊन गेले त्यांची आणि विशेषें करून इसहाक जो ईश्वरी नामा करितां याच दिवशीं अर्पिला जाण्यास सिद्ध झाला, त्याची आठवण ईश्वरापुढें होऊन, त्याने त्याच्यां लेंकरांस जीवनाच्या पुस्तकांत ल्याहावें; म्हणून इस्राएल लोक यादिवशीं प्रार्थना करिताना त्यांच्या पुण्याचें स्मरण देतात, म्हणून या दिवसास "स्मरणाचा दिवस" असें नाम पडलें आहे. "न्यायाचा दिवस" हें नाम पडण्याचें कारण असें

कीं, या दिवशीं ईश्वर सर्वांचा न्याय करून प्रत्येक मनुष्याचें बरें किंवा वाईट होणें, हें या दिवशीं ठरवितो. आणि गणना २९.१. एथें या दिवसास "गजराचा दिवस" असें नाम दिल्हें आहे; आणि त्या दिवशीं शोफार म्हणजे करणा वाजवून गजर करावा असें सांगितलें आहे.

या नावांवरून व तीं पडण्याच्या कारणावरून हा दिवस किती भयंकर आहे हें लक्षांत येतें. या शिवाय हा दिवस पश्चात्तापाच्या दाहा दिवसांतील पहिला दिवस आहे; ह्मणून ही प्रार्थना करितेसमयीं सर्वांनी आपल्या पापांविषयीं पूर्ण पश्चात्ताप करून, ह्रदय फोडून, नम्र आत्म्याने व एक चित्ताने ही प्रार्थना केली पाहिजे. परंतु जी प्रार्थना समजत नाहीं, तिजकडे बहुदा लक्ष लागत नाहीं; यासाठीं ती समजली असतां, माझे प्रिय बंधु ही विनंती दयाळू व यथार्थ न्यायाधीशापुढें लक्ष लावून करितील व तो ती मान्यकरून त्या सर्वांस जीवनाच्या पुस्तकांत लिहील असी आशा करितों.

या ग्रंथाचें भाषांतर करिताना जे गूढ विषय सांपडले, त्यांजवर टीका केल्या आहेत; त्यांतील कांहीं पृष्ठाखालीं व कांहीं ग्रंथाच्या शेवटीं सांपडतील.

वर्षप्रतिपदेची प्रार्थना.

शाब्बाथ असल्यास एथून आरंभ करावा.

מזמור לדוד הבו לי׳ गीत. २९

במה מדליקין * (शाब्बाथ दिवशीं) दिवा कशाचा लावावा व कशाचा लावूं नये? एरेझ वृक्षा वरील शेवाळीचा, तयार न केलेले जवसाचा, रेशमाचा, लव्हाळ्याच्या वातीचा, रानांतील पानांच्या वातीचा, पाण्यावरील कफाचा, राळेचा, मेणाचा, कापसाच्या बोंडाचा, जळलेले तेलाचा, मेंढ्याच्या शेपटींतील चरबीचा, आणि चरबीचे मेणाचा दिवा लावूं नये. नाहूम हामादी म्हणतो, कढवलेले चरबीचा दिवा लावावा; परंतु ज्ञानी म्हणतात कीं, कढवलेली असो किंवा न कढवलेली असो, यद्यपि त्याने दिवा लावूं नये. सणाच्या दिवशीं जळलेले तेलाचा दिवा लावूं नये. रिब्बी इश्माएल म्हणतो शाब्बाथाच्या माहात्म्यामुळें राळेच्या गाळाचा दिवा लावूंनये. आणि ज्ञानी म्हणतात, कीं सर्व (जातीचें) तेल चालेल. तिळांचें तेल, अक्रुडांचें तेल मुळ्याचे बीजाचें तेल, माशाचें तेल, दुध्याच्या बीजाचें तेल, राळेचा गाळ, आणि नखतेल चालेल. रिब्बी तरफोन म्हणतो जाइताच्या तेला शिवाय दुसऱ्या कशाचाहि दिवा लावूं नये. जवस खेरीज करून जें सर्व झाडापासून उत्पन्न होतें, त्याचा दिवा लावूं नये; आणि जवसा खेरीज, जें सर्व झाडापासून उत्पन्न होतें तें राहुटीच्या विटाळास पात्र नाहीं.× कापडाची वळलेली

* टीका १.

× गणना १९.१४.

आणि न शेकावलेली वात, रिब्बी एलीएझेर म्हणतो, ती अशुद्ध आहे, आणि त्याचा दिवा लावूंनये; रिब्बी आकीबा म्हणतो ती शुद्ध आहे, आणि त्याचा दिवा लावावा. कोणी मनुष्याने अंड्यास भोंक पाडून, त्यांत तेल भरून तें गळावें म्हणून, अथवा जरी तें मातीचें भांडें असलें, तरी दिव्यावर ठेवूं नये. परंतु रिब्बी येहुदा त्याविषयीं मोकळीक देतो. यद्यपि जर घडणाराने पूर्वीपासून जोडलेले असलें, तर तें एकच पात्र आहे, म्हणून त्याविषयीं मोकळीक आहे. कोणी मनुष्याने थाळींत तेल भरून आणि दिव्याच्या बाजूस ठेवून वातीने तेल शोषून घ्यावें म्हणून, वातीचें टोंक त्या (थाळींत) घालूं नये; आणि रिब्बी येहुदा त्याविषयीं मोकळीक देतो. अन्य लोकांमुळें, चोरांमुळें, वाईट आत्म्यामुळें भिऊन, अथवा रोग्यास झोंप लागावी म्हणून जो दिवा विझवितो, तो दोषी नव्हे; परंतु जो दिव्याची, तेलाची किंवा वातीची कसर करून तसें करितो, तो दोषी आहे. रिब्बी योसे हा वात खेरीज करून सर्व गोष्टी निर्दोषी अशा ठरवितो, कारण (वात विझविणाराच्या हातून) कोळसा होतो. तीन उल्लंघनामुळें म्हणजे विटाळाविषयीं, उंड्याचें दान करण्याविषयीं, आणि शाब्बाथाचा दिवा लावण्याविषयीं न सांभाळल्यामुळें स्त्रिया प्रसवतेवेळीं मरण पावतात. मनुष्यानें शुक्रवारीं अंधार होताना तीन गोष्टींविषयीं विचारावें. दाहावा भाग निराळा केला काय ? खिचडी तयार केली काय ? दिवा लाविला काय? अंधार झाला किंवा न झाला याविषयीं संशय असल्यास ज्याचा दाहावा भाग न देण्याविषयीं खात्री असेल त्याचा दाहावा भाग काढूंनये; भांडीं धुवूंनये; आणि दिवे लावूंनये. परंतु ज्याचा दाहावा भाग देण्याविषयीं संशय असेल, त्याचा दाहावा भाग काढावा, खिचडी तयार करावी, आणि जेवण उष्ण राहावें म्हणून तें झांकून ठेवावें.

אמר רבי אלעזר रिब्बी एलआजार व रिब्बी

हानींना म्हणतात, कीं ज्ञानी विद्यार्थी जगांत शांति वाढवितात; जसें म्हटलें आहे कीं, आणि तुझीं सर्व लेंकरें परमेश्वराने शिकविलेलीं होतील; आणि तुझ्या लेंकरांचें अत्यंत कुशल होईल; तें वाक्य तुझीं लेंकरें असें वाचूं नको, परंतु तुझे बांधणारे असें वाच. तुझ्या कोटामध्यें कल्याण, तुझ्या राज वाड्यांत सुख होईल. मी आपल्या भावासाठीं व आपल्या मित्रासाठीं बोलेन, "तुझ्यामध्यें कल्याणच असो". आमचा देव परमेश्वर याच्या मंदिरासाठीं मी तुझें बरें पाहीन. आपल्या लेंकरांच्या लेंकरांसुद्धां इस्राएलावर समाधानहि पाहसील. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितात, त्यांचे फार कल्याण आहे; त्यांस कांहीं अडखळा नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देतो.

קדיש דרבנן

לכה דודי हे मियकरा ! चल आपण नवरीस* भेटायास जावूं; आणि शाब्बाथाचा आदर सत्कार करूं.

שמור וזכור तुम्ही सांभाळा आणि आठवण धरा, असें एकच जो देव, त्याने एकाच गोष्टीविषयीं + (सांगून) आम्हास ऐकविलें;परमेश्वर एकच व त्याचें नामहि एकच, आणि (त्याच्याच नामास) कीर्ति, महत्व, आणि स्तुति शोभते. לכה

לקראת שבת चला, आपण शाब्बाथास भेटायास जाऊं; कारण तो आशीर्वादाचा उगम आहे; तो पुरातन काळाच्या प्रारंभापासून स्थापला गेला; आणि जरी तो उत्पत्तीमध्यें शेवटला, तरी पहिल्याने योजलेला होता. לכה

* नवरी हें नाम एथें शाब्बाथास दिल्हें आहे.

+ अनुवाद ५·१२ एथें शाब्बाथाविषयीं सांभाळायास आणि निर्गम २०·८ एथें शाब्बाथाविषयीं आठवण धरायास सांगितलें आहे.

מקדש מלך हे राजाच्या पवित्र मंदिरा, अगे राजकीय नगरे, ऊठ आणि आपल्या नाशांतून बाहेर नीघ, शोकाच्या खिंडींत तूं फार दिवस राहिलीस, आतां त्यास तुझी काकळूत येऊन तो तुजवर दया करील. לכה

התנערי מעפר हे माझ्या लोका, ऊठ (आपणावरील) धूळ झाड, आणि आपल्या सुंदर पणाचीं वस्त्रें पांघर; कारण इशाय जो बेथलेहेमकर याच्या पुत्राच्या हाताकडून* तारण माझ्या जीवाजवळ येत आहे. לכה

התעוררי התעוררי तूं हर्षकर, हर्षकर; कारण तुझा दीपक येत आहे; ऊठ आणि प्रकाशीत हो; जागी हो, जागी हो आणि गायन कर; तुजवर देवाचें गौरव प्रकाशलें आहे. לכה

לא תבושי हे येरूशालेमे! तूं लज्जित होऊंनको व घाबरूंनको; तूं खिन्न कां होतीस व कां तळमळतीस ? तुजमध्यें माझ्या लोकांतील दरिद्री आश्रय पावतील, आणि तेंच नगर आपल्या नाशाच्या ठिकाणीं पुनः बांधलें जाईल. לכה

והיו למשסה तुझा नाश करणाऱ्यांचा नाश होईल, आणि तुला गिळणारे दूर घालविले जातील; जसा नवरा नवरी विषयीं आनंद मानितो, तसा तुझा देव तुजविषयीं हर्ष मानील. לכה

ימין ושמאל तूं उजव्याकडे व डाव्याकडे विस्तारिली जाशील व परमेश्वराचा सन्मान राखशील; आणि पेरेसाच्या+ कुळांतील एका मनुष्यामुळें आम्ही आनंद व उल्हास करूं. לכה

בואי בשלום अगे आपल्या नवऱ्याचा मुगुट अ-

---

* इशाय जो दावीदाचा बाप याच्या कुळांत जन्मलेले माशीयाहकडून.

+ पेरेस जो दावीदाचा पूर्वज होता त्याचे कुळांत जन्मलेले मशीयाहमुळें. रूथ ४.१८.

सणारे, शांतीने, आनंदानें, हर्षाने व उल्हासाने सन्य व प्रिय लोकांमध्यें ये. अगे नवरे ये ! अगे नवरे ये ! לכה

גीत ९२ מזמור שיר ליום השבת

גीत ९३ יי מלך

शाब्बाथ नसल्यास कोणी पहिल्याने एथून आरंभ करितात, परंतु पहिल्याने אחות קטנה बोलतात.

गीत ८१ למנצח על הגתית לאסף

אחות קטנה (हे परमेश्वरा,) धाकटी बहीण+आपली प्रार्थना सिद्ध करून स्तुति करीत आहे; हे देवा, मी विनंती करितों कीं, तिचे रोग तूं बरे कर.

תכלה שנה वर्ष संपलें आहे; आणि त्यांतील शापहि (संपोत)

בנועם מלים मधुर शब्दें करून, आणि जें गायन व जी स्तुति तुलाच शोभते, त्यांकडून ती तुला हाक मारिते; आणि परके तिचें वतन खात आहेत, असें पाहत असतांहि, कोठपर्यंत तूं आपली दृष्टी लपविशील ! תכלה שנה

רעה את צאנך सिंहाने विखरलेल्या तुझ्या शेरडांस तूं चार; आणि (पवित्र नगर) मोडून टांका, असें म्हणणाऱ्यांवर तूं आपला राग ओत; कारण तुझ्या उजव्या हाताने लावलेला मळा त्यांनी लुचाडला व नाशिला आहे. ते तिचीं तान्हींहि राहूं देत नाहींत. תכלה שנה

(הקם משפלות तिला नीचत्वांतून राज्याधिकारास चढीव, कारण प्रवासरूप खांचेंत तिचा जीव बुडत आहे, दुष्टाईच्या महत्वामुळें तिचा जीव ओतून (निघून) जातो, आणि अ-

+ शलोमोनाचे गीत ८.८ एथें हें नाव इस्राएल लोकांस दिल्हें आहे.

ति दरिद्रावस्थेंत ती राहत आहे.) תכלה שנה

מתי תעלה तूं आपल्या कन्येला खाचेंतून केव्हां वर चढविशील? बंदिशाळेचें जोकड केव्हां मोडशील? आणि चमत्कार करून तिचा नाश करणाऱ्यांस भस्म करायास व त्यांचा विध्वंस करायास शूराप्रमाणें तूं केव्हां निघशील? תכלה שנה

חילה קבעו अन्य राष्ट्राने तिची संपत्ति हिराहून घेतली, त्यांनी तिच्या उत्तम वस्तू कडून आपणास तृप्त करून घेतलें, आणि तिच्या लुटींतून प्रत्येकाने आपला वांटा घेतला आहे; हें सर्व करून त्यांनी तिचें मन फाडलें असतांहि, तिने आपला मार्ग तुजकडून वळविला नाहीं. תכלה שנה

זמירת שבת जरी तिचें गाणें बंद झालें आहे, तरी ती आपल्या प्रियकराच्या जवळ जाण्याची आवड करिते; तिने आपल्या लग्नांतील प्रीति (पुनः) शोधावी; म्हणून तूं तिच्या जिवास झालेले कष्ट तिच्या मनांतून काढून टाक. תכלה שנה

נחה בנחת शांततेच्या ठिकाणीं तिला हळूहळू ने. कारण पुष्कळ दिवसांपासून ती आपल्या आवडत्या प्रियकरापासून दूर केलेली आहे; आणि जरी अद्याप तिचें फूल पूर्ण वाढलें नाहीं; तरी तिला कळ्या आल्या आहेत (जरी तिचें तारण झालें नाहीं, तरी त्याची तिला आशा लागली आहे.) תכלה שנה

חזקו וגילו तुम्ही धैर्य धरा आणि हर्ष करा, कारण जुलूम बंद झाला आहे; ज्या खडकरूप आश्रयाने तुम्हाबरोबर केलेला करार सांभाळला, त्याची आवड धरा; म्हणजे सडक बांधा, सडक बांधा, असें म्हटल्याप्रमाणें तुम्ही सियोनेस चढून जाल; आशीर्वादांसहित वर्षास आरंभ होवो.

दुसऱ्यादिवशीं वरील गीता बद्दल हें गीत बोलावें.

חון תחון तुजकडे परतणाऱ्या तुझ्या पुत्रांवर तूं दया करच कर, ते भयाने तुजपुढें उभे आहेत; ज्यावेळीं ते न्यायांत

बोलाविले (उभे केले) जातील, त्यांविषयीं त्यांस भय वाटतें, कारण त्यामुळें (त्यांवर) दुःखें आलीं आहेत.

तुला भीणाऱ्यांसाठी व तुझ्या नामाविषयीं विचार करणाऱ्यांसाठी न्यायाच्या दिवशीं तूं दया आठीव, आणि निवाडा करण्याच्यासमयीं आपला राग व क्रोध मोड (सोड); तेहि-एकवेळ न्यायांत बसणारे* (न्याय करणारे होते.)

(हे देवा) माझ्या मुक्तीचें वर्ष जवळ आणून मला खंडून घे, स्थिरपाण्यावर मला ने, आणि मजकरितां सरळ पुरुषाच्या (याकोबाच्या) पुण्याची आठवण कर; मला तुझ्या मनावर मोहोरीप्रमाणें करून ठेव.

מלך אלהים राष्ट्रांवर देव राजा आहे, देव आपल्या पवित्र सिंहासनावर बसला आहे. अन्य जातींतील कुळीन आब्राहामाच्या देवाच्या लोकांकडे मिळाले, कांकीं पृथ्वींतल्या ढाली देवाच्या; तो फार वरिष्ठ आहे. परमेश्वर सर्व काळ राज्य करितो. हे सीयोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचावलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत आणि सर्व इस्राएलांच्या घराण्यांच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन, त्याचें तारण उगवो आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु; त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति, व जी सिद्धि जगांत

---

* न्यायांत बसणारे यांच्या מדין या इब्री शब्दाच्या मतभेदा विषयीं " पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना " या पुस्तकाच्या आरंभीं सूचना आहे त्यांत पाहावें.

गाजविली जाते, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त उंचावलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुह्मी धन्य ह्मणा.

हाज्जान वरील वाक्य बोलत असतां मंडळीने हें हळू बोलावें.

ישתבח ויתפאר राजा, राजांच्या राजा आणि पवित्र व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें आणि गौरविलें जावो. पहिला तोच व शेवटलाहि तोच आणि त्यावांचून कोणी देव नाहीं. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुति व प्रशंसेपेक्षां अधिक उंचावलेलें असो.

मग मंडळीनें मोठ्यानें हें ह्मणावें.

ברוך יי המבורך सुवंदित परमेश्वर सदां-सर्वकाळ धन्य असो.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या शब्देंकरून संध्याकाळ करणाऱ्या ज्ञानाने (आकाशाचीं) द्वारें उघडणाऱ्या, बुद्धीनें ऋतूंस पालटणाऱ्या, वेळ फिरविणाऱ्या, आपल्या इच्छेप्रमाणे ताऱ्यांस आकाशामध्यें त्यांच्या मार्गानें चालविणाऱ्या, दिवस व रात्र उत्पन्न करणाऱ्या, काळोखापुढून उजेड आणि उजेडापुढून काळोख हटविणाऱ्या, दिवस घालवून रात्र आणणाऱ्या, आणि दिवस व रात्र यांमध्यें भेद राखणाऱ्या, तूं धन्य आहेस. ज्याचें नाम सैन्याचा परमेश्वर तो तूंच. हे परमेश्वरा, संध्याकाळ करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אהבת עולם त्वां आपला लोक इस्राएल याच्या घराण्यावर अखंड ममतेने दया केली आहेस. त्वां आह्मास शास्त्र, विधि, नियम व न्याय शिकविले आहेस. यास्तव हे प-

रमेश्वरा, आमच्या देवा, निजतांना व उठतांना आह्मी तुझ्या नियमाचें ध्यान करूं. आणि तुझ्या शास्त्रांतील, विधींतील आणि नियमांतील बोधक गोष्टींविषयीं सर्वकाळ आनंद व उल्हास मानूं; कारण त्या आमचें जीवन व आमच्या आयुष्याचें दीर्घत्व आहेत; त्यांविषयी रात्रंदिवस आह्मी मनन करूं. आणि तूं आपली दया व कृपा आह्मावरुन कधींहि काढूंनको. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांवर प्रीति करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे.

हें वाक्य हळू बोलावें.

ברוך שם त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

ואהבת את יי तर तूं आपल्या सर्व अंतःकरणाने व आपल्या सर्व जिवाने व आपल्या सर्व शक्तीने आपला देव परमेश्वर यावर प्रीति कर. आणि मी आज तुला ज्या गोष्टी आज्ञेने सांगतों, त्या तुझ्या ह्रदयांत असाव्या. आणि तूं आपल्या लेंकरांजवळ ह्या पुनः पुनः सांग; आणि आपल्या घरीं बसतांना आणि वाटेवर चालतांना, आणि निजतांना आणि उठतांना यांविषयीं बोलत जा. आणि तूं ह्या आपल्या हातासीं खुणेसाठीं बांध, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळभूषण अशा असूं दे. आणि आपल्या घराच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिही.

והיה אם שמוע आणि ज्या आज्ञा मी आज तुम्हास लावून देतों, त्या जर तुम्ही ऐकालच ऐकाल, म्हणजे आपल्या सर्व ह्रदयाने व आपल्या सर्व जिवाने आपला देव परमेश्वर यावर प्रीति कराल, आणि त्याची सेवा कराल. तर असें होईल कीं, मी यथाकाळीं तुमच्या देशाचा पाऊस पहिली व मा-

गली वृष्टि पाडीन; अशाने तूं आपलें धान्य व आपला ताजा द्राक्षरस व आपलें तेल यांचा संग्रह करसील. आणि मी तुझ्या पशूसाठीं तुझ्या कुरणांत गवत वाढवून देईन; असा तूं खाऊन तृप्त होसील. तुम्ही आपणाविषयीं सांभाळा, नाहीं तर तुमचें ह्रदय फसेल; आणि तुम्ही वळून दुसऱ्या देवांची सेवा कराल व त्यांचें भजन कराल. मग परमेश्वर तुम्हावर रागें भरेल. आणि तो आकाशाला असें बंद करील कीं पाऊस होणार नाहीं, भूमिहि आपलें उत्पन्न देणार नाहीं; आणि जो चांगला देश परमेश्वर तुम्हास देतो, त्यांतून तुम्ही लवकर नाहींसे व्हाल. तर तुम्ही ह्या गोष्टी आपल्या ह्रदयांत व आपल्या जिवांत ठेवा, आणि आपल्या हातासीं खुणेसाठीं त्या बांधा, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळ भूषण अशा असूं द्या. आणि तुम्ही आपल्या लेंकरांस त्या शिकवा; म्हणजे जेव्हां तूं आपल्या घरीं बसतोस, आणि जेव्हां वाटेने चालतोस आणि जेव्हां निजतोस, आणि जेव्हां उठतोस, तेव्हां त्यांविषयीं बोलत जा. आणि आपल्या घरांच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिही. ह्मणजे जी भूमि परमेश्वराने तुमच्या पूर्वजांजवळ शपथ वाहून त्यांस देऊं केली, तिजवर तुमचे दिवस व तुमच्या लेंकरांचे दिवस पुष्कळ होतील; जसे पृथ्वीवर आकाशाचे दिवस तसे.

" ויאמר " आणि परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें कीं, तूं इस्राएलाच्या संतानाजवळ बोलून त्यांस सांग कीं, त्यांनीं आपल्या पिढी परंपरा आपल्यासाठीं आपल्या वस्त्रांच्या कांठांस झालर लावावी, आणि कांठाच्या झालरीस निळा नाडा लावावा. ती झालर तर तुम्हास असी व्हावी कीं, तुम्ही ती पाहून परमेश्वराच्या सर्व आज्ञा आठवाव्या आणि त्याप्रमाणे आचरण करावें, असें कीं ज्यास अनुसरून तुम्ही व्यभिचारी झालां,

म्हणजे आपलें ह्रदय व आपली दृष्टि त्याच्या मार्गे जाऊंनये. यासाठीं कीं तुम्ही माझ्या सर्व आज्ञा आठवून पाळाव्या, आणि आपल्या देवासाठीं पवित्र व्हावें. मी परमेश्वर तुमचा देव; ज्याने तुमचा देव असा होण्यासाठीं तुम्हास मिसर देशांतून आणिलें तोच मी परमेश्वर तुमचा देव आहें.

אלהכם אמת ״ परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

אמת ויאמונה हें सर्व सत्य, निःसंशय, आणि आम्हामध्यें स्थापित आहे कीं, तोच आमचा परमेश्वर देव आहे; त्याशिवाय दुसरा कोणी नाहीं; आणि आम्ही इस्राएल त्याचे लोक आहों. आमच्या तारकानें राजांच्या हातांतून आम्हास खंडून काढलें; आमच्या राजानें बलात्काऱ्यांच्या पंज्यांतून आम्हास सोडिवलें. त्याच देवानें आम्हासाठीं आमच्या वैऱ्यांचा सूड घेतला, आणि आमच्या जिवाच्या सर्व शत्रूंस योग्य दंड केला. तो आमचा प्राण वाचवितो, आणि आमचे पाय सरकूं देत नाहीं. त्यानें आम्हास आमच्या शत्रूंच्या उंच स्थानावरून चालविलें, आणि आमच्या सर्व द्वेष्ट्यांवर आमचें शिंग उभारिलें. त्याच देवानें हामाच्या वंशाच्या देशांत चमत्कार व आश्चर्य कर्मे करून आम्हासाठीं फारोचा सूड उगविला. त्यानेंच आपल्या रागानें मिसरांतील सर्व जेष्ठ पुत्र मारून आपल्या इस्राएल लोकांस निरंतरच्या मोकळीकीकरितां त्यांमधून काढिलें. त्यानें आपल्या लेंकरांस सूफ समुद्राच्या विभागांमधून चालऊन त्यांचा पाठलाग व द्वेष करणारांस डोहांत बुडविलें. त्याच्या लेंकरांनीं (असा) त्याचा पराक्रम पाहून त्याच्या नामाचें कीर्त्तन व स्तवन केलें, आणि स्वइच्छेनें त्याचें राज्य आपणावर मान्य केलें. मोशे व इस्राएलांच्या लेंकरांनीं मोठ्या आनंदानें गायन करून एकदांच म्हणाले, हे परमेश्वरा देवांमध्यें तुझ्यासारिखा कोण! पवित्रतेनें महान, स्तवण्याविषयीं भयमान,

चमत्कार कर्त्ता असा तुजसारिखा कोण आहे ! हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सर्व लेंकरांनी समुद्र (तिरीं) तुझी राजसत्ता पाहिल्यावरून तुझी स्तुति केली, आणि तुझें राज्य आपणावर मान्य करून म्हणाले, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणि असें म्हटलें आहे कीं, परमेश्वराने याकोब उद्धारिला आहे, आणि त्यापेक्षां जो बलवान होता त्याच्या हातांतून त्यास सोडविलें आहे. हे परमेश्वरा, इस्राएलाच्या उद्धारका, तूं धन्य आहेस.

השכיבנו אבינו हे आमच्या बापा, आम्हास शांतीने झोंप लागूं दे; आणि हे आमच्या राजा, चांगल्या जीवनाने व शांतीने आम्हास उठीव. हे आमच्या राजा, तूं आपला सुखाचा मंडप आम्हावर पसरून आपल्या सुबोधाने आम्हास सुधार; तूं आपल्या नामास्तव लौकर आमचें तारण व संरक्षण कर; आणि आपला दयेचा व सुखाचा मंडप आम्हावर पसर. हे परमेश्वरा ! आम्हावर, आपल्या सर्व इस्राएल लोकांवर, आणि येरुशालेमावर आपला सुखाचा मंडप पसरणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शाब्बाथ असल्यास हेंहि बोलावें.

ושמרו בני ישראל आणि शाब्बाथ पाळायास इस्राएलाच्या संतानानी त्यांच्या पिढ्यानपिढीं शाब्बाथाला सर्वकाळ करारप्रमाणें मानावें. माझ्या व इस्राएलाच्या संतानांमध्यें ती सर्वकाळ पर्यंत खूण, कारण कीं साहा दिवसांत परमेश्वराने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली, आणि सातव्या दिवशीं स्वस्थ राहून विसांवा घेतला.

शाब्बाथ नसल्यास मात्र हें बोलावें.

וביום שמחתכם आणि तुम्ही आपल्या हर्षाच्या दिवसांत व आपल्या सनांत व आपल्या महिन्यांच्या प्रारंभीं व आपल्या होमांजवळ, व आपल्या शांतिकारक यज्ञाजवळ करणे

वाजवा; म्हणजे ते तुमच्या देवाच्या लक्षांत तुम्हांविषयीं सूचक असे होतील; मी परमेश्वर तुमचा देव आहें.

קדיש לעילה पृष्ठ. ७

हें उभें राहून हळू व एक चित्तानें बोलावें.

אדני שפתי हे प्रभू, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा, मोठ्या, पराक्रमी, भयंकर व परात्पर देवा, कृपा दानें देणाऱ्या, सर्व पदार्थांच्या धनी, पूर्वजांच्या यथार्थतेची आठवण करणाऱ्या, आणि दयेकरून आपल्या नामाकरितां उद्धारक पाठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

זכרנו לחיים हे जीवनांत आनंद मानणाऱ्या देव राजा! जीवनाकरितां आमची आठवण कर; हे जीवनाच्या देवा तूं आपणाकरितां आम्हास जीवनाच्या पुस्तकांत लिही. हे, जीवंत देवा, तूं राजा, सहायकर्त्ता, तारक व (आम्हावर) ढालरूप असणारा आहेस. हे परमेश्वरा, आब्राहामाच्या ढालरूप (आश्रया), तूं धन्य आहेस.

אתה גבור हे प्रभू, तूं सर्वकाळ पराक्रमी आहेस! मेलेल्यांस जीवंत करणारा, तारायास समर्थ, दहिंवर पाडणारा, कृपेनें प्राणीमात्रांचें पोषण करणारा, बहुत दयेनें मेलेल्यांस जीवंत करणारा, पडलेल्यांस आश्रय देणारा, रोग्यास निरोगी करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, आणि धुळींत निजलेल्यांबरोबर आपली सत्यता स्थापन करणारा, तूंच आहेस. हे अद्भुत कृत्यें करणाऱ्या, तुजसारिखा कोण! आणि हे राजा, मारणाऱ्या, जी-

वंत करणाऱ्या व तारण उगीवणाऱ्या, तुझी बरोबरी कोण करूं शकेल!

מי כמוך हे दयाळू बापा, दयेने प्राणीमात्रांची जीवना करितां आठवण करणाऱ्या, तुजसारिखा कोण आहे! आणि मेलेल्यांस जीवंत करणारा तूं सत्य आहेस. हे परमेश्वरा, मेलेल्यांस जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पाहटेची प्रार्थना (शाहरीथ) आणि प्रार्थना रूप नैवेद्य (मिनहा) यांमध्यें मात्र मोठ्याने बोलतांना हें बोलावें.

נקדיש जसी पवित्र सेराफीमाची मंडळी, जें तुझ्या भविष्य वाद्याच्या हाताकडून लिहिलें आहे कीं, ते एकमेकाला मोठ्यानें बोलत म्हणाले "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे;" याप्रमाणे तीन वेळ तुझी पवित्रता गाजविते, त्याप्रमाणे आम्ही तुला पवित्र मानूं आणि तुझें भय धरूं. त्यांच्या समोर जे असतात, ते स्तुति करून असें म्हणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. आणि तुझ्या पवित्र वचनामध्यें असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सीयोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

אתה קדוש तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे; आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात.

לדור ודור पिढोपिढीं तुम्ही देवाचें राज्य मान्य करा; कारण तो एकटाच महान व पवित्र आहे.

ובכן יתקדש यास्तव हे परमेश्वरा! आमच्या देवा, तुझ्या इस्राएल लोकांमध्ये तुझें नाम पवित्र मानिलें जावो.

ובכן תן פחדך यास्तव हे परमेश्वरा! आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कामावर आपलें भय, जें सर्व त्वां उत्पन्न केलें आहेस त्यावर आपला त्रास घाल, म्हणजे सर्व कृत्यें तुला भि-

तील आणि सृष्टींतील सर्व पदार्थ तुजपुढें नमन करितील; आणि पूर्ण मनानें तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां ते एक मेळा करितील. कारण आम्ही जाणतों कीं, राज्य तुलाच (शोभतें); सामर्थ्य तुझ्या हातीं, व पराक्रम तुझ्या उजव्या हातीं आहे; आणि सर्व उत्पन्न केलेले पदार्थांस तुझें नाम भयंकर आहे.

ובכן תן כבוד यास्तव लवकर व आमच्या आयुष्याच्या दिवसांत तूं आपल्या लोकांस मोठेपणा दे; आपल्या भिणाऱ्यांची प्रशंसा कर, आपल्या शोधणाऱ्यांस चांगली आशा व आपली वाट पाहाऱ्यांस भरंवसा दे, आपल्या देशास आनंदित कर; आपल्या नगरास हर्षित कर, आपला सेवक दावीद याचें शिंग उगीव (उभार) आणि इशायाचा पुत्र माशीयाह याचा दिवा सिद्ध (प्रकाशित) कर.

ובכן צדיקים यामुळें पुण्यवान पाहून आनंद करितील, यथार्थ हर्ष करितील, आणि धार्मिक उल्हासानें गातील; परंतु पापाचें तोंड बंद होईल, दुष्टाई धुराप्रमाणे नाहींसी होईल; कारण दुष्कर्माचा अधिकार तूं पृथ्वींतून काढून टाकिशील.

ותמלוך אתה मग हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कृत्यांवर सियोन डोंगर जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान आणि यरूशालेम जें तुझें पवित्र नगर, त्यांमध्यें लवकरच राज्य करिशील. तुझ्या पवित्र वचनांतहि तसेंच लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

קדוש אתה तूं पवित्र आहेस, आणि तुझें नामहि भयंकर आहे, आणि तुजवाचून दुसरा कोणी देव नाहीं; आणि लिहिलेंहि तसेंच आहे कीं, सैन्याच्या परमेश्वर नीतीनें उंचावेल, आणि देव जो पवित्र त्याला न्यायानें पवित्र मानितील. हे परमेश्वरा पवित्र राजा, तूं धन्य आहेस !

אתה בחרתנו त्वां आम्हास सर्व लोकांतून निवडून घेतलें, आम्हावर प्रीति करून व आम्हास प्रसन्न होऊन सर्व भाष्यांपेक्षां (जातींपेक्षां) आम्हास उंचाविलें; आपल्या आज्ञा कडून आम्हास पवित्र केलें, हे आमच्या राजा, आपली सेवा करण्याकरितां आम्हास जवळ घेतले, आणि तुझें मोठें व पवित्र नाम आम्हास दिल्हें आहे.

शनवार संध्याकाळ असल्यास हें बोलावें.

ותודיענו हे परमेश्वरा, आमच्या देवा, त्वां आपले यथार्थ न्याय आम्हास समजाविले; तुझ्या इच्छेचे नियमाप्रमाणे वर्त्तायास त्वां आम्हांस शिकविलें; प्रीतीनें त्वां आपले सरळ न्याय, सत्य शास्त्र, व चांगले नियम व आज्ञा आम्हास दिल्ह्या; त्वां आम्हास (नेमलेले) हर्षयुक्त वेळ, पवित्र सण, व स्वसंतोषाच्या पर्वणी, यांचें वतन दिल्हें; शाब्बाथाची पवित्रता, सणाचे महात्म्य व पर्वणीचा समारंभ यांचे आम्हास धनी केले; आणि त्वां शाब्बाथाच्या पवित्रते मध्यें व (सणाच्या) सुदिनाच्या पवित्रतेमध्यें भेद केला; काम करायाच्या साहा दिवसांपासून सातव्या दिवसास पवित्र राखिलें; आणि आपल्या पवित्रते कडून आपले लोक इस्राएल यांसहि पवित्र व निराळें केलें आहे.

ותתן לנו आणि हे परमेश्वरा, प्रीति भावेंकरून तूं आम्हास (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाची दिवस, हा पवित्र मेळामिळण्याचा सुदिन; गजराचा दिवस (शाब्बाथ असल्यास गजर आठविण्याचा दिवस) जो मिसरांतून निघण्याच्या आठवणीकरितां प्रीतिरूप पवित्र मेळा तो, दिल्हा आहेस.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या

यरूशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो माशीयाह त्याची, आणि तुझे सर्व लोक इस्राएलांचें घराणें, यांची आठवण या (शाब्बाथ असल्यास शाब्बाथ दिवशीं व) या स्मरणाच्या दिवशीं, या पवित्र मेळामिळण्याच्या सुदिनी, यशस्वी तारणाकरितां कृपेने, दयेने व ममतेने तुजपुढें चढो, येवो, पोंहोचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो, लक्षांत आणिली आणि आठविली जावो. आम्हावर दया करण्यास व आमचें तारण करण्यास; हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचे कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर; आम्हावर आशीर्वाद होण्याकरितां आम्हास दर्शन दे; आम्हास चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनाने आम्हास राख, आम्हावर कृपा कर, आमची करुणा येऊंदे, आम्हावर दया कर आणि आम्हास तार, कारण तूंच दयाळू व कृपाळू देवराजा आहेस; म्हणून आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, सर्व जगावर तूं आपल्या गौरवाने राज्य कर; आपल्या वैभवाने सर्व पृथ्वीवर थोर मानिला जा; आणि आपल्या सामर्थ्याच्या महत्त्वाने भूमंडळाच्या, राहाणाऱ्यांवर प्रकाशीत हो; मग सर्व उत्पन्न केलेले (पदार्थ) जाणतील, कीं त्वां त्यांस उत्पन्न केलें; सर्व घडविलेले (पदार्थ) जाणतील, कीं त्वां त्यांस घडिलें; आणि ज्यांच्या नाकपुड्यांत श्वास आहे, ते म्हणतील कीं, इस्राएलांचा परमेश्वर देव राज्य करितो; आणि त्याचा अधिकार सर्वांवर चालतो.

קדשנו במצותיך तूं आपल्या आज्ञांकडून आम्हास पवित्र कर; तुझें शास्त्र आमचें वतन होऊंदे; आपल्या चांगुलपणाकडून आम्हास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा

जीव आनंदित कर; तुझी सेवा सत्याने करायास आमचीं मनें शुद्ध कर; कारण तूं (स्वतां) सत्य परमेश्वर देव आहेस; आणि हे आमच्या राजा, तुझें वचन सर्वकाळ सत्य व स्थापित आहे. हे परमेश्वरा, सर्व पृथ्वीच्या राजा, (शाब्बाथ असल्यास शाब्बाथास व) इस्राएलांस व या स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

רצה יי אלהינו हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो; त्यांची प्रार्थना मनावर घे; आपल्या घराच्या प्रसाद स्थानी पूजन पुनः चालू कर; इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर आवडीनें मान्यकर; आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला आवडो.

ותחזינה עינינו ברחמך तूं आपल्या बहुत दयेने आम्हाविषयीं संतोषित होऊन आम्हास प्रसन्न हो; मग आमचे डोळे, तुला कृपेकरून सियोनेकडे फिरताना पाहतील. हे परमेश्वरा ! आपला शेखीना* सियोनेमध्यें पुनः स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מודים אנחנו לך

सदांसर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव जो तूं, तुलाच आम्ही स्तवितों.÷ तूं आमचा व आमच्या जीवांचा खडकरूप आश्रय, व आमच्या तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या

מודים דרבנן

सदासर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव, सर्व मासमयांचा देव, आमचा व प्रारंभीं (पृथ्वीचा) घडणारा जो तूं, तुलाच आम्ही स्तवितों. त्वां आम्हास जीवंत राखिलें व आम्हास रक्षिलें,

* साक्षात्कार.

÷ स्तवितों याच्या इथे **מודים** शब्दाचा अर्थ कोणी अधिकार मान्य करितों असाहि करितात;

हातीं सोंपिलेला आहे, आमचा आत्मा तुझ्या स्वाधीन आहे; तुझे चमत्कार आम्हामध्यें नित्य केले जातात, आणि तुझी आश्चर्य कृत्यें व तुझा चांगुलपणा आम्ही संध्याकाळीं, सकाळीं व दोन प्रहरीं अनुभवितों; त्यांकरितां आम्ही पिढीपिढीं तुझें कीर्त्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया (आम्हावरून) नाहींसी होत नाहीं.; तूं कृपाळू, कारण सर्व काळ आम्ही तुजवर आशा ठेवितों, म्हणून तुझी कृपा आम्हावरून सरत नाहीं.

म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या व पवित्र नामास धन्य म्हणतों व (त्याचें) स्तवन करितों. आणि आम्ही तुझे नियम पाळावे, तुझी इच्छा पूर्ण करावी, आणि पूर्ण मनानें तुझी सेवा करावी, म्हणून (आम्ही विनंती करितों कीं) त्याचप्रमाणें आम्हास जीवंत राख, आम्हावर दया कर, आणि आपल्या मंदिरीं आमच्या पाडाव करून नेलेल्यांस एकवट कर; कीं यावरून, हे सुवंदित व धन्य देवा आम्ही तुझी स्तुति करावी.

ועל כלם יתברך हे आमच्या राजा, या सर्व (दयेवरून) तुझें नाम अखंडित व सर्वकाळ धन्य म्हटलें, उंचावलें व वर्णिलें जावो. आणि सर्व प्राणी तुझे स्तवन करोत. सेलाह. तूं आपल्या कराराच्या लेंकरांस चांगल्या जीवनाकरितां लिही.

ויהללו ויברכו मग हे आमच्या तारणाच्या व सहायकारी देवा, आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास सत्यतेनें स्तवितील; आणि धन्य म्हणतील. कारण तें चांगलें आहे. सेलाह. हे परमेश्वरा ! तूं धन्य आहेस, चांगलें तुझें नाम आणि स्तवन तुलाच शोभतें.

पांढ़टेच्या प्रार्थनेमध्यें मात्र हें बोलावें,

אלהנו ואלהי אבותנו हे आमच्या देवा, आमच्या पूर्वजांचा देवा, जो तिप्पट आशीर्वाद, तुझा सेवक मोशे याच्या हाताकडून शास्त्रांत लिहिला आहे, आणि जो आहारोन व तुझे पवित्र लोक त्याचे पुत्र, हे उच्चारीत असत, कीं "परमेश्वराने तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वराने आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वराने आपली दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें. तसें त्यानी माझें नाव इस्राएलाच्या संतानावर लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन"; तो आशीर्वाद तूं आह्मास दे.

שים שלום (हे परमेश्वरा,) आह्मावर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर चांगलें, आशीर्वाद, जीवन, दया, कृपा, यथार्थता व ममता असूं दे; आणि हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मां सर्वांस एकमेळीं आशीर्वाद दे; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मास शास्त्र व जीवन, भीति व दया, यथार्थता व कृपा, आशीर्वाद व शांति दिल्ही आहेस. आणि आह्मास व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा सामर्थ्यरूप व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें असो.

पांढ़टेच्या प्रार्थनेमध्यें व प्रार्थनारूप नैवेद्यामध्यें मोठ्यानें बोलतांनां हें बोलावें.

ואתם הדבקים आणि जे तुह्मी तुमचा परमेश्वर याला लगटून राहिलां, ते तुह्मी सर्व आजपर्यंत जीवंत आहां (असें आह्माविषयीं ह्मटलें आहे, त्याप्रमाणें;) आज तूं आह्मास सदृढ कर. आज आह्मास आशीर्वाद दे, आज आह्मास मोठे कर, आज आमचा झेंडा उभार, आज आह्मास गौरवयुक्त कर, आज आह्मास चांगल्या मंडळीमध्यें मिळीव, आज आह्मास दृढ कर, आज आह्मास जीवदान दे, आज आह्मावर दया कर,

आज आह्मास आमच्या पापापासून शुद्ध कर, आज आमचे मार्ग निटाव, आज आह्मास कीर्तीनें मुगुट मंडित कर, आज आह्मास ज्ञानी कर, आज आह्मास सोडीव, आज आह्मास उंचाव, आज आमचें सहाय कर, आज आह्मास शुशोभित कर, आज जीवनाकरितां आम्हास दर्शन दे, आज आह्मास यथार्थ कर, आज आह्मास तुझी सेवा करायास जवळ घे, आज आह्मावर दया कर, आज आमची प्रार्थना ऐक, (आज आह्मावर दया, कृपा व ममता कर,) आज आह्मास चांगल्या जीवनाकरितां लिही.

ובספר חיים आणि आम्ही व तुझे सर्व इस्राएल लोक हे चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जीवनाच्या, आशीर्वादाच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्नसामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होऊन लिहिले जावोत.

ברוך אתה हे परमेश्वरा; आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

मोठ्यानें बोलतांना मात्र एथपर्यंत बोलावें.

יהיו לרצון हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझ्या ऱ्हदयांतलें ध्यान मान्य होवो.

मोठ्यानें म्हणतांना हें बोलूं नये.

אלהי נצור हे माझ्या देवा, माझी जीभ वाईटापासून, आणि माझे ओंठ कपटी भाषणापासून राख. हे माझ्या जीवा, जे कोणी मला शाप देतात, त्यांविषयीं तूं मौन्य धर. आणि माझा जीव सर्वांपुढें धुळी प्रमाणे (नम्र) होवो. माझ्या जीवानें तुझ्या आज्ञांप्रमाणे चालावें, म्हणून माझे मन तूं आपल्या शास्त्राकडे उघड (लाव), आणि जे कोणी माझ्या वाईटावर उठतात त्यांचे विचार लवकर मोडून त्यांचा कुकल्पनाचा नाश कर;

असें तूं आपल्या नावाकरितां, आपल्या उजव्या हाताकरितां (पराक्रमाकरितां), आपल्या शास्त्राकरितां, आपल्या पवित्रते करितां तसें कर. तुझा मियमुक्त व्हावा; म्हणून तूं आपल्या-उजव्या हाताने मला तार व मला उत्तर दे. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, व माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या हृदयांतील ध्यान मान्य होवो.

עושה שלום जो उंच (आकाशांत) शांति राखितो, तो दयेने आम्हास व सर्व इस्राएल लोकांस शांति देवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

शनवार असल्यास हें बोलावें

ויכלו השמים तसें आकाश व पृथ्वी व त्यांतील सर्व समुदाय, हीं समाप्त झालीं. मग देवाने आपलें जें काम केलें होतें त्यापासून तो सातव्या दिवशीं थांबला; आणि आपलें सर्व जें काम केलें होतें त्यापासून सातव्या दिवशीं स्वस्थ राहिला. आणि देवाने सातव्या दिवसाला आशीर्वाद दिल्हा आणि त्याला पवित्र केलें, कारण कीं त्यांत आपलें जें उत्पत्तीचें काम त्यापासून स्वस्थ राहिला.

ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहामाच्या देवा, इसहाकाच्या देवा व याकोबाच्या देवा, मोठ्या, पराक्रमी व भयंकर देवा, परात्पर देवा, दयेने आकाश व पृथ्वी यांवर धनीपणा चालविणाऱ्या, तूं धन्य आहेस. तो आमच्या पूर्वजांची ढाल, आपल्या आज्ञेकडून मेलेल्यांस सजीव करणारा, ज्यासारिखा दुसरा नाहीं असा पवित्र राजा, आपल्या लोकांस आपल्या शाब्बाथदिवशीं विश्रांति देणारा असा आहे; कारण त्यांस विश्रांति देण्यास त्यास हर्ष झाला. त्याचें आह्मी भयाने व त्रासाने भजन करूं; आणि त्याचें नाम प्रतिदिवशीं अखंडित स्तवूं. तो आशीर्वादांचा उगम, पुष्कळ स्तुतीस योग्य,

शांतीचा स्वामी, शाब्बाथास पवित्र करणारा, सातव्या दिवसास आशीर्वाद देणारा आणि उत्पत्तीच्या कर्यांच्या आठवणीकरितां हर्षानें तृप्त झालेले लोकांस पवित्रतेने विसावा देणारा आहे.

אלהינו ואלהי אבתינו हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या विसाव्यामुळें तूं प्रसन्न हो; आपल्या आज्ञाकडून आम्हास पवित्र कर; आपल्या शास्त्रांत आमचा विभाग राखून ठेव; आपल्या चांगुलपणाकडून आम्हास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा जीव हर्षित कर; सत्यतेनें तुझी सेवा करावी म्हणून आमचीं मनें शुद्ध कर; आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा पवित्र शाब्बाथ आम्हास वतन करून दे, असा कीं तुझें नाम पवित्र मानणाऱ्या सर्व इस्राएलांनी त्यांत स्वस्थ राहावें. हे परमेश्वरा ! शाब्बाथास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्यानें (देवानें) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरव युक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरव युक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोरमानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु असें म्हणा.

תתקבל צלותהון सर्व इस्राएलांच्या घराण्याची प्रार्थना व काकळूत, आकाश व पृथ्वींतील त्यांच्या बापापुढें मान्य होवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

יהא שלמא आणि आकाशांतून आम्हास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आम्हास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

शाब्बाथ असेल तर १५० वें गीत व हें गीतहि बोलण्याची चाल आहे.

מזמור לדוד יי רעי गीत २३

הללויה गीत १५०

לדוד מזמור ליי गीत २४

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर व थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो;आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु, त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरव युक्त असो. आणि जो अशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरव युक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

יהא שלמא आकाशांतून आम्हास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार, आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुह्मी धन्य ह्मणा.

ברוך יי המבורך सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.

עלינו לשבח आह्मी सर्वांच्या प्रभुची स्तुति करावी; आणि प्रारंभी (पृथ्वी) घडणाऱ्यास थोर मानावें (हा आमचा मुख्य धर्म होय;) कारण त्याने आह्मास जगांतील राष्ट्रांप्रमाणें केलें नाहीं, आणि पृथ्वींतील कुलांप्रमाणें आह्मास ठेविलें नाहीं, त्यांच्या वांट्याप्रमाणें वांटा आणि त्यांच्या समुदायांच्या भाग्याप्रमाणें आमचें भाग्य करून ठेविलें नाहीं. ते व्यर्थतेस व शून्यास नमन करितात; आणि जो देव तारीत नाहीं त्यास प्रार्थितात. परंतु राजांचा राजा, जो पवित्र व धन्य, ज्याने आकाश पसरिलें व पृथ्वीचा पाया घातला, ज्याच्या गौरवाची वस्ति वरील आकाशांत आणि ज्याच्या सामर्थ्याचें वैभव उंचांत आहे, त्यास आह्मी नमन करितों. तोच आमचा देव, आणि दुसरा कोणी नाहीं; आमचा राजा सत्य आणि त्यावांचून कोणी नाहीं; जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं, आणि आज तुह्मी जाणून आपल्या ऱ्हदयीं असें ठसवून घ्या कीं, वरतीं आकाशांत आणि खालतीं पृथ्वीवर परमेश्वर तोच देव आहे, दुसरा कोणी नाहीं.

על כן נקוה לך यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सामर्थ्याच्या गौरवाने पृथ्वींतून ओंगळपणा काढून टाकावा, मूर्ति छेदून टाकाव्या, सर्व समर्थाच्या राज्याखालीं पृथ्वी स्थापन व्हावी, सर्व मांसमयांच्या संतानांनी तुझ्या नामाने हाक मारावी, पृथ्वींतील सर्व दुष्टांनी तुजकडे फिरावें, आणि सर्व

गुढगें तुजपुढेंच नमावें आणि सर्व जिव्हांनीं तुजविषयींच शपथ वाहावी, असें आहे; ह्मणून पृथ्वीवरील सर्व राहणारे तुलाच ओळखतील व जाणतील; असें लवकर पाहाण्यास आह्मी आवड धरितों. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुजपुढेंच ते नमतील व नमस्कार करितील; तुझ्या नामाच्या गौरवाचा आदर करितील; आणि सर्व तुझ्या राज्याचें जोकड (राज्याधिकार) मान्य करितील. यास्तव तूं लवकर त्यावर सर्वकाळचें राज्य कर. कारण राज्य तुझेंच आहे; तूंच सर्वकाळ गौरवानें राज्य करिशील; जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील; आणि ह्मटलें आहे कीं, आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्या समयीं एकच परमेश्वर होईल आणि त्याचें नाम एकच.

יגדל אלהים חי जीवंत देव थोर मानिला व स्तविला जाईल. तो आहेच आणि त्याच्या अस्तित्वास काळरूप शिमा नाहीं. तो एकच आहे, आणि त्याच्या एकत्वासारिखें दुसरें एकत्व नाहीं. तो अदृश्य आहे; आणि त्याच्या एकत्वासहि अंत नाहीं. त्यास शरीराकृति नाहीं व शरीरहि नाहीं; त्याचे पवित्रतेची बरोबरी (कोणीच) करूं शकत नाहीं. तो सर्व निर्माण केलेल्या पदार्थांच्या पूर्वींचा आहे. तोच पहिला आणि त्याच्या मूळास आरंभ नाहीं. पाहा, तो जगाचा स्वामी सर्वांस घडणारा आहे; तें त्याचें महत्व व त्याचा अधिकार दाखवितें. त्यानें आपल्या भविष्य कथनाची प्रेरणा आपल्या संपत्तिरूप आणि महत्ववान मनुष्यांस दिल्ही. ज्यानें त्याचें गौरव पाहिलें, त्या मोशे सारिखा इस्राएलांत कोणी दुसरा भविष्यवादी उठला नाहीं. देवानें आपल्या लोकांस, आपला भविष्यवादि व आपल्या घरचा विश्वासू याच्या हातून सत्य नियम शास्त्र दिल्हें आहे. देव आपल्या या नियमाशिवाय दुसरा लाऊन देण्याकरितां कधींहि

पालटणार आणि बदलणार नाहीं. तो आमचीं सर्व गुप्तें पाहतो व जाणतो; सर्व पदार्थांचा शेवट तो पूर्वींच लक्षांत आणितो. धार्मिक मनुष्याची फेड त्याच्या कर्माप्रमाणे करितो. आणि दुष्टास त्याच्या दुष्टाईप्रमाणे शासन करितो. त्याच्या तारणाच्या वेळेची वाट पाहणाऱ्यांस खंडून घेण्याकरितां शेवटल्या दिवशीं तो आमच्या माशीयाहस पाठवील. देव आपल्या बहुत दयेने मेलेल्यांस जीवंत करील; त्याचें स्तुत्य नाम सदासर्वकाळ धन्य असो. हीं तेरा मूळतत्त्वें देवाच्या नियमाचा व त्याच्या शास्त्राचा पाया आहेत.

वर्षप्रतिपदेचें पवित्रकरण.

शाब्बाथ असल्यास पहिल्याने יום הששי ויכלו השמים पृष्ठ २३ हें बोलावें आणि शाब्बाथ नसल्यास खालीं लिहिलेल्या वाक्यापासून बोलावें.

סברי מרנן * (गुरुच्या मताप्रमाणें).÷

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, द्राक्ष फळें उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्याने लोकांमधून आम्हास निवडून घेतलें, आणि सर्व भाष्यांपेक्षां (राष्ट्रांपेक्षां) आम्हास उंच केलें, आणि आपल्या आज्ञाकडून आम्हास पवित्र केलें, तो तूं धन्य आहेस. आणि परमेश्वरा आमच्या देवा प्रीती भावेंकरून तूं आम्हास, (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, गजराचा दिवस, (शाब्बाथ असल्यास गरज आठविण्याचा दिवस) जो मिसरांतून निघण्याच्या

* टीका. २

÷ या दोन शब्दाचा अर्थ कोणी अहो स्वामी तुमच्या आज्ञेवरून असाहि करितात.

आठवणीकरितां (शाब्बाथ असल्यास मीतिरूप) पवित्र मेळा, तो दिल्हा आहेस. आणि हे आमच्या राजा, तुझें वचन सर्व काळ सत्य व स्थापित आहे. हे परमेश्वरा, सर्व पृथ्वीच्या राजा, (शाब्बाथ असल्यास शाब्बाथास व) इस्राएलांस व या स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास या वेळेपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शनवार संध्याकाळ असल्यास שהחיינו बोलल्या पूर्वी हें बोलावें.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, अग्नीपासून प्रकाश उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, पवित्र व अपवित्र, उजेड व काळोख, इस्राएल व (दुसरे) लोक, सातवा दिवस व काम करायाचे साहा दिवस, यांमध्यें भेद राखणाऱ्या तूं धन्य आहेस. त्वां शाब्बाथाच्या पवित्रतेमध्यें व सुदीनाच्या पवित्रतेमध्यें भेद केला, काम करायाच्या साहा दिवसांपेक्षां सातव्या दिवसास पवित्र करून त्यांमध्यें भेद केला, आणि त्वां आपल्या पवित्रतेकडून आपल्या इस्राएल लोकांस पवित्र केलें आहे. हे परमेश्वरा, (एक) पवित्र (गोष्टीमध्यें व दुसऱ्या) पवित्र (गोष्टीमध्यें) भेद करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास यावेळपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पहिल्या रात्रीं जेवणापूर्वीं पुढें सांगितलेले पदार्थांवर देवा पुढें चांगली आठवण व्हावी म्हणून पुढील वाक्यें बोलावीं.

सफरदलाचा मुरब्बा.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, पहिल्यापासून शेवटपर्यंत चांगलें व सुखावह वर्ष आम्हावर चालू व्हावें, असी तुझी प्रसन्नता होवो.

काराते (दनदना)

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझे शत्रु व तुझा द्वेश करणारे आणि आमचे वाईट इच्छिणारे छेदले जावे अशी तुझी प्रसन्नता होवो. (मग हें बोलावें) तुझा हात तुझ्या शत्रूंवर उंचावेल, आणि तुझे सर्व वैरी नाश पावतील.

(बीट)

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजाच्या देवा, तुझे शत्रु व द्वेष करणारे आणि आमचें वाईट इच्छिणारे दूर व्हावे, असी तुझी प्रसन्नता होवो. (मग हें बोलावें.) अहो सर्व दुष्टकर्मी, मजपासून दूर जा, परमेश्वराने माझ्या रडण्याचा शब्द ऐकिला आहे. तेथून निघून जा, निघून जा मलिनास शिवूं नका; तिच्या मध्यांतून जा; जे तुम्ही परमेश्वराचीं पात्रें वाहतां ते तुम्ही पवित्र असा.

खजूर.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझे शत्रु व द्वेष करणारे, आणि आमचें वाईट इच्छिणारे संपावे, असी तुझी प्रसन्नता होवो. (मग हे बोलावें) पापी पृथ्वींतून संपतील; दुष्ट नाहींसेच होतील. हे माझ्या जीवा, तूं परमेश्वराची स्तुति कर, तुम्ही परमेश्वराला स्तवा. आ-

णि आपल्या दयेने माझ्या शत्रूंचा संहार; आणि माझ्या जिवाच्या सर्व वैऱ्यांचा नाश कर; कारण कीं मी तुझा सेवक आहे.

दुध्या.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या न्यायाच्या शिक्षेचा हुकूमनामा फाडून आमचें पुण्य तुजपुढें वोलाविलें जावें, असी तुझी प्रसन्नता होवो.

मच्छ.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमचें पुण्य वाढावें, असी तुझी प्रसन्नता होवो.

कोंकराचें डोकें.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आम्ही डोकें व्हावें परंतु पुच्छ न व्हावें (आम्ही श्रेष्ठ व्हावें परंतु कनिष्ठ न व्हावें) असी तुझी प्रसन्नता होवो. आणि इसहाकाच्या एडक्याची तूं आम्हाकरितां आठवण कर.

कीर्त्तन.

אלהי נשמה हे माझ्या देवा ! जो जीव त्वां मजमध्यें दिल्हा आहे, तो शुद्ध आहे; त्वां त्यास उत्पन्न करून व घडवून मजमध्यें फुंकिला, आणि तूंच त्यास मजमध्यें राखितोस; आणि पुढें तूंच त्यास मजपासून घेशील; आणि उत्तरकाळीं मजमध्यें परत आणिशील. जोंपर्यंत मजमध्यें जीव आहे, तोंपर्यंत हे परमेश्वरा माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, तूं सर्व कृत्यांचा धनी, व सर्वप्राण्याचा स्वामी आणि सर्वसृष्टीचा सतत जीवंत व निश्चल असणारा सत्ताधारी आहेस, असा मान्य करितों.

हे परमेश्वरा, मेलेल्यांचे मेतांत पुनः जीव घालणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हेपरमेश्वरा! आमच्या देवा जगताच्या राजा, दिवस व रात्र यांमधील भेद जाणण्यास कोंबड्यास बुद्धि देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आंधळ्यास दृष्टि देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, बंदिवानास मोकळें करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, ओणव्यांस उभे करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, नागव्यांस वस्त्र नेसविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा जगताच्या राजा, थकलेल्यांस शक्ति देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा आमच्या देवा, जगताच्या राजा पाण्यावर पृथ्वी विस्तारणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, मनुष्याचीं पावलें स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आमच्या गरजा पुर्विणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलांस पराक्रमाकडून वेष्टिणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलास सुंदरपणाने सुशोभित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मला मूर्तिपूजक न करणाऱ्या (स्त्रीने ह्मणावें मला मूर्तिपूजनारीण न करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मला दास न करणाऱ्या (स्त्रीने ह्मणावें. मला दासी न करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, मला स्त्री न करणाऱ्या (स्त्रीने ह्मणावें, मला आपले इच्छेप्रमाणें करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आमच्या डोळ्यांवरून झोंप व आमच्या पापण्यावरून निद्रा घालविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ויהי רצון आणि हे परमेश्वरा ! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन तूं आह्मास तुझ्या शास्त्राभ्यासास लाव; तुझ्या आज्ञांस चिकटून राहावीव; आह्मास पापांत, उल्लंघनांत, मोहांत व धिक्कारांत पडूं देऊं नको. आह्मास कुकल्पनापासून दूर राखून सद्विचारास लगटून राहावीव; आणि तुझ्या दिसण्यांत व जे कोणी आह्मास पाहून आह्माबरोबर परोपकार बुद्धीने वर्ततात, त्यांच्या दिसण्यांत आह्मास प्रीति, अनुग्रह, दया व कृपा मिळूं दे. हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलांस कृपा दाने देणाऱ्या, तूं धन्य, आहेस.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन आज व प्रत्येक दिवशीं तूं आह्मास निष्ठुरता, निलाजरेपणा, वाईट मनुष्य, वाईट स्त्री कुकल्पना, वाईट मित्र, वाईट शेजारी, अरिष्ट, पापदृष्टि, वाईट जिव्हा, चाहाडी, खोटी साक्ष, मनुष्य मात्रांचा द्वेष करणे, कुभांड, अपघात,

वाईट रोग, अनर्थ, व कठोर न्याय यांपासून; आणि कराराचा पुत्र* असून किंवा कराराचा पुत्र नसून जो कठोर न्यायाधीश, यापासून व नरकाच्या दंडापासून आह्मास सोडीव.

" ברוך אתה " हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मास आपल्या आज्ञां कडून पवित्र करणाऱ्या व शास्त्राविषयीं आह्मास आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

והערב נא हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी विनंती करितों कीं, तुझ्या शास्त्रांतील गोष्टी आमच्या व तुझे लोक इस्राएलांचें घराणें, यांच्या तोंडांस मधुर लागाव्या; आणि आह्मी, आमच्या लेंकरांनी व आमच्या लेंकरांच्या लेंकरांनी तुला जाणून शास्त्राचा अभ्यास करावा, ह्मणून आह्मी तें शिकावें असें तूं कर. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस शास्त्र शिकविणाऱ्या, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मास सर्व लोकांतून निवडून घेऊन आपले नेम शास्त्र आह्मास देणारा जो, तूं धन्य आहेस.

" וידבר " आणखी परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें कीं, तूं आहारोनाला आणि त्याच्या पुत्रांस बोलून सांग कीं, तुह्मी इस्राएल संतानास आशीर्वाद देत असतां त्यांस असें ह्मणा कीं, परमेश्वराने तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वराने आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वराने आपली दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें; तसें त्यांनी माझें नांव इस्राएलाच्या संतानांवर लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा तुजपुढें चांगल्या आठवणीने

* सुंतेचा करार व नेम शास्त्र जो मान्य करितो तो.

आमची आठवण करून पूर्वीच्या आकाशांच्या आकाशांतून द-येच्या व तारणाच्या दर्शनाकडून आह्मास दर्शन दे. आणि हे परमेश्वरा! आमच्या देवा, (आमचे) पूर्वज आब्राहाम, इसहा-क व याकोब यांजवरील तुझी प्रीति; आब्राहामाबरोबर केलेला करार; त्याजवरील दया व त्याजवळ वाहिलेली शपथ; आणि त्याचा पुत्र इसहाक याचें स्थंडिलाच्या बाजूवर बांधलें जाणें तूं आठीव. जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं. —

ויהי אחר उत्पत्ति अध्याय २२ ओवी १-१९

ושחט אתו आणि त्याने वेदीच्या उत्तर बाजूस परमेश्वरासमोर तो (होम पशू) कापावा; मग आहारोनाचे पुत्र याजक यांनी त्याचें रक्त वेदीवर चहुंकडे शिंपडावें.

רבונו של עולם हे जगदीशा, जसें आमचा बाप आब्राहाम याने पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां आपल्या दयेस जिंकिलें, तसें तुझ्या दयेने तुझ्या रागास जिंकावें. तुझ्या दयेने तुझ्या (न्यायत्वाच्या) गुणास अगदीं झांकावें असें कर; आणि आम्हाबरोबर दयेच्या व कृपेच्या गुणाप्रमाणें वर्तून आम्हास परिमित न्यायाच्या शिमेच्या आंत राख; आणि आपल्या मोठ्या चांगुलपणामुळें आपल्या लोकांवरून, नगरावरून, देशावरून व वतनावरून आपला राग फिरीव. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा सेवक मोशे याजकडून तूं आपल्या शास्त्रांत आम्हास अभय वचन दिल्हेल्या गोष्टी आमचे प्रत्ययास आण. जसें म्हटले आहे कीं, आणि मी याकोबासीं जो माझा करार तो आठवीन, आणि इसहाकासींहि जो माझा करार व आब्राहामासींहि जो माझा करार तो आठवीन, आणि तो देशहि आठवीन. आणि असें असतांहि ते आपल्या शत्रूच्या देशांत राहतील, तेव्हां मी त्यांची समाप्ति करावी आणि त्यांसीं म्या केलेला करार मोडावा, असा मी त्यांस धिक्कारणार नाहीं.

आणि त्यांचा कंटाळाहि करणार नाहीं; कांतर मी परमेश्वर त्यांचा देव आहें. तर त्यांच्या पूर्वजांसीं जो करार, तो मी त्यांसाठीं आठवीन; कां तर त्या पूर्वजांस त्यांचा देव व्हावा म्हणून म्या राष्ट्रांच्या देखतां मिसर देशांतून काढिलें; मी परमेश्वर आहें. तर तुझा देव परमेश्वर तुझे पाडाव करून नेलेल्यांस फिरवील, आणि तुजवर ममता करील; असें ज्या लोकांमध्यें तुझा देव परमेश्वर याने तुझीं दाणादाण केली, त्या सर्वांतून तुला फिरून गोळा करील. जरी आकाशाच्या कांठापर्यंत तुला ढकललें असलें, तरी तुझा देव परमेश्वर तुला तेथून गोळा करील; तेथून देखील तुला मिळवून घेईल. आणि तुझ्या पूर्वजांस जो देश वतनाचा होता, त्यांत तुझा देव परमेश्वर तुला आणील, आणि तो तुझ्या वतनाचा होईल; तुझ्या पूर्वजांपेक्षांहि तुझें बरें करून तुला वाढवील. आणि (हे देवा,) तुझ्या भविष्यवाद्यांच्या हातूनहि म्हटलें (लिहिलें) गेलें आहे कीं, हे परमेश्वरा, आह्मावर कृपा कर, आह्मी तुझी वाट पाहिली आहे, प्रत्येक सकाळीं तूं त्यांचा बाहु हो, संकटाच्या समयीं आमचें तारणहि हो. आणखी ह्मटलें आहे कीं, त्याच्या सर्व कष्टांत तो (देव) कष्ट पावे, आणि त्याचा समक्ष राहणारा दूत त्यांस तारी; तो आपल्या प्रीतीनें व लीनतेनें त्यांस उद्धारी; आणि सर्व पुरातन दिवसांत त्यांस उचलून वाही. आणखी असें ह्मटलें आहे कीं, हे देवा,तो याकोबाचा संकट समय आहे, तथापि तो त्यांतून निभावेल. आणखी ह्मटलें आहे कीं, हे देवा, जो तूं अन्यायाची क्षमा करितोस, आणि आपल्या विभागाच्या शेषाचें पातक उल्लंघितोस, त्या तुजसारिखा कोण आहे ? तो आपला क्रोध सर्वकाळपर्यंत बाळगीत नाहीं, कारण कीं त्याला दया आवडती. तो फिरेल, तो आह्मावर दया करील; तो आमचे अन्याय धुळीस मिळवील; आणि तूं त्यांची सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिशील. (आणि आमचा व तुझे लोक

इस्राएल यांच्या घराण्याचीं पापें, आठवण न पडे व झडती न होय व कधींहि मनांत नयेत अशा ठिकाणीं तूं टाक.) तूं याकोबासाठीं खरेपणा आणि आब्राहामासाठीं करुणा साधिशील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांपाशीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहीस ती. आणखी असें ह्मटलें आहे कीं, त्यांसहि मी आपल्या पवित्र पर्वतांत आणीन, आणि आपल्या प्रार्थनेच्या घरांत त्यांस हर्षित करीन; त्यांचे होम व त्यांचे बळी माझ्या वेदींवर मला मान्य होतील; कारण कीं माझें घर सर्व लोकांसाठीं प्रार्थनेचें घर असें ह्मटलें जाईल.

אלו דברים ज्या गोष्टींस परिमाण नाहीं, त्या येणेप्रमाणें; शेताचा कांठ कापणें, प्रथम उत्पन्न वाहणें, भेटीसाठीं कांहीं आणणें, परोपकार करणें, व शास्त्राचा अभ्यास करणें. आणि ज्या गोष्टी आचरल्यानें मनुष्य या जगीं त्याचें फल भोगून पुढील जगांत त्याचें शृंग स्थापित होतें (मुख्य वेतनपावतो,) त्या येणेप्रमाणें; आई बापांचा मान राखणें, परोपकार करणें, रोग्यांचा समाचार घेणें, पाहुण्यांचा आदर सत्कार करणें, देवालयांत पाहांटेस जाणें, आणि मनुष्यामध्यें व त्याच्या शेजाऱ्यामध्यें व पुरुषामध्यें व त्याच्या स्त्रीमध्यें समेट करणें; परंतु शास्त्राचा अभ्यास करणें सर्वापेक्षां श्रेष्ठ आहे.

לעולם יהא אדם मनुष्यानें देवाचें * भय, उघडपणें व गुप्तपणेंहि धरावें, सत्य अंगिकारावें व मनांत असेल तसें सत्य बोलावें, आणि पाहांटेस उठून असें म्हणावें कीं, हे जगतांच्या ÷ स्वामी व प्रभुंच्या प्रभु, आमच्या न्यायीपणामुळें नव्हे, परंतु तुझ्या फार दयेमुळें आम्ही आपल्या विनंत्या तुजपुढें

* हाल्लीम लोकांच्या ग्रंथांत कोठें कोठें देवाचें नाव उघडपणें लिहिण्याबद्दल आकाश असें सांपडतें.

÷ या व पुढल्या जगाचाहि स्वामी तोच आहे.

ओतितों. हे प्रभो, ऐक; हे प्रभो, क्षमाकर; हे प्रभो, कान देऊन कार्य कर, उशीर करूंनको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कांकीं तुझ्या नगरास, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. आम्ही काय ! आमचें जिणे काय ! आमचें यथार्थपण काय ! आमचें पुण्य काय ! आमचें सामर्थ्य काय ! आमचें बल काय ! आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आम्ही तुजपुढें काय म्हणूं ! पराक्रमी (मनुष्यें) तुजपुढें कांहींच नाहींत; नामांकित मनुष्यें जसीं नव्हतींच; ज्ञानी मनुष्यें जसीं बुद्धिहीन; आणि चतुर जसीं विवेकहीन अशीं नाहींत कीं काय ? कारण आमचीं कर्मे बहुत करून शून्यच आहेत; आणि आमच्या आयुष्याचे दिवस तुजपुढें व्यर्थ आहेत. आणि मनुष्य पशुपेक्षां श्रेष्ठ नाहीं कारण सर्व व्यर्थता आहे; मात्र जो शुद्ध आत्मा तुझ्या गौरवाच्या आसनासमोर पुढें झडती व हिशोब देणार तो त्यास (अधिक) आहे. आणि पाहा, राष्ट्रें मोटेंतल्या बिंदुप्रमाणे आहेत; आणि पारड्यांतल्या बारिक धुळीप्रमाणे मोजलीं आहेत. पाहा तो द्वीपें कणासारिखीं उचलितो; असें म्हटल्याप्रमाणें सर्व राष्ट्रें तुजपुढें जसीं कांहींच नाहीं. परंतु आम्ही तुझे लोक, तुझ्या करारार्चीं लेंकरें, तुझा मित्र आब्राहाम ज्यासीं त्वा मोरिया डोंगरावर शपथ केलीस त्याचीं लेंकरें; इसहाक, जो तुजकरितां स्थंडिलाच्या बाजूवर बांधला गेला त्याचें बीज; तुझा ज्येष्ठ पुत्र याकोब, ज्यावर आपल्या आवडीनें प्रीतिकरून आणि त्यामध्यें आनंदाने हर्ष मानून, ज्यास इस्राएल आणि येशुरून म्हटलें त्याचा आम्ही समुदाय आहों.

לפיכך אנחנו חייבים यास्तव आम्हास तुझे उपकार मानायास, तुला स्तवायास, तुझें गौरव करायास व तुला उंच मानायास; आणि तुझ्या मोठ्या नामाचें गायन, कीर्त्तन व उपकार स्तुति करायास योग्य आहे. आणि आम्हा-

स नेहमी मति दिवशीं गीत गाणें योग्य आहे. आम्ही सुखी ! आमचा विभाग किती चांगला ! आमचें भाग्य किती सुंदर ! आणि आमचें वतन किती उत्तम ! आम्ही सुखी कीं आम्ही पाहांटेस व संध्याकाळीं देवालयांत व विद्यालयांत जाऊन, आणि तुझ्या नामाचें एकत्व मान्य करून दोनवेळा प्रीतीने असें म्हणतों कीं, हे इस्राएला ऐक, परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे. त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

אתה הוא אחד पृथ्वी उत्पन्न केल्यापूर्वीं व पृथ्वी उत्पन्न केल्यानंतर जो एकच, तो या जगांतील देव तूंच; पुढल्या जगांतील देव तूंच; आणि ज्याचीं वर्षें संपत नाहींत तोहि तूंच. तूं आपल्या जगांत तुझें नाम पवित्र मानणाऱ्या लोकांमध्यें आपलें नाम पवित्र कर; तूं आपल्या तारणाकडून आमचें शिंग उभार व उंचाव; आणि आपल्या नामाकरितां आमचें लवकर तारण कर. बहुतांमध्यें (प्रसिद्धपणें) आपलें नाम पवित्र करणारा धन्य आहे.

אתה הוא יי האלהים वरील आकाशांतील, खालील पृथ्वींतील, आकाशांच्या आकाशांतील, उंचावरील व नीचामधील परमेश्वर देव तूंच आहेस. पहिला तूंच व मागलाहि तूंच; तुजवांचून दुसरा कोणी देव नाहीं. तुजवर आशा ठेवणाऱ्या विखरलेले लोकांस पृथ्वीच्या चोहों कोनापासून एकवट कर, म्हणजे जगांतील सर्व येणारे (वसणारे) जाणतील व समजतील, कीं पृथ्वीच्या सर्व राज्याचा तूंच देव आहेस; तूंच आकाश, पृथ्वी, समुद्र व त्यांतील सर्व (पदार्थ) उत्पन्न केलेस. आणि तूं काय करितोस व तूं काय चालविलें आहेस असे म्हणणारा, वरील व खालील तुझ्या हस्त कर्मांमध्यें कोण आहे ? हे आकाशांतील आमच्या जीवंत व निश्चल बापा, ज्या तुझ्या मोठ्या परा-

क्रमी व भयंकर नामाने आम्ही म्हटलों गेलों आहों, त्याकरितां आम्हावर उपकार व दया करून ज्या गोष्टीविषयीं तूं आपला दृष्टांत सांगणारा सेफानया याचे हातून आम्हास अभय वचन दिल्हें आहेस, ती गोष्ट आम्हामध्यें स्थापित कर. जसें, म्हटलें आहे कीं, ज्या समयीं मी तुला एकवटीन त्यासमयीं तुम्हाला परत आणीन, कांकीं जेव्हां मी तुमचा पाडावपणाचा प्रवास तुमच्या समक्ष परत आणीन, तेव्हां तुम्हाला पृथ्वींतल्या सर्व लोकांमध्यें कीर्ति व प्रशंसा मिळत असें करीन. असें परमेश्वर म्हणतो.

יהי רצון מלפניך हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी असी प्रसन्नता होवो कीं, तूं आम्हावर दया कर; आमचीं सर्व पापें क्षमा कर; आमचे सर्व अपराधांचें प्रायश्चित कर; आमचीं सर्व उल्लंघनें क्षमा व माफ कर; आणि आमच्या दिवसांत लवकरच पवित्र मंदिर बांध; मग तुझा भविष्यवादी मोशे याच्या हातून लिहिल्याप्रमाणे आमचें प्राय-श्चित होण्याकरितां नित्याचें अर्पण आम्ही तुजपुढें अर्पूं. जसें म्हटलें आहे कीः—

" וידבר " आणि परमेश्वराने मोशाला असें सांगित-लें कीं, तूं इस्राएलांच्या संतानास आज्ञा देऊन सांग कीं, माझीं अर्पणें, माझीं अन्नदानें हीं शांतिकारक सुवासासाठीं माझ्या जव-ळ यथाकाळीं करावयास तुह्मी सांभाळा. आणि तूं त्यांस सांग कीं, तुह्मी जे होम पशू नेहमी प्रतिदिवशीं परमेश्वराला अर्पावे, ते असे, पहिल्या वर्षांतील सांगोपांग दोन मेंढे. एक मेंढा सकाळीं तूं अर्पण कर, आणि एक मेंढा संध्याकाळीं अर्पण कर. आणि नैवेद्यासाठी एकाचा एक दशमांश सपीठ पाव हीन* कुटून काढ-लेलें तेल यांत मळलेलें व्हावें. हा नित्य होम सीनाय डोंगरावर

* हीन हें एक माप आहे.

नेमलेला, परमेश्वराजवळ शांतिकारक सुवासासाठीं अर्पण असा आहे. आणि त्याच्या संगतीं जें पेय अर्पण करायाचें, तें एका मेंढ्या सगता पाव हीन द्राक्षरस; तें तूं पवित्र स्थानांत परमेश्वराजवळ ओतून पेय अर्पण कर. आणि संध्याकाळीं तूं दुसऱ्या मेंढयाचें अर्पण कर; जसा सकाळचा नैवेद्य आणि त्याचें पेय तसें अर्पण कर; हें अर्पण परमेश्वराजवळ शांतिकारक सुवास आहे.

शाब्बाथ असल्यास हीं वाक्येंहि बोलावीं.

וביום השבת आणि शाब्बाथ दिवसीं पहिल्या वर्षांतील सांगोपांग दोन मेंढे, आणि तेलांत मळलेल्या दोन दशमांश सपीठाचा नैवेद्य, आणि त्याचें पेय अर्पण व्हावें. नित्य होम व त्याचें अर्पण यां खेरीज हा होम प्रत्येक शाब्बाथीं व्हावा. אתה הוא אלהינו जेव्हां पवित्र मंदिर होतें, तेव्हां तुझा भविष्यवादी मोशे याच्या हातांकडून तुझ्या नेमशास्त्रांत लिहिल्याप्रमाणें जसी (आमच्या पूर्वजांस) आज्ञा दिल्ही होती, त्याप्रमाणे ज्यापुढें ते सुगंधी द्रव्यें जाळीत असत; तो तूंच आमचा देव. तें येणेप्रमाणे.—

" ויאמר " आणि परमेश्वराने मोशाला सांगितलें तूं आपल्यासीं किराणे बलासान व नखी व गंधाबेरोज हे किराणे, आणि निर्मळ ऊद घे, भागाप्रमाणें भाग व्हावा. आणि यांचा धूप गांध्याच्या कामाने मीठ घालून निर्मळ पवित्र असा कर. आणि त्यांतील कांहीं बारीक कूट, मग त्यांतील काहीं संकेत लेखाच्या पुढें सभामंडपांत जेथें मी तुला साक्षांत भेटेन, तेथें ठेव; तो तुह्माला परम पवित्र असावा. आणखी असेंहि ह्मटलें आहे कीं, आणि आहारोनाने सुगंध द्रव्यांचा धूप तिजवर जाळावा. सकाळच्या सकाळीं, जेव्हां तो दिवे नीट करितो, तेव्हां त्याने तिजवर धूप जाळावा. आणि संध्याकाळीं जेव्हां आहारोन दिवे लावितो,

तेव्हां त्याने तिजवर परमेश्वरासमोर धूप नित्य जाळावा; तुमच्या पिढ्यांनपिढीं असें असावें.

תנו רבנן आमच्या गुरुनी आम्हास सुगंधाचें चूर्ण कसें तें सांगितलें आहे. त्यांत तीनशें आडसष्ट मानीमं[1] होते; सूर्याच्या दिनमानाप्रमाणे तीनशें पांसष्ट, म्हणजे प्रति दिवसास एक माने, त्यांतील अर्धे सकाळीं व अर्धे संध्याकाळीं; आणि उरलेले तीन मान्यांतील मुख्य उपाध्या प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या पूर्व दिवशीं, अगदीं बारीक कुटण्याची आज्ञा पूर्ण करण्याकरितां ओंजळ भर घेऊन हामामांत कुटीत असे. त्यांत अकरा गंध[2] होते; ते येणेप्रमाणें; बलासान, नखी (लवंग), गंधाबिरोजा व ऊद प्रत्येक सत्तर माने; बोल, तज, जटामांशी व केशर प्रत्येक सोळा माने; कोष्ट बारा माने; आगर तीन माने; दालचिनी नऊ माने करशीनाचा साबु[3] नऊ काब[4]; कफरीसीनाचा अर्क तीन सेआ व तीन काब;जर कफरीसीनाचा अर्क न मिळाला,तर पांढरा जुना मद्य घ्यावा; सदोमी मीठ पाव काबा; आणि थोडी "माआलेआशान" या नावाची वनस्पतिहि घ्यावी. रिब्बी नाथान बाबेल कर म्हणतो,कीं त्यांत थोडें यार्देनेजवळचें तेल स्फटिकहि घ्यावें; आणि त्यांत मद्य असल्यास तें अशुद्ध होय; आणि त्यांत एकादा गंध उणा असल्यास, तो (उपाध्या) मारला जाण्यास योग्य आहे.

רבן שמעון गमलीएलाचा पुत्र रब्बान शिमओन असें म्हणतो कीं, जो बालसीमोन झाडावर केलेले क्षतांतून गळता रस, तोच बलासान; करशीनाचा साबू कां घेत असत ? नखी सुंदर दिसावी म्हणून स्वच्छ करायास. कफरीसीनाचा अर्क कां घेत

१ माने हें एक वजन आहे. २ टीका. ३. ३ या पदार्थाची उत्पत्ति झाडापासून आहे म्हणून हा पदार्थ शिकेकाइ अथवा रिठा असावा असें वाटतें. ४ काब व सेआ हीं कैली मापें आहेत. ५ हा पदार्थ बाटाण्या एवढा आहे, याचें विलायतेहून लोंनचें येतें.

असत ? नखी कठीण असती ती भिजविण्याकरितां. या (कामास) मेरगलाइम* या नावाच्या झऱ्याचें पाणी योग्य नव्हतें काय ? परंतु मेरगलाइम या नावाच्या झऱ्याचें पाणी पवित्र मंदिराच्या गौरवामुळें आंत आणायास योग्य नव्हतें.

תניא רבי נתן אומר रिब्बी नाथान कुट-णाऱ्याला म्हणतो कीं, बारीक व चांगलें, चांगलें व बारीक कूट, कीं त्याचा आवाज होऊन चांगला स्वास यावा. आणि (त्या चूर्णांतून) अर्ध्याचा (धूप दाखविल्यास) शुद्ध आहे; परंतु त्यांतील तिसऱ्या व चवथ्या भागाचा धूप दाखविण्याविषयीं आम्ही (कधीं) ऐकिलें नाहीं. रिब्बी यहुदा म्हणतो कीं, हें सर्व त्याच्या परिमाणाप्रमाणें असल्यास त्यांतील अर्ध्याचा धूप दाखवायास शुद्ध आहे; परंतु जो त्यांतील एकादा गंध उणा करितो तो (उपाध्या) मारला जाण्यास योग्य आहे.

תני בר קפרא कप्पाराचा पुत्र असें सांगतो कीं, साठ किंवा सत्तर वर्षांत एकवेळ त्यांतील अर्धे भिजऊन धूप दाखवायास आणीत असत. कप्पाराचा पुत्र आणखी असें सांगतो कीं त्यांत मधाचा कोरतोब+ जर असला, तर मनुष्य त्याच्या वासा पुढें उभा राहूं शकत नसे. आणि त्यांत मध कां मिसळीत नसत ? कारण शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, प्रत्येक आंबट पदार्थ व मध, यांतून घेऊन परमेश्वरासाठीं अग्नि अर्पणाचा धूप तुम्ही करूं नका. परमेश्वराकडून तारण होतें; तुझ्या लोकांवर तुझा आशीर्वाद आहे. सैन्याचा परमेश्वर आम्हास अनुकूळ आहे. याकोबाचा देव आम्हास आश्रय आहे. सेलाह. हे सैन्याच्या परमेश्वरा, जो मनुष्य तुजवर आशा ठेवितो तो धन्य. हे परमेश्वरा तारण कर; आम्ही हांक मारितों, त्या दिवशीं राजानें आम्हास उत्तर द्यावें. हे परमेश्वरा, आम्हास तुज-

* टीका ×   + कोरतोब हें एक लहानसें माप आहे.

कडे फिरीव म्हणजे आम्ही फिरूं, पूर्वीप्रमाणे आमचे दिवस नवे कर. तेव्हां जसें पुरातन दिवसांत, आणि जसें पूर्वींच्या वर्षात, तसें यहुदाचें आणि येरुशालेमेचें अर्पण परमेश्वराला मनोरम होईल.

אביי הוה आबये याने अनुष्ठानाचा क्रम गेमारांत सांगितल्याप्रमाणे आणि आव्बाशाऊल याच्या मताप्रमाणे लाऊन ठेविला आहे. (तो येणेप्रमाणे;) धुपाच्या दुसऱ्या अनुष्ठाना पूर्वी मोठें अनुष्ठान; लांकडाचे दोन तुकडे रचण्या पूर्वी धुपाचें दुसरे अनुष्ठान; आंतल्या स्थंडिलांतून राख काढण्या पूर्वी लांकडाचे दोन तुकडे रचणे; पांच दिवे नीट करण्या पूर्वी आंतल्या स्थंडिलांतून राख काढणे. नित्याचे रक्त शिंपडल्या पूर्वी पांच दिवे नीट करणे. दोन दिवे नीट करण्यापूर्वी नित्याचें रक्त शिंपडणें; धूप दाखविण्या पूर्वी दोन दिवे नीट करणे; गात्रें (सांधे) अर्पिल्या पूर्वी नित्याचें रक्त शिंपडणे; नैवेद्या पूर्वी गात्रांचे (सांध्याचें) अर्पण करणे; भाजलेलें (मांस) अर्पण्यापूर्वी नैवेद्य दाखविणे; तर्पण करण्या पूर्वी भाजलेलें मांस अर्पणे; अधिक अर्पणा पूर्वी तर्पण करणे; सुगंधाच्या चूर्णाचे दोन चमचे वाहण्या पूर्वी अधिक अर्पण करणें; आणि नित्याचें संध्याकाळचें अर्पण केल्यापूर्वी सुगंधाच्या चूर्णाचे दोन चमचे वाहणे; जसें म्हटलें आहे कीं, आणि तिजवर (वेदीवर) होम पशु ठेवावा, आणि तिजवर शांतिकारक यज्ञाचें मांदें जाळावें; याकडून सर्व अर्पणे संपवावी.

אנא בכח (हे परमेश्वरा !) मी विनंति करितों, कीं, तूं आपल्या उजव्या हाताच्या महत्वाच्या सामर्थ्यानें बंदिवानांस मोकळे कर. हे गडरूप आश्रया ! तूं आपल्या लोकांचें स्तवन मान्य कर; हे भयंकरा, आह्मास शुद्ध कर. हे बळवंता ! तुझ्या एकत्वाचा शोध करणारांस आतां डोळ्याच्या पुतळी-

प्रमाणे सांभाळ. त्यांस आशीर्वाद देऊन शुद्ध कर; आणि आपल्या यथार्थतेच्या दयेने त्यांची फेड कर. हे पराक्रमी व पवित्र देवा, आपल्या पुष्कळ चांगुलपणाकडून आपल्या समुदायास चालीव. हे स्वतांच महत्ववान असणाऱ्या, तुझ्या पवित्रतेची आठवण करणाऱ्या लोकांस अनुकूळ हो. हे गुप्त गोष्टी जाणणाऱ्या, आमची विनंती मान्यकर, आणि आमचें ओरडणे ऐक. त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

רבון העולמים हे जगतांच्या स्वामी, त्वां आह्मास नित्याचें अर्पण नेमलेल्या वेळीं करण्याविषयीं आणि उपाध्याने अनुष्ठाने करावीं आणि लेव्यांनी मेजाजवळ व इस्राएलांनी उभे राहाण्याच्या ठिकाणीं (अंगणांत) असण्याविषयीं आज्ञा दिल्ही आहेस. परंतु आतां आमच्या अन्यायामुळें पवित्र मंदिराचा नाश झाला; नित्याचें अर्पण बंद झालें; उपाध्ये अनुष्ठाने करीत नाहींत; लेवी मेजाजवळ व इस्राएल आपल्या उभे राहण्याच्या ठिकाणीं नाहींत; परंतु तूं ह्मटलें आहेस कीं, आह्मी आपले ओठांची वासरें अर्पावीं.

לכן יהי רצון यास्तव हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा. जसें आह्मी नित्याचें अर्पण नेमलेल्या वेळीं अर्पित असूं व आपल्या उभे राहण्याच्या ठिकाणीं उभे असूं; आणि आह्मी आपलीं ओठांची वासरें अर्पूं; असें ह्मटल्या प्रमाणे आमच्या ओठांची विनवणी मान्य, कबूल व प्रसन्नता संपादण्यासारिखी असो. आणि असें ह्मटलें आहे कीं, त्याने वेदीच्या उत्तर बाजूस परमेश्वरासमोर तो कापावा; मग आहारोनाचे पुत्र याजक यांनी त्याचें रक्त वेदीवर चहुंकडे शिंपडावें. आणखी असें ह्मटलें आहे कीं, होमाविषयीं, नैवेद्याविषयीं, पापहारक यज्ञाविषयीं, दोषहारक यज्ञाविषयीं, संस्काराविषयीं व शांतिकारक यज्ञाविषयीं हाच नेम.

איזהו מקומן यज्ञ केले जात तीं ठिकाणें कोणतीं ? त्यांतील परम पवित्र उत्तर बाजूस कापले जात; मायश्चित्ताच्या दिवसाचा बैल व बोकड उत्तर बाजूस कापला जात असे. आणि त्यांचे रक्त उत्तर बाजूने उपकरणांत घेत; त्यांचें रक्त (संकेत लेखाच्या कोशाच्या) काठ्यांवर पडद्यावर व सोनेरी स्थंडिलावर शिपडावें लागत असे. त्यांतील एकादें शिपडणें उणे झालें, तर मायश्चित्तास अडथळा होत असे; उरलेलें रक्त बाहेरल्या स्थंडिलाच्या पश्चिमेकडल्या बाजूच्या पायावर ओतीत; जरी न ओतलें, तरी (मायश्चित्तास) अडथळा होत नसे.

פרים הנשרפים जाळायाचे बैल व जाळायाचे बोकड हे उत्तरेस कापले जात; आणि त्यांचें रक्त उत्तर बाजूने उपकरणांत घेत; आणि त्यांचें रक्त पडद्यावर व सोनेरी स्थंडिलावर शिपडावें लागत असे; त्यांतील एकादें शिपडणें उणें झालें, तर मायश्चित्तास अडथळा होत असे; उरलेलें रक्त बाहेरल्या स्थंडिलाच्या पश्चिमेकडल्या बाजूच्या पायावर ओतीत; जरी न ओतलें तरी (मायश्चित्तास) अडथळा होत नसे; हे व मागले यज्ञ राखेच्या सांठवण्यात जाळीत असत.

חטאת הצבור मंडळीचे व एका मनुष्याचे पापहारक यज्ञ. मंडळीचे पापहारकयज्ञ ते हे — प्रतिपदेचे व पर्वणिचे बोकड उत्तर बाजूस कापले जात; त्यांचें रक्त उत्तर बाजूने उपकरणांत घेत; आणि त्यांचे रक्त चार वेळां (स्थंडिलाच्या) चार शिंगांवर (कोनांवर) शिपडावें लागत असे. तें कसें ? (उपाध्या) स्थंडिलावर चढून वांकणाकडे फिरे आणि आग्नेयी कोनाकडे, मग ईशान्य कोनाकडे, मग वायव्य कोनाकडे, मग नैर्ऋत्य कोनाकडे असा फिरे. उरलेलें रक्त बाहेरल्या स्थंडिलाच्या दक्षिणेकडल्या पायावर ओतीत; आणि उपाध्याचे

घराण्यांतील पुरुष पड्याचे आंत कोणत्याहि प्रकारें शिजवून त्या दिवशीं व अर्ध रात्रपर्यंत खात.

העלה קדש קדשים होम हा परम पवित्र असून उत्तर बाजूस कापला जात असे; त्याचें रक्त उत्तर बाजूनें उपकरणांत घेत; आणि ते चारवेळ शिंपडल्याप्रमाणे दोन वेळ शिंपडावें लागत असे; त्याचें कातडें काढावें व तो तोडून अग्नीनें भस्म करावा लागत असे.

זבחי שלמי הצבור मंडळीचे शांतिकारक व दोषहारक यज्ञ. दोषहारक यज्ञ ते हे.—लुटण्याच्या दोषाचा, न जाणता पवित्र वस्तु आपल्या उपयोगास लावण्याचे दोषाचा मागणी घातलेल्या दासी बरोबर (न जाणतां विषय बुद्धीने वागण्याच्या) दोषाचा, नाझोऱ्याच्या दोषाचा, कोढ्याच्या दोषाचा, आणि संशययुक्त दोषाचा यज्ञ; हे उत्तर बाजूस कापले जात. त्याचें रक्त उत्तर बाजूनें उपकरणांत घेत; तें चारवेळ शिंपडल्याप्रमाणें दोन वेळ शिंपडावें लागत असे; आणि उपाध्याच्या घराण्यांतील पुरुष पड्याचे आंत कोणत्याहि प्रकारें शिजवून त्या दिवशीं व अर्ध रात्रपर्यंत खात.

התודה ואיל נזיר आभार मानण्याचा यज्ञ व नाजीराचा मेंढा हे कांहींसे पवित्र होते, ते अंगनाच्या कोणत्याहि भागीं कापले जात; आणि त्यांचें रक्त चार वेळ शिंपडल्याप्रमाणे दोन वेळ शिंपडावें लागत असे, व ते नगराच्या कोणत्याहि ठिकाणीं कोणताहि मनुष्य त्या दिवशीं अर्ध रात्रपर्यंत खात असे. जो भाग (उपाध्यास) उचलून देत असत * तो दुसऱ्या सारिखा असे; परंतु तो उचलून दिल्हेला भाग मात्र उपाध्ये, त्यांच्या बायका, त्यांचीं लेंकरें व त्यांचे चाकर खात असत. प्रथम उत्पन्न, दाहावा भाग व वल्हांडण सनाचा यज्ञ हे कांहींसे

* लेवीय ७. ३२,३३,३४.

पवित्र होते; ते अंगनाच्या कोणत्याहि भागीं अर्पिले जात; आणि त्यांचें रक्त एकवेळ ह्मणजे स्थंडिलाच्या पायावरच मात्र शिंपडावें लागत असे; परंतु त्याच्या खाण्यांत भेद असे. प्रथम उत्पन्न उपाध्याने खावें; दाहावा भाग कोणताहि मनुष्य नगराचे कोणत्याहि भागीं कोणत्याहि प्रकारें शिजवून दोन दिवस व एक रात्र पर्यंत खात असे; आणि वल्हांडण सनाचा यज्ञ मात्र रात्रीं अर्धरात्रपर्यंत, संख्येंत असतील तेच भाजून मात्र खात असत.

רבי ישמעאל אומר रिब्बी इश्माएल ह्मणतो, तेरा नियमावरून* शास्त्राचा अर्थ समजून येतो.

१ लहान गोष्टीवरून मोठ्या गोष्टीविषयीं, आणि मोठ्या गोष्टीवरून लहान गोष्टीविषयीं अनुमान करणे.

२ सारखेपणावरून अनुमान करणे.

३ एका वाक्यांतील मूळविषय दुसऱ्या वाक्यास लावणे; आणि दोन वाक्यांतील मूळविषय एक प्रत्येकास लावणे.

४ पहिल्याने मोहोगम पद असून मग विशेष पद असलें, तर मात्र विशेष पदाचा अर्थ धरावा.

५ पहिल्याने विशेष पद असून मग मोहोगम पद असलें, तर मोहोगम पदाचा अर्थ धरावा.

६ पहिल्याने मोहोगम पद, मग विशेष पद, आणि पुनः मोहोगम पद असलें, तर विशेष पदाप्रमाणे अर्थ धरावा.

७ ज्या मोहोगम पदाचें विशेष पद, आणि ज्या विशेष पदाचें मोहोगम पद सांगण्याचें अगत्य आहे, त्यांविषयीं अनुमान करणे.

८ जें काहीं मोहोगम पदांत असून विशेष पदांत निराळेंच दाखविलेलें असतें, त्या विशेष पदाविषयीं जें सांगितलेलें असतें,

* टीका ५

तें त्या विशेष पदाविषयीं मात्र नसतें, परंतु मोहोगम पदास-हि तें लागू होतें.

९ जें काहीं मोहोगम पदांत असून पुनः त्याविषयाचा संबंधी सिद्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें असतें, त्याचा निर्णय भारी होत नाहीं, परंतु हलका होतो.

१० जें काहीं मोहोगम पदांत असून त्यापासून निराळा सिद्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें असतें, त्याचा निर्णय हलका व भारीहि होतो.

११ जें काहीं मोहोगम पदांत असून नवी गोष्ट ठरविण्याकरितां पुनः निराळेंच दाखविलें असतें, त्याविषयीं उघडपणे सांगितल्यावांचून तें पुनः मोहोगम पदांत मोजलें जात नाहीं.

१२ मूळ विषयावरून आणि शेवटीं सांगितलेल्या गोष्टीवरून अनुमान करणे.

१३ जर दोन वाक्यांचा अर्थ एक मन्येका विरुद्ध असला, तर तिसरे वाक्यावरून त्याचा अर्थ मिळवून घ्यावा.

יהודה בן תימא אומר तेमाचा पत्र येहुदा असें म्हणतो, कीं तूं आपल्या आकाशांतील बापाची इच्छा पूर्ण करण्याकरितां चित्त्याप्रमाणे धीट, गरुडाप्रमाणे हलका, हरिणाप्रमाणे चपळ आणि सिंहाप्रमाणे बळकट हो. तो म्हणत असे, कीं जे निर्लज ते नर्कास, व मर्यादशील ते एदेन बागास (स्वर्गास) योग्य आहेत.

יהי רצון מלפניך हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, पवित्र मंदिर लौकरच आमच्या दिवसांत त्वां बांधावें असीतुझी प्रसन्नता होऊन, सरळ पूर्ण अंतःकरणानें आह्मी तुझी इच्छा पूर्ण करावी, ह्मणून तुझें शास्त्र आमचें वतन होऊं दें.

קדיש דרבנן

הודו ליי קראו בשמו तुह्मी परमेश्वराचे उपकार माना; त्याचें नाम घ्या, राष्ट्रामध्यें त्याचीं चरित्रें कळवा. त्याच्याजवळ गायन करा; त्याचें कीर्त्तनकरा; त्याच्या सर्व आश्चर्याच्या कृत्यांवर ध्यान करीत जा. त्याच्या पवित्र नामाविषयीं उत्साह करा. जे परमेश्वाराला शरण जातात त्यांचे न्हृदय संतुष्ट व्हावें. तुह्मी परमेश्वराचा व त्याच्या शक्तीचा शोध करायास यत्न करा; नेहेमी त्याला शोधा. जीं आश्चर्याचीं कृत्यें त्यानी केलीं, त्याचे चमत्कार व त्याच्या तोंडचे न्याय, यांची आठवण करा. त्याचा सेवक इस्राएल याच्या संतानहो, त्याचा निवडलेला याकोब याच्या संतान हो, तुह्मी असें करा. तोच परमेश्वर आमचा देव; त्याचे न्याय सर्व पृथ्वींत आहेत. तो आपला करार, जें वचन हजार पिढ्यांस आज्ञेनें बोलला, तें सर्व आठवीत आहे. त्याच्या विषयीं तो आब्राहामाजवळ करारी झाला, आणि इसहाकाजवळ आपली शपथ केली, तें. आणि त्याने तें याकोबाजवळ नेम, इस्राएलाजवळ सर्वकाळ करार स्थापिलें. असें कीं, मी तुला खनान देश तुझा वतनाचा वांटा देईन. तेव्हां ते गणतीनें थोडे, हलके, व त्यांत प्रवासी होते. आणि ते देशोदेशीं एका राष्ट्रा पासून दुसऱ्या राष्ट्रामध्यें आणि एका राज्यापासून दुसऱ्या लोकांत असे फिरत होते. त्यानी त्यांपासून त्यांस जांचणूक होऊं दिल्ही नाहीं, राजांस देखील त्यांसाठीं निषेधिलें. तुह्मी माझ्या अभिषिक्तांस शिवूं नका, माझ्या भविष्यवाद्यांचें वाईट करूंत नका. अहो पृथ्वीचे सर्व, तुह्मी परमेश्वरा जवळ गा; दिवसो दिवस त्याच्या तारणाचें सुवर्त्तमान सांगा. राष्ट्रांमध्यें त्याचें गौरव; सर्व लोकांमध्यें

त्याची आश्चर्याचीं कृत्यें वर्णीत जा. कारण कीं परमेश्वर थोर आणि फार स्तुति योग्य; सर्व देवांवर तो भययोग्य आहे. कारण कीं लोकांचे सर्व देव बाहुल्या आहेत, परंतु परमेश्वरानें आकाश उत्पन्न केलें. त्याच्या पुढें मान व महत्त्व; त्याच्या ठिकाणीं पराक्रम व आनंद आहे. लोकांच्या कुळांनो, परमेश्वराला द्या, परमेश्वराला गौरव व पराक्रम द्या. परमेश्वराला त्याच्या नामाचें गौरव मानून द्या; अर्पण घेऊन त्याच्या दर्शनास यो; पवित्रतेच्या शोभेने परमेश्वराला भजा. अहो पृथ्वीचे सर्व, तुह्मी त्याच्या पुढें कांप धरा, भूगोलहि न हलावा असा स्थापलेला आहे. आकाशाने संतोष करावा, पृथ्वीनेहि हर्ष करावा, आणि परमेश्वर राज्य करितो असें राष्ट्रांमध्यें सांगितलें जावें. समुद्र आणि त्यांतील भरण यांनी गरजावें, भूमि आणि जें तिजवर, त्या सर्वांनी उत्साह करावा. तेव्हां जंगलांतल्या झाडांनी परमेश्वरापुढें सुशब्द करावे, कारण कीं तो पृथ्वीचा न्याय करायास आला आहे. तुह्मी परमेश्वराचे उपकार माना, कारण कीं तो चांगला, आणि त्याची दया सर्वकाळ आहे. तर तुह्मी असें ह्मणा कीं, हे आमच्या तारणाच्या देवा, आह्मास तार ह्मणजे आह्मास राष्ट्रांतून गोळा करून सोडीव; यासाठीं कीं आह्मी तुझ्या पवित्र नामाने उपकार मानून तुझ्या स्तुतीनें नाचाजून घ्यावें. इस्राएलाचा देव याचे धन्यवाद सर्वकाळापासून सर्वकाळ पर्यंतहि व्हावे. तेव्हां सर्व लोकांनी आमेन बोलून परमेश्वराची स्तुति करावी. परमेश्वर आमचा देव, याला तुह्मी उंच माना, आणि त्याच्या पायांच्या आसना जवळ भजा; तो पवित्र आहे. परमेश्वर आमचा देव, याला तुह्मी उंच माना; आणि त्याचा पवित्र डोंगरावर भजा; कां तर परमेश्वर आमचा देव पवित्र आहे. आणि तो ममताळू होता, यास्तव त्यानें अन्यायाची क्षमा केली, नाश केला नाहीं; त्यानें बहुत वेळ

आपला राग टाळिला आणि आपला सर्व संताप चेतविला नाहीं. हे परमेश्वरा, तूं आपला कळवळा मजवरून आटोपूं नको; तुझ्या दयेने व तुझ्या सत्यतेने मला अखंड राखावें. हे परमेश्वरा, तूं आपल्या फार ममतेची आणि आपल्या फार दयेची आठवण कर, कांतर त्या सर्वकाळापासून आहेत. जो देव त्याला पराक्रमाचा मान द्या; त्याची उत्कृष्टता इस्राएलावर व त्याचा पराक्रम अभाळांपर्यंत आहे. हे देवा, तूं आपल्या पवित्र स्थानीं भयंकर आहेस; जो लोकांस शक्ति व सामर्थ्य देतो, तोच इस्राएलाचा देव आहे; देवाची स्तुति असो.

אֵל נְקָמוֹת יי हे सूड घेणाऱ्या देवा, हे परमेश्वरा, सूड घेणाऱ्या देवा, तूं प्रकाशित हो. हे पृथ्वीच्या न्यायाधीशा तूं ऊठ, अभिमान्यांस प्रतिफळ फेडून दे. परमेश्वराकडून तारण होतें; तुझ्या लोकांवर तुझा आशीर्वाद आहे. सैन्यांचा परमेश्वर आमच्या संगतीं आहे; याकोबाचा देव आम्हास आश्रय आहे. हे सैन्यांच्या परमेश्वरा, जो माणूस तुजवर आशा ठेवितो तो धन्य. हे परमेश्वरा, तारण कर; आम्ही हाक मारितों त्या दिवशीं राजाने आम्हास उत्तर द्यावें. तूं आपल्या लोकांस तार आणि आपल्या वतनाला आशीर्वाद दे; त्यांचा मेंढपाळ असा हो; आणि त्यांस सर्वकाळ वाहा. आमचा जीव परमेश्वराची वाट पाहतो; तो आमचें सहाय व आमची ढाल आहे. यास्तव आमच्या ह्रदयाचा संतोष त्यावर होईल, कांतर आम्ही त्याच्या पवित्र नामावर आशा ठेविली आहे. हे परमेश्वरा, जसी आम्ही तुजवर आशा ठेविली आहे, तसी तुझी दया आम्हावर होवो. हे परमेश्वरा, तूं आपली दया आम्हास दाखीव, आणि आपलें तारण आम्हास दे. तूं आमच्या सहायासाठीं ऊठ आणि आपल्या दयेमुळें आम्हास खंडून सोडीव. मी तुझा देव परमेश्वर ज्याने तुला मिसरदेशांतून वर आणिलें, तो मी आहें;

तूं आपलें तोंड उघड, म्हणजे मी तें भरीन. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य. परंतु म्या तुझ्या दयेवर आशा ठेविली आहे; तुझ्या कडून जें तारण त्यामुळें माझें ह्रदय हर्षित होईल.

ארוממך יי गीत ३०

לדוד ברכי נפשי את יי गीत१०३

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे. (दोन वेळा.)

יי מלך परमेश्वर राज्य करितो; परमेश्वरानें राज्य केलें; परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. (दो. वे)

והיה יי למלך आणि परमेश्वर सर्व पृथ्वीचा राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. • हे परमेश्वरा, आमच्या देवा; आम्ही तुझ्या पवित्र नामाने उपकार मानावे, आणि तुझ्या स्तुतीनें उत्सव करावा, म्हणून तूं आह्मास तार आणि राष्ट्रांमधून आम्हास एकवट कर. इस्राएलाचा देव याचे धन्यवाद सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंतहि व्हावे; तेव्हां सर्व लोकांनी तथास्तु बोलून परमेश्वराची स्तुति करावी. प्रत्येक श्वासवानाने परमेश्वराला स्तवावें. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

למנצח מזמור לדוד गीत १९

רננו צדיקים ביי गीत ३३

לדוד בשנותו गीत ३४

תפלה למשה गीत ९०

ישב בסתר עליון गीत ९१

למנצח על הגתית לאסף गीत ८१

מזמור שירו ליי गीत ९८

שיר למעלות אשא עיני गीत १२१

שיר המעלות לדוד שמחתי गीत १२२

גית १२३ שיר המעלות אליך נשאתי
גית १२४ שיר המעלות לולי יי
גית १३५ הללויה הללו את שם יי
גית १३६ הודו ליי כי טוב

ברוך שאמר जो बोलला आणि पृथ्वी झाली तो धन्य; जो बोलतो आणि करितो तो धन्य; जो ठरवितो व स्थापितो तो धन्य; ज्याने प्रारंभीं (जग) उत्पन्न केलें तो धन्य; जो पृथ्वीवर दया करितो तो धन्य; जो प्राणिमात्रांवर दया करितो तो धन्य; जो आपल्या भिणाऱ्यांस चांगलें वेतन देतो तो धन्य; जो अंधार घालवून प्रकाश आणितो तो धन्य; सदा जीवंत व सर्वकाळ स्थापित जो देव तो धन्य; ज्याच्यापुढें दुष्टाई टिकत नाहीं, ज्यास विसर पडत नाहीं, आणि जो तोंड ओळख धरीत नाहीं व लांच घेत नाहीं तो धन्य; तो आपल्या सर्व मार्गांत यथार्थ व सर्व कामांत दयाळू आहे; जो खंडून घेतो व सोडवितो तो धन्य आहे; ज्याने आपले लोक इस्राएल यांस (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाचा दिवस व पवित्र मेळामिळण्याचा हा सुदिन दिल्हा तो धन्य.

ברוך הוא וברוך שמו तो धन्य, त्याचें नाव धन्य, आणि त्याचें स्मरणहि सर्वकाळ धन्य आहे. हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, मोठ्या व पवित्र राजा, दयाळू बापा, आपल्या लोकांच्या मुखांकडून स्तविला जाणाऱ्या; आणि आपल्या यथार्थीच्या व भक्तांच्या जिव्हेकडून वाखाणिला व गौरविला जाणाऱ्या, तूं धन्य आहेस. आणि हे परमेश्वरा! आमच्या देवा, तुझा सेवक दावीद याच्या गीतांकडून आम्ही तुझी स्तुति करूं, स्तवनाकडून व कीर्त्तना कडून तुला आम्ही सन्मान देऊं, थोर मानूं, स्तवूं, गौरवूं आणि उंचावूं, आमचा राजा असें मान्य करूं, पवित्र मानूं व तुझें भय धरूं. आ.

णि हे आमच्या राजा, आमच्या देवा, सर्वकाळ जीवंत असणारा जो एकच, स्तविलेला, आणि ज्याचें नाम सदासर्वकाळ गौरविलेलें, आम्ही तुझें नाम स्मरूं; हे परमेश्वरा ! आमच्या देवा, स्तवनांकडून गौरविलेल्या राजा, तूं धन्य आहेस.

מזמור שיר ליום השבת गीत ९२

יי מלך गीत ९३

מזמור לתודה गीत १००

יהי כבוד יי परमेश्वराचें गौरव सर्वकाळपर्यंत होत जाईल; परमेश्वर आपल्या कृत्यांवर संतुष्ट होईल. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाव धन्य धन्य म्हटलें जावो. सूर्याच्या उगवतीपासून त्याच्या मावळतीपर्यंत परमेश्वराच्या नावाची स्तुति असो. सर्व राष्ट्रांवर परमेश्वर उंच आहे; त्याचें गौरव आकाशांत आहे. हे परमेश्वरा, तुझें नाम सर्वकालिक आहे; तुझें स्मरण, हे परमेश्वरा, पिढोपिढीं आहे. परमेश्वराने आपलें सिंहासन आकाशांत स्थापिलें आहे, आणि त्याचा राज्याधिकार सर्वांवर आहे. आकाशाने आनंद करावा;आणि पृथ्वीने हर्षावें; आणि तीं राष्ट्रांत सांगतात कीं, परमेश्वर राज्य करितो परमेश्वराने राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. परमेश्वर सदासर्वकाळ राजा आहे; त्याच्या देशांतून राष्ट्रांचा नाश झाला आहे. परमेश्वर लोकांचा विचार नाहींसा करितो; मुलुखांच्या योजना निरस करितो. मनुष्याच्या मनांत बहुत कल्पना असतात, परंतु जो परमेश्वराचा संकल्प तोच ठरेल. परमेश्वराचा विचार सर्वकाळ टिकतो; त्याच्या मनांतल्या योजना पिढोपिढीं चालतात. कारण तो बोलतांच, ती (पृथ्वी) झाली; त्याने आज्ञा करितांच ती स्थिर राहिली. कांतर परमेश्वराने सीयोन निवडून घेतलें, आपल्या राहण्यासाठीं इच्छिलें आहे कांकीं परमेश्वराने आपल्यासाठीं याकोब, आपलें स्वकीयधन

होण्यासाठीं इस्राएल निवडून घेतला आहे. कांतर परमेश्वर आपल्या लोकाला सोडीत नाहीं; आणि आपल्या वतनाला टाकीत नाहीं. तथापि तो ममताळू आहे, यास्तव तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करीत नाहीं; तो बहुत वेळ आपला राग टाळितो आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं. हे परमेश्वरा, तारण कर; आम्ही हाक मारितों, त्यादिवशीं राजानें आम्हास उत्तर द्यावें.

אשרי יושבי ביתך जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५
הללויה הללי נפשי गीत १४६
הללויה כי טוב गीत १४७
הללויה הללו את יי गीत १४८
הללויה שירו ליי गीत १४९
הללויה הללו אל בקדשו गीत १५०

ברוך יי לעולם परमेश्वराची सर्वकाळ स्तुति असो. आमेन व आमेन. यरूशालेमांत वस्ति करितो जो परमेश्वर त्याची सीयोनांतून स्तुति असो. तुम्ही परमेश्वराचें स्तवन करा. परमेश्वर देव इस्राएलाचा देव, त्याची स्तुति असावी; केवळ तोच आश्चर्य कृत्यें करितो. त्याच्या गौरवी नामाची स्तुति सर्वकाळ ही असावी, आणि त्याच्या गौरवानें सर्व पृथ्वी भरली जावी. आमेन व आमेन.

ויברך דוד अणखी दावीदानें सर्व समुदायाच्या देखतां परमेश्वराची स्तुति केली; तेव्हां दावीदानें म्हटलें "हे परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, आमच्या बापा, सर्वकाळापासून सर्व-

काळपर्यंत तुझी स्तुति व्हावी. हे परमेश्वरा, मोठेपणा, व पराक्रम व तेज व जय व मान, हीं तुझीं; कारण कीं जें आकाशांत व पृथ्वींत तें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य आणि सर्वांवरला मुख्य अधिकार तुझा आहे. संपत्ति व गौरवहि तुझ्याकडून होतें, आणि तूं सर्वांवर अधिकार करितोस; तुझ्याच हातीं शक्ति व पराक्रम, आणि सर्वांस मोठेपण व शक्ति देणें हें तुझ्या हातीं आहे. तर हे आमच्या देवा, आतां आम्हीं तुझे उपकार मानितों, आणि तुझ्या अतितेजस्वी नामाची स्तुति करितों. आणि तुझें गौरव विशिष्ट नाम सर्व स्तुति व प्रशंसा यांवरतीं उंचावलेलें असतां वंदिलें जावें. तूंच तूं मात्र परमेश्वर आहेस; त्वां आकाशें, आकाशांचीं आकाशें व त्यांचीं सर्व सैन्यें, पृथ्वी व जें कांहीं तिजवर आहे, समुद्र व त्यांतलें सर्व उत्पन्न केलेलें व तीं सर्व तूं वाचवितोस व आकाशाचीं सैन्यें तुझें भजन करितात. तूं परमेश्वर देव आहेस, ज्या त्वां आब्राहामाला निवडून खास्द्यांच्या ऊर गावांतून काढून घेतलें, आणि त्याचें नाम आब्राहाम ठेविलें. आणि त्याचें मन तुजपुढें विश्वासू असें सांपडलें, आणि खनानी, हित्ती, अमोरी व परिज्जी व यबूसी व गिर्गाशी, यांचा देश त्याच्या संततीला द्यायाला त्यासीं करार केला, आणि आपलीं वचनें खरीं केलीं आहेत, कांकीं तूं सात्विक आहेस. आणि त्वां मिसरांत आमच्या पूर्वजांची पीडा पाहिली, आणि सूफ समुद्राजवळ त्यांची आरोळी ऐकिली. आणि फारोवर व त्याच्या सर्व चाकरांवर व त्याच्या देशच्या सर्व लोकावर अद्भुतें व उत्पात केले, कां कीं त्यांनीं त्यांजवर गर्व केला असें त्वा जाणिलें, आणि आजच्या प्रमाणें आपल्याला नाम प्राप्त केलें. तेव्हां त्वां त्यांपुढें समुद्र दुभागला, मग ते समुद्रामधून कोरड्या भूमीवरून पार गेले, आणि त्यांच्या पाठीस जे लागले, ते त्वां जसा धोंडा खोल पाण्यांत तसे अगाधांत टाकून दिल्हे.

" וַיּוֹשַׁע " तसें त्या दिवशीं परमेश्वराने इस्राएलास मिसऱ्यांच्या हातांतून सोडविलें, आणि इस्राएलाने समुद्राच्या काठीं मिसरी मेलेले पाहिले. तेव्हां जो मोठा पराक्रम परमेश्वराने मिसऱ्यांवर केला, तो इस्राएलाने पाहिला; तेव्हां लोकांनी परमेश्वराचें भय धरिलें आणि परमेश्वरावर व त्याचा सेवक मोशे यावर भरंवसा ठेविला.

אָז יָשִׁיר מֹשֶׁה मग इस्राएलाच्या संतानासुद्धां मोशाने परमेश्वराला हें गायन गाऊन असें म्हटलें कीं, परमेश्वराला मी गाईन, त्याने तर जयच जय केला आहे; त्याने घोडा व त्यावरील स्वार समुद्रांत टाकिला आहे. परमेश्वर माझें बळ व कीर्त्तनपात्र, कांकीं तो माझा तारण झाला आहे; तो माझा देव, म्हणून मी त्याचें गौरव करीन; तो माझ्या पूर्वजांचा देव, म्हणून मी त्याला थोर मानीन. परमेश्वर युद्ध करणारा, त्याचें नाम परमेश्वर. त्याने फारोचे रथ व त्याचें सैन्य समुद्रांत टाकिलें आहे; त्याचे निवडलेले सरदारहि सूफ समुद्रांत बुडाले. जळानी त्यांस झांकिलें, ते धोंड्यासारिखे तळीं गेले. हे परमेश्वरा, तुझा उजवा हात बळाने महान झाला; हे परमेश्वरा, तुझ्या उजव्या हाताने शत्रूला आपटून टाकिलें आहे. त्वां आपल्या वरील उठणाऱ्यांस आपल्या अतिथोरपणाने पाडिलें आहे; त्वा आपला मोठा संताप लाविला, याकडून ते भुसासारिखे नष्ट झाले. तेव्हां तुझ्या नाकपुड्यांच्या स्वासाने पाणी गोळा झालें, राशी सारिखे ओघ उभे राहिले, समुद्राच्या पोटांत जळें थिजलीं. शत्रूने म्हटलें, मी पाठीस लागेन, मी आटोपीन, मी लूट वांटीन, माझा जीव त्याकडून तृप्त होईल; माझी तरवार उपसीन, माझा हात त्यांचें ग्रहण करील. त्वा आपल्या वाऱ्याने फुंकिलें; समुद्राने त्यांस झांकिलें; ते शिस्या सारिखे महापाण्यांत बुडाले.

हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्या सारिखा कोण! पवित्रतेनें तुझ्या सारिखा महान कोण! (तूं) स्तवण्याविषयीं भयमान, चमत्कार कर्त्ता आहेस. त्वां आपला उजवा हात लांबविला, पृथ्वीनें त्यांस गिळिलें. त्वां हे खंडून घेतलेले लोक दयेनें आणिले, आपल्या सामर्थ्यानें आपल्या पवित्र स्थानाकडे नेले. राष्ट्रें ऐकून कांपतील, आपलेशेतांतील राहणाऱ्यांस दुःख व्याप्त करील. तेव्हां अदोमाचे अग्रसर विस्मित होतील; मोआबी बलाढ्य यांस कंप व्यापील; खनानांतील सर्व राहणारे विरून जातील. भय व घाबरेपण त्यांवर पडेल, तुझ्या मोठ्या भुजामुळें ते दगडासारिखे एथपर्यंत स्तब्ध होतील कीं, हे परमेश्वरा, तुझे लोक पार जातील, जे लोक त्वां विकत घेतले ते पार जातील. तोंपर्यंत तूं त्यांस आणून आपल्या वतनाच्या डोंगरांत लावसील; हे परमेश्वरा, तें ठिकाण त्वां आपल्या वस्ती साठीं केलें आहे; हे प्रभू, तें पवित्र स्थान तुझ्या हातानी सिद्ध केलें आहे. परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील. (परमेश्वराचें राज्य सर्वकाळ आणि सर्वकाळांच्या सर्वकाळ स्थापित आहे) कांतर फारोचे घोडे त्याच्या रथासुद्धां व त्याच्या स्वारांसुद्धां समुद्रांत गेले, आणि परमेश्वरानें समुद्राचें पाणी त्यांजवर फिरवून आणिलें, परंतु इस्राएलाचीं संतानें समुद्राच्यामधून कोरड्या भूमीवरून गेलीं.

כי ליי המלוכה कांतर राज्य परमेश्वराचें आहे; तोच राष्ट्रांवर अधिकार करितो. आणि एसावाच्या पर्वताचा न्याय करायाला सीयोन पर्वतावर तारणारे चढतील; आणि राज्य परमेश्वराचें असत जाईल. आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या शास्त्रांतहि लिहिलें आहे कीं, हे इस्राएला, ऐक; परमेश्वर, आमचा देव आहे; आणि परमेश्वर एकच आहे.

שחרית पाहांटेची प्रार्थना

पहिल्या दिवशीं

אלהי אל תדינני हे देवा, माझ्या अतिक्रमा प्रमाणे माझा न्याय करूं नको; आणि माझीं (दुष्ट) कृत्यें माझ्या उदराकडे (जीवाकडे) मोजूं नको. तूं आपल्या दयेनें मजवर कृपा कर, ह्मणजे मी जगेन; हे देवा मी विनंती करितों कीं, मला योग्य फळ (दंड) देऊं नको. माझ्या मनांतील अहंकार मी तुजपुढें नमवितों; आणि दुःखानें आपला झगा नव्हे, परंतु आपलें मन फाडितों. माझ्या उल्लंघनामुळें, पुष्कळ दुष्टाईमुळें, आणि मूर्खपणामुळें माझें मन मूर्छित होऊन मी उभा आहें. मी द्राक्षरसानें मस्त झालों नाहीं, परंतु दुःखानें गांजलेला असून जसा नाहींसाच होतों, कारण तुझ्या मार्गापासून मी आपलीं पावलें व पांय वळविले. मी काय उत्तर देऊं? आणि सहायाकरितां कोठें वळूं? न्यायाच्या दिवशीं मी कोठें पळूं? आणि मला कोण आश्रय देईल? म्या जाणून केलेलीं पापें माझ्या तोंडाच्या व दृष्टीच्या समोर आहेत; आणि माझी लज्जा माझ्या समोर व माझ्या जवळच आहे. माझ्या पापांची घाण माझ्या शेजाऱ्यांस येती; म्हणून ते मजपासून पळतात, आणि माझ्या शीमेपासून दूर जातात. मी अशुद्ध मनाचा असून वांकडा वर्तणारा बंडखोर असा आहें; कारण माझें मन मजमध्यें सर्व पापांकडे वळणारें आहे. जेव्हां तीं माझ्या मनांत आलीं, तेव्हां मी त्यांस ओळखिलें, मी आपल्या उजव्या व डाव्या बाजूकडेस त्यांस पाहिलें. जसें धसकट (इकडे तिकडे उडविलें जातें,) तसें (पापाकडे वळवायास) माझा पाठलाग केला व मला ओढलें; यद्यपि माझा हट्ट मोडला व निचावला नाहीं. हे परमेश्वरा, काकळूत करितांना माझे डोळे तुजकडे लागले आहेत; माझ्या

दुःखाच्या समयीं माझें हार्द्र व माझी वाणी ऐक. माझ्या वतनाचा वांटा, माझ्या सामर्थ्याचा खडकरूप आश्रय, माझें प्रीतिपात्र, आशापात्र, आणि माझें बळ व शक्तिहि तूंच आहेस. तुजपुढील स्थापित मार्गानें तूं मला ने; आणि माझा मार्ग स्थिर कर. माझीं ऋणें मला क्षमा कर; आणि मूर्ख मेंढपाळासारिखें भटकणाऱ्या माझ्या मनास तूं सरळ कर. मी तुझा दरवाजा ठोकीत असतां माझें कन्हणें ऐक; आणि माझ्या यातना व घाय बरे कर. हे माझ्या महत्वाच्या खडकरूप आश्रया, आणि या दासत्वांत व नीचत्वामध्यें आधार देणाऱ्या, माझ्या अपराधांपासून मला सोडीव. माझ्या दुःखास सुगंध, माझ्या मनांतील हर्ष, आणि माझ्या कन्हण्यांतील व शोकांतील आनंद (तूंच आहेस.) मी शोक करीत तुजपुढें येऊन नमतों; आणि तुजपासून क्षमा मागतांना मजमध्यें कांहींच सामर्थ्य राहत नाहीं. हे आनंता ! पाहा, तुझी आठवण माझ्या मनांत व माझ्या लक्षांत रात्रंदिवस आहे. हे सत्याच्या देवा, माझी विनंती मान्य कर, आणि मला प्रसन्न हो; आणि माझें स्तुतिरूप अर्पण तुला संतोषित करो. माझ्या आयुष्याच्या नेमलेल्या दिवसांत तूं मला चालीव; आणि या क्षणभंगुर जगांतील दिवसांत तूं माझें मेंढवळण कर. मजवर दया करून माझीं दुष्कर्में मला क्षमा कर; आणि माझें कीर्त्तन माहाली आणि मुशी * यांच्या कीर्त्तनाप्रमाणें मान्य कर. जेव्हां तूं घडिवलेले पदार्थ न्यायांत आणशील, तेव्हां हे देवा, माझ्या अतिक्रमाप्रमाणें माझा न्याय करूं नको.

רעה בשבטך जे तारणाची वाट पाहतात, त्या लोकांचें तूं आपल्या काठीनें मेंढवळण कर; कारण आज ते तुझ्या न्यायापुढें उभे आहेत.

מחשבות אוני मी आपले अभिमानी विचार

* माहाली आणि मुशी हे दोघे लेवी होते.

आपल्या मनांत ठेवितों (आणितों), आणि माझ्या अहंकारामुळें मला लज्जा प्राप्त होती व मी घाबरतों; आणि पाहा, मी माझ्या पुष्कळ अपराधांविषयीं पश्चात्ताप करितों; आणि आज मी आपलीं पापें आठवितों.

שקרי סתריו ज्या लबाड्या त्याने गुप्तांत मूर्खपणाने केल्या, त्यांविषयीं क्षमा मागायास त्याचे अवयव भयभीत होतात; ज्या मनुष्याचीं वचनें पापाने विटाळलीं आहेत, तीं कशीं वाढतील! त्याचे विचार बाळपणापासून सर्व दिवसांमध्यें केवळ वाईट आहेत.

הוצא שבוים पाडाव करून नेलेल्यांस त्यांजवर जुलूम करणारांच्या हातांतून तूं सोडीव; त्यांच्या पापापासून त्यांस शुद्ध करून; (आणि त्यांजवर तुझी) प्रसन्नता होऊं दे; अहो खंडून काढलेले लोकांनो! ऐका, तुह्मी परमेश्वराला लगटून राहिलां; ह्मणून तुह्मी सर्व आजपर्यंत जिवंत आहां.

שואף כמו עבד जसा सेवक आपल्या धन्याच्या हातांकडून (वेतन मिळविण्याची) आवड धरितो, तसी (इस्राएलाने तुझी) आवड धरिली आहे; ह्मणून तूं आपली दया त्यावर विस्तार आणि त्याचें कर्जखत फाडून टाक. שואף

לולי אמירתך तुह्मी फिरा, ह्मणजे मी फिरेन असें तुझें वचन नसतें, तर तो अगदीं कुजल्या सारिखा होऊन त्याची स्थिति नीच झाली असती. שואף

משעול תשובתך (तुजपुढें) उभा राहिलेल्या सेवकासाठीं तुझा पश्चात्तापाचा संकोचित मार्ग उघड; त्याने तुझी प्रार्थना केल्या अगोदर त्याचीं वचनें तूं सिद्ध कर. שואף

הה לי माझे पिकलेले केंस विखरलेले आणि माझें मन मजमध्यें पापाच्या सागरांत पडलेलें असें जेव्हां मी पाहतों, तेव्हां मला हाय हाय! तें कष्टरूपी जलांत बुडालें आहे. שואף

נשמת מיחליך तुझी वाट पाहाणाऱ्यांचा जीव माझ्या मनाशीं निश्चयपूर्वक सांगतो, कीं फिरल्या नंतर (पश्चात्ताप केल्यानंतर) तो पुनः अन्याय करणार नाहीं.

שופט כל הארץ हे सर्व जगाच्या न्यायाधीशा, आणि (सर्वांस) न्यायांत उभे करणाऱ्या, तुला मी विनंती करितों कीं, दरिद्री लोकांकरितां तूं जीवन व दया बांध (वाढीव). आणि ही पाहांटेची प्रार्थना तूं होमा बद्दल मान्य कर.

עולת הבוקר जो सकाळचा होम ह्मणजे नित्य होम (त्याबद्दल) आमची प्रार्थना मान्य कर.

לובש צדקה हे यथार्थता पांघरणाऱ्या व धारण करणाऱ्या, अधिकार तुलाच मात्र (शोभतो); आणि जर आम्हामध्यें कांहींच सत्कर्म नसलीं, तर (आह्माकरितां) हेब्रोनांत निजणारांची* आठवण कर. हे परमेश्वरा, ते तुजपुढें आठवणी करितां सर्वकाळ चढोत (असोत). עולת הבוקר

מטה כלפי חסד हे दयेकडे वळणाऱ्या आणि मनुष्यास जीवनाकडे चालविणाऱ्या, तूं आपल्या लोकाकडे दयेने फीर; त्याजवर दया कर ह्मणजे तो जगेल. आणि त्याच्या कपाळावर सर्वकाळ राहील, असी खूण लिही (कर.) עולת הבוקר

הטיבה ברצונך आपल्या प्रसन्नतेने माझें पवित्र नगर सीयोन याचें बरें कर; आणि तूं आपल्या घरांत माझ्या पवित्रांस जागा व कीर्त्ती दे; आणि सर्वकाळ जळत राहावयास इशायच्या पुत्राचा दिवा तूं सिद्ध कर. עולת הבוקר

* आब्राहाम व सारा, इसहाक व रिबका, याकोब व लेआ, आणि कोणी ह्मणतात कीं आदाम व हाव्वा हीं उभयतांहि तेथेंच पुरलीं गेलीं.

חזקו ויאמץ לבבכם अहो माझ्या लोकांनो, ईश्वरामध्यें व त्याच्या सामर्थ्यामध्यें तुह्मी धैर्य व बळ धरा; तुह्मी जगावें ह्मणून एकापुढें एक त्याचे समाण नेम सांभाळा, (मग तो तुमच्या पापाचें प्रायश्चित्त करील, आणि तुह्मास आश्रय देऊन क्रोधाच्या समयीं दया आठवील;) परमेश्वरास व त्याच्या सामर्थ्यास तुह्मीं शोधा, आणि सर्वकाळ त्यापुढें विनंती करा. עולת הבוקר

בני עבדיך तुझ्या सेवकांचीं लेंकरें आज तुझ्या देवालयांत आलीं आहेत; (आणि तीं आपल्या पापाविषयीं (तुजपुढें) ओरडत आणि आपल्या अतिक्रमांविषयीं शोक करीत आहेत; तीं आपलें हाड ओतीत (कळवीत) आणि जीवन मागत आहेत;) तीं आपल्या पूर्वजांच्या पुण्याची आठवण करितात, हे परमेश्वरा! ते (त्यांचे पूर्वज) त्यांजवर जगोत (त्यांची आठवण सर्वकाळ राहो;) तूं त्यांस आठीव आणि ते सर्वकाळ, परमेश्वरा समोर असोत. עולת הבוקר

दुसऱ्या दिवशीं

יום זה דר במרומים उंचांत वस्ति करणारा आणि सर्व गुप्त गोष्टी जाणणारा खडकरूप आश्रय, आज सर्व लोकांस, त्यांच्या कृत्यांची झडती घेण्यासाठीं न्यायांत उभे करितो; मी विनंती करितों कीं, ज्या वेळीं ते सर्व ह्मणतात कीं, याच दिवशीं पृथ्वीनें गर्भ धरिला (उत्पन्न झाली); आणि याच दिवशीं पृथ्वीवरील सर्व घडलेले पदार्थ न्यायांत उभे केले जातात; तेव्हां इस्राएलांसाठीं सर्वकाळचा करार तूं आठीव, आणि त्यांची वाणी ऐकून लक्षांत ठेव. היום

צדקת איתן हे महत्ववान व गौरवयुक्त देवा दरिद्र्यां करितां व धिःकारलेल्यां करितां दृढ विश्वासू* आणि शेरडा

* आब्राहाम.

प्रमाणे बांधला गेलेला एकुलता,+ यांचें पुण्य तूं आठीव. गरीब व दुबळयांवर प्रकाशीत हो व थोर मानिला जा; गांजलेल्यांनी लज्जित होऊं नये. היום

חמול בנים तुजपुढें आपलें मन ओतणाऱ्या (हाई सांगणाऱ्या) व धुळीसारिखे झालेल्या लेंकरांची तुला करुणा येवो; आजच्या नेमलेल्या वेळीं ते आठवणीनें व करणा वाजवून तुझा राज्याधिकार मान्य करितात; आणि नऊ धन्यवाद योजून तितक्याच वेळा (शोफार) वाजवितात; * त्यांची स्तुति व त्याचें कीर्त्तन तुला मेंढरांगुरांपेक्षां अधिक चांगलें वाटो. היום

קול שופר तूं त्यास शोफाराची वाणी ऐकीव, ह्मणजे तो तुझ्या वस्तिस्थानाकडे चढून जाईल; आणि तो प्रार्थना करीत व करणा वाजवीत असतां, आतां तूं आपला कान लाव; हे माझ्या तारणाच्या खडकरूप आश्रया! माझा न्याय तुज पुढून काढून टांकिला जावो; हे माझ्या राजा! तूं आपली दृष्टी मजवरून लपवूं नको. היום

दुसऱ्या दिवशीं.

יוד योद.

יי יום לך אערוך हे परमेश्वरा, आज तुजकडे मी आपली प्रार्थना सिद्ध करितों; हे परमेश्वरा, माझी वाणी व विनंती ऐक.

हे परमेश्वरा, तुझा हात दाखीव, व तुझें सामर्थ्य प्रगट कर; आणि हे परमेश्वरा, मजवर दया कर.

हे परमेश्वरा, माझें मन मजमध्यें घाबरतें, आणि हे परमेश्वरा मी दुःखानें आच्छादलों आहें.

+ इसहाक. * टीका ६

हे परमेश्वरा, चांगल्याकरितां माझी आठवण (तुजपुढें) चढूं दे; आणि हे परमेश्वरा, माझी आठवण करून मला दर्शन दे.

हे परमेश्वरा, तुझ्या तारणाची मी सर्वकाळ वाट पाहतों; हे परमेश्वरा, माझें सांत्वन करायास तुझी दया होऊं दे.

हे परमेश्वरा, माझा घडविणारा व खडकरूप आश्रय तूंच आहेस. हे परमेश्वरा, तुजवाचून माझा सहायकारी कोण आहे?

हे परमेश्वरा, मजविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे; आणि हे परमेश्वरा माझीं पापें मनावर धरूं नको.

हे परमेश्वरा, माझे विचार तुझें एकत्व (मान्य करितात); आणि माझा जीव ह्मणतो कीं, परमेश्वर माझा वांटा आहे.

हे परमेश्वरा, माझें मन दुःखांत बुडालें आहे; यद्यपि हे परमेश्वरा, मी आपला जीव तुजपुढें ओतितों.

हे अनंत परमेश्वरा ! तूं आपल्या नावांकरितां (माझें) ऐक; आणि हे परमेश्वरा, आज माझी प्रार्थना घे (मान्य कर.)

৯ गा हे.

हे परमेश्वरा, पाहा, माझे विचार तुझ्या हातीं आहेत; आणि हे परमेश्वरा, माझें सर्व गुह्य तुजपुढें प्रगट आहे.

हे परमेश्वरा, माझ्या घायास आरोग्यता होऊं दे; आणि हे परमेश्वरा, आपले डोळे उघडून ते पाहा.

हे परमेश्वरा, सरळपणांत माझ्या पायांस स्थापित कर; हे परमेश्वरा, मंडळीमध्यें मी तुझ्या नावाची स्तुति करीन.

हे परमेश्वरा, जोंपर्यंत तूं पाहीस आणि लक्ष देस; तोंपर्यंत हे परमेश्वरा, पाहा, मी तुझ्या तारणाची वाट पाहीन.

हे परमेश्वरा, माझ्या ओरडण्याकडे कान लाव, हे परमेश्वरा, मजवर दया करून (माझें) ऐक.

१४१ वाव.

हे परमेश्वरा, माझ्या देवा, मी तुझी वाट पाहातों, आणि हे परमेश्वरा, माझें मन तुझ्या तारणाची आवड धरितें.

हे परमेश्वरा, तुझ्या सेवकाचें बरें होण्याविषयीं त्यास हृडप दे; आणि हे परमेश्वरा, त्याचीं पापें मनावर धरूं नको.

हे परमेश्वरा, तो तुझा बंदिवान असा कोठपर्यंत राहील? आणि हे परमेश्वरा, तो आपल्या उल्लंघनाच्या बंदांत कोठपर्यंत बांधलेला राहील?

हे परमेश्वरा, माझ्या मनांत माझे सर्व विचार एकत्र होतात; हे परमेश्वरा, दुःखांत असतांहि ते तुझें एकत्व (मान्य) करितात.

हे परमेश्वरा, तुजमध्यें मी हर्ष करीन; हे परमेश्वरा, दरिद्र्यास त्याच्या सर्व काळजीपासून सोडीव.

हे परमेश्वरा जगताच्या स्वामी, मी तुझी वाट पाहीन; कारण हे परमेश्वरा, जे तुझी वाट पाहातात त्यासर्वांशीं तूं चांगला आहेस.

१५ हे

हे परमेश्वरा, जो तुझी दया शोधितो, त्याकरितां, हे परमेश्वरा तूं आपला राग थांबीव.

हे परमेश्वरा, पाहा, मी (तुजपुढें) काकळूत पाडितों (करितों;) कारण हे परमेश्वरा तुला हाक मारिल्या पूर्वीं, तूं मला उत्तर देशील.

हे परमेश्वरा, तूं आपल्या दयेनें मला निरोगी कर; आणि हे परमेश्वरा, माझ्या मूर्च्छित मनास आरोग्यता होण्यास आज्ञा कर.

हे परमेश्वरा, दुःखामुळें मी रोगी झालों आहे; आणि हे परमेश्वरा, रात्रंदिवस माझा जीव घाबरा होतो.

हे परमेश्वरा, खोल स्थानांतून मला चढीव; आणि हे परमेश्वरा, तूं आपल्या सेवकास दासत्वांतून परतीव.

נשמת כל חי हे परमेश्वरा! आमच्या देवा, सर्व प्राण्यांचा आत्मा तुझ्या नामाला धन्य म्हणतो; आणि हे आमच्या राजा! सर्व मांसमयांचा जीव तुझ्या स्मरणाचें नित्य गौरव करून प्रशंसा करितो. सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस; आम्हास तुजवांचून कोणी राजा, खंडून घेणारा, तारणारा, मुक्त करणारा, सोडविणारा, आणि दुःखाच्या व संकटाच्या समयीं उत्तर देणारा व दया करणारा कोणी नाहीं आम्हास तुजवांचून राजा, सहाय कर्त्ता व आश्रय देणारा कोणी नाहीं. हे आदिकाळच्या व अंतकाळच्या देवा! सर्व प्राण्यांच्या देवा! सर्व उत्पत्तीच्या स्वामी! तूं सर्व स्तुतींकडून वर्णिला आहेस; तूं आपल्या जगाला दयेने आणि सर्व प्राण्यांस कृपेने चालवितोस. आणि परमेश्वर जागृत आहे; तो निजत नाहीं व झोंप घेत नाहीं; झोंपी गेलेल्यांस सावध करितो; निजलेल्यांस जागृत करितो; मेलेल्यांस जीवंत करितो; रोग्यांस निरोगी करितो; आंधळ्यांस दृष्टी देतो; ओणव्यांस उभे करितो; मुक्यांस वाचा देतो; गुप्त गोष्टी प्रगट करितो; (हे देवा,) तुजपुढेंच मात्र आम्ही नमन करितों.

ואלו פינו जरी आमचे मुखांत सागराप्रमाणे गायन; आमच्या जिव्हेंत त्यांतील लाटांच्या गर्जनेसारिखी स्तुति; आमच्या ओठांत विस्तीर्ण अंतराळासारिखें कीर्त्तन; आणि जरी आमचे डोळे सूर्य व चंद्रा यांसारिख्या तेजाने भरले आहेत; आमचे हात आकाशांतील गरुडा सारिखे पसरले आहेत; आणि आमचे पाय हरणासारिखे चपळ आहेत; तरी हे परमेश्वरा!

आमच्या देवा, पूर्वी त्वां आम्हांवर व आमच्या पूर्वजांवर जे हजारो व लक्षावधि उपकार, चिन्हें व चमत्कार केले आहेस, त्यांतील एकाकरितांहि तुझें स्तवन करायास; आणि हे आमच्या राजा, तुझें नाम सुवंदित करायास आह्मामध्यें पूर्णता नाहीं. हे परमेश्वरा! आमच्या देवा, त्वां आह्मास मिसरांतून काढिलें; दासांच्या वस्तींतून त्वां आम्हांस सोडविलें; दुष्काळांत अन्न पुरविलें; सुकाळांत आम्हास पोषिलें; तरवारीपासून आम्हास मुक्त केलें; पटकींतून आम्हास वांचविलें; आणि वाईट व पुष्कळ रोगांपासून आम्हास सोडविलें. एथपर्यंत (आजपर्यंत) तुझ्या दयेनें आमचें सहाय केलें, आणि तुझ्या कृपेनें आम्हास सोडिलें नाहीं; म्हणून जे निरनिराळे अवयव त्वां आम्हामध्यें (उत्पन्न) केले आहेस; जो आत्मा व जीव आम्हामध्यें फुंकिला आहेस; आणि जी जीभ आमच्या मुखांत ठेविली आहेस; पाहा! तीं, हे आमच्या राजा, तुझ्या नावाला सर्वकाळ स्तवितील, धन्य म्हणतील, वाखाणितील, गौरव करितील आणि गातील. कारण सर्व मुखें तुझेंच स्तवन करितील; सर्व जिव्हा तुलाच वाखाणितील, सर्व डोळे तुजकडेसच लागतील; सर्व गुडघे तुजपुढेंच टेंकले जातील; सर्व बांधे (मनुष्यांचीं शरीरें) तुजपुढेंच नमन करितील; सर्व मनें तुझेंच भय धरितील; आणि सर्व अंतर्यामें व गूर्दकमळें तुझ्याच नांवाचें स्तवन करितील. जसें म्हटलें आहे कीं, माझीं सर्व हाडें म्हणतील कीं, "हे परमेश्वरा! तुझ्यासारिखा कोण? दीनापेक्षा जो शक्तिमान त्यापासून आणि दीनाला व दरिद्र्याला त्याच्या लुटणाऱ्यापासून तूं सोडवितोस; दीनाची विनंती तूं ऐकितोस आणि गरीबांच्या ओरडण्याकडे कान लाऊन त्याचें तारण करितोस." आणखी असें लिहिलें आहे कीं, "अहो नीतिमान, तुम्ही परमेश्वरा विषयीं हर्ष शब्द करा; कीर्तन करणें हें सरळांस शोभतें; सरळांच्या मुखांकडून तूं उचावला

जाशील; पुण्यवंतांच्या ओठांकडून सुवंदित होशील; यथार्थांच्या जिव्हेकडून पवित्र मानिला जाशील; आणि पवित्र लोकांमध्यें तुझी स्तुति केली जाईल."

במקהלות तुझे लोक इस्राएल यांच्या घराण्यांच्या दाहा हजारांच्या मंडळ्यामध्येंहि (असें तुझें गौरव केलें जाईल); कारण सर्व उत्पन्न केलेले पदार्थांचा असा धर्म आहे कीं, इशायचा पुत्र दावीद याच्या गीतांपेक्षां व स्तुतिपेक्षां त्यांनी तुझी अधिक स्तुति करावी, स्तवन करावें, सुवंदन करावें, गौरव करावें, उंचावावें, सन्मान करावा, आणि वाखाणावें.

ובכן ישתבח שמך यास्तव, हे आमच्या राजा; तुझें नाम सर्वकाळ सुवंदित असो: आकाशांत व पृथ्वींत तूंच सर्वाधिकारी, मोठा, व पवित्र देव आहेस; कारण, हे परमेश्वरा आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, गायन व सुवंदन, स्तुति व कीर्त्तन, शक्ति व अधिकार, जयजयकार, मोठेपणा व सामर्थ्य, स्तवन व गौरव, पवित्रता व राज्य हें तुलाच, आणि धन्यवाद व उपकार स्तुति तुझ्याच मोठ्या व पवित्र नामाला शोभतात; आणि सर्वकाळांपासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस. हे परमेश्वरा! मोठ्या व स्तुतिकडून वर्णिलेल्या राजा, महत्ववान देवा, आश्चर्य कृत्यांच्या स्वामी, सर्व माण्यास उत्पन्न करणाऱ्या, सर्व कामांच्या धनी, कीर्त्तनाच्या गायनामध्यें आवड धरणाऱ्या, जगतांच्या जीवंत देव राजा, तूं धन्य आहेस. आमेन.

पाहिल्या दिवशीं हें बोलावें.

ידיך רשים (हे देवा!) तुझ्या दरिद्री लोकांचे हात मकिळीक मिळवायास खंडणी भरण्यासाठीं अशक्त (खालीं) झाले आहेत, परंतु (सरळ) अंतःकरणानें व कडवटपणे (खेदानें) शोक करीत ते आपल्या उत्पन्न कर्त्या समोर आले आहेत; ते विलक्षण लोक असून दरिद्री होत आहेत, यद्यपि त्यांची मार्थ-

ना उंच (स्वराने) चालत आहे; जेव्हां ते आपल्या मंडळगृहांत-एकवट होतात, तेव्हां याकोबाचा पवित्र आणि इस्राएलाचा देव, यास पवित्र मानायाकरितां त्यांच्या कंठांत (मुखांत) स्तुति असते.

הלא אם סף जरी मंदिर व (पवित्र) भांडीं नाहिंसीं झालीं आहेत, आणि जरी एफोदें, तेराफीमें[1], पडदा, दर्शनीय भाकऱ्यांच्या पंक्ति, निव्यार्पणे व अधिक अर्पणे यांशिवाय ते आहेत, आणि जरी त्यांच्या अपराधांची क्षमा होण्याकरितां धूप आणि दयासनहि नाहीं; तरी इस्राएलांत सेराफीमां सारिखी ईश्वराची पवित्रता आहे; आणि दुःखांत असतां दासत्वाच्या घरांतहि (देशांतहि) देवाचें स्तवन करायास ते एकवट होतात; आणि इस्राएलाच्या पुत्रांचीं सैन्यांचीं सैन्यें याकोबाचा पवित्र व इस्राएलाचा देव यास पवित्र मानायास एकत्र होऊन जातात.

ואל נושא तूं पूर्वीं त्यांस क्षमाशील देव, आणि खडकरूप आश्रय असा होतास, त्वां त्यांचा झेंडा करुबांवर आणि ताऱ्यांवर उंचावला, आपल्या नामाने आपल्या उंचस्थानांतून त्यांवर छाया केली, दूतांस त्यांचीं शस्त्रें वाहणारे नेमिले होते; परंतु पाहा, आतां त्यांच्या राजाचा व त्यांच्या सैन्याचाहि हात (सामर्थ्य) मोडला आहे, परकयाने त्यांचें वतन घेऊन त्यांस हाकून लाविलें आहे; याकोबाचा पवित्र आणि इस्राएलाचा देव यास पवित्र मानायास इस्राएलाचें संतान राहिलें नाहीं असें झालें आहे.

דרור יקושה फासांत गुंतलेली चिमणी[3] गर्विष्ठ

---

१ मुख्य उपाध्याचा झगा, ज्यावर ऊरपट लावीत असे तो.

२ शास्त्रांत ज्या ठिकाणी तेराफीम हा शब्द सांपडतो तेथें बहुत करून शकून पाहाण्याच्या संबंधाने लावलेला आहे; ह्मणून तेराफीम हे शकून सांगणारे पदार्थ होते असें समजावें.

३ दासत्वांत पडलेले इस्राएल.

स्वामीच्या हातांतून सुटायास शोधितें; हे तिच्या आशा पात्रा! अगाध पाण्यांतून तिला काढ, आणि जेव्हां तूं तिच्या पूर्वजांचें पुण्य तोलून पाहतोस, तेव्हां तें हलकें न भरो; तुजकडे विनंती करायास जो दरिद्री त्वरित येतो त्यास दर्शन दे, त्याच्या पूर्वजांची पिढी आणि त्याचे सर्व मेलेले थोडक्याच वर्षांत जीवंत होवोत; आणि त्यांनी याकोबाचा पवित्र आणि इस्राएलाचा देव यास पवित्र मानावें, ह्मणून जसी दंहिवराने तसी त्यांस विश्रांति देऊन त्यांस सजीव कर.

המבורך जो खालच्या व वरच्या पदार्थांपेक्षां सर्व प्रकारें धन्य आहे, त्याजविषयीं व त्याच्या कृत्यांविषयींहि अग्नि, पाणी, आकाश व पृथ्वी जी अवलंबून राहिली आहे, हीं साक्ष देतात, कीं तीं किती महान व किती आश्चर्य कारक आहेत! त्याचे सेवक व त्याच्या हाताखालचीं शेरडें त्याच्या न्यायापुढें उभीं आहेत; सेलाह. ज्या दिवशीं तो आपल्या जगांतील (सर्व) मनुष्यांची झडती घेईल, तेव्हां दुष्टाईचें मुख बंद केलें जाईल; आणि याकोबाचा पवित्र व इस्राएलाचा देव यास पवित्र मानायास इस्राएलाचें सर्व संतान त्याजमध्यें यथार्थ व प्रशंसित होईल.

दुसऱ्या दिवशीं हें बोलावें.

יה שמך हे अनंता! मी तुझें नाम उंचावीन, आणि तुझी यथार्थता लपवून ठेवणार नाहीं; मी ऐकिलें व विश्वासिलें आहे; मी त्याविषयीं विचारणार व शोध करणार नाहीं; मातीचा घडलेला (मनुष्य) आपल्या घडणारास, तूं काय करितोस? असें कसें ह्मणेल! मी त्याचा शोध केल्या अंतीं, तो सामर्थ्याचा दुर्ग व खडक रूप आश्रय, तेजस्वी व प्रदीप्त, आच्छादला व लपविला न जाणारा प्रकाश आहे, असा मला सांपडला.

ישתבח तो सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविला आणि वर्णिला असो.

הדר כבודך आकाश (मंडळ) उगवतांना व मावळतांना नमनकरून तुझ्या महत्वाचें तेज आणि तुझ्या हाताचें सामर्थ्य वर्णितें; आणि हे ओठांचें फल (शब्द) उत्पन्न, करणाऱ्या दगड, अग्नि आणि पाणी यांतून चालणारे दूत तुजविषयीं साक्ष देतात, आणि तुला स्तवितात कीं, तुला भुजा व हात नसतांहि तूं खालच्या व वरच्या पदार्थांस, प्राणिमात्रांस आणि आपल्या आसनास सांभाळतोस आणि कधींहि थकत नाहींस. ישתבח

ומי ימלל ज्याने आपल्या सत्यतेने आकाश उत्पन्न केलें, जो सर्वकाळ जीवंत आहे आणि जो आपल्या उंच वसति स्थानांत गुप्त असतो, त्याचे गौरवाचें वर्णन कोण करील! परंतु त्याने आपल्या घरच्या पुत्रास प्रसन्न होऊन आपलें माहात्म्य (साक्षातपणाच्या) राहुटींत ठेवलें होतें; आणि तेथें आपली प्रतिमा दाखविण्यासाठीं दृष्टांत दाखविता झाला; परंतु त्याला कशाचाहि सारखेपणा व आकार नाहीं, आणि त्याच्या बुद्धीलाहि अंत नाहीं; त्याच्या भविष्यवाद्याच्या डोळ्यांनी उंच व थोर राजाच्या महात्म्यासारिखें मात्र कांहीं पाहिलें. ישתבח

דבר גבורות ज्याच्या पराक्रमाच्या गोष्टींस गणती नाहीं, त्याची स्तुति कोण करू शकेल! जो मनुष्य त्याच्या पराक्रमाची आठवण करायास त्या समजून घेतो, पृथ्वीस तिच्या शीमेमध्यें राखणाऱ्या देवावर आधार धरून राहतो, येतां जातां (सर्वकाळ) त्याचें भय धरितो, त्याच्या सर्व कृत्यांचें न्यायत्व मान्य करितो, आणि जें त्याने केलें, तें त्याने आपलें महत्त्व (दाखविण्याकरितां) केलें, आणि सर्व मनुष्यांचा न्याय करण्याकरितां त्याने एक भयंकर दिवस नेमिला आहे, असें जो पत्करितो, तो धन्य. ישתבח

השתונן तूं आपल्या आत्म्याच्या गुह्याविषयीं जाण,

विचारकर आणि समजून घे. तूं काय आहेस ? तुझें मूळतत्व कोठून आहे ? तुला कोणी घडिलें ? तुला बुद्धि कोणी दिल्ही ? तुला कोणी उत्पन्न केलें ? आणि कोणाच्या सामर्थ्यानें तुला चलन वलन आलें आहे ? याकडे लक्ष दे; आणि देवाचें सामर्थ्य ध्यानांत आणून, आणि आपल्या गौरवाला (जीवाला) जागृत करून त्याचीं महान कृत्यें शोधून पाहा; मात्र त्याचा शोध करायास तूं आपला हात लांबवूं नको; कारण (तसें केल्यानें) तूं आदि अंताचा आणि गुह्य व खोल गोष्टीचा शोध केल्यासारिखें होईल.

קדיש לעילא पृष्ठ ७.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

ישתבח ויתפאר राजा, राजांचा राजा आणि पवित्र व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें आणि गौरविलें जावो. पहिला तोच व शेवटलाहि तोच आणि त्यावांचून कोणी देव नाहीं. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुती व प्रशंसेपेक्षां अधिक उंचावलेलें असो.

ברוך יי המבורך सुवंदित परमेश्वर सदां-सर्वकाळ धन्य असो.

ברוך אתה יי हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, उजेड घडणाऱ्या आणि काळोख उत्पन्न करणाऱ्या, शांति करणाऱ्या आणि सर्व पदार्थ उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस. सर्व तुला स्तवितील, सर्व तुला सुवंदितील आणि सर्व म्हणतील कीं, परमेश्वरासारिखा पवित्र कोणीच नाहीं. हे सर्वांस घडणाऱ्या, प्रतिदिवशीं पूर्वेच्या द्वारांचीं कवाडें उघडणाऱ्या देवा, आणि अंतराळाच्या खिडक्या उघडणाऱ्या, सूर्यास त्याच्या ठिकाणांतून आणि चंद्रास त्याच्या विश्रांतीच्या जागेंतून काढणाऱ्या, आणि सर्व जगास व दयेच्या गुणाकडून उत्पन्न केलेल्या पृथ्वीवरील राहणाऱ्यांस प्रकाशित करणाऱ्या, सर्व तुलाच उंच

मानितील; सेलाह. पृथ्वीला व तिजवर राहणाऱ्यांला दयेने प्रकाश देणाऱ्या, आणि आपल्या चांगुलपणाकडून नेहेमी प्रति दिवशीं उत्पत्तीचीं कृत्यें नवीं करणाऱ्या, हे परमेश्वरा! तुझीं कृत्यें किती आहेत! तीं सर्व त्वां चातुर्याने केलीं; पृथ्वी तुझ्या संपत्तीने भरली आहे. पूर्वकाळांपासून उंच मानिलेल्या आणि अनंतकाळच्या दिवसांपासून स्तविलेल्या, गौरवयुक्त, व थोर मानलेल्या राजा, अनादि देवा! तुझ्या पुष्कळ दयेने आह्मावर दया कर. आमच्या सामर्थ्याचा देव, आमचा खडकरूप आश्रय, आमच्या तारणाची ढाल आणि आमच्या आश्रयाचा दुर्ग (तूंच आहेस.) तुजबरोबर तुळणा करणारा कोणी नाहीं; आणि तुजवांचून कोणी नाहीं; तुजविना कोणी नाहीं; आणि तुजसारिखाहि कोणी नाहीं. हे परमेश्वरा! आमच्या देवा, या जगांत तुजबरोबर तुळणा करणारा कोणी नाहीं, आणि हे आमच्या राजा, पुढील जगांत तुजवांचून कोणी नाहीं; हे आमच्या खंडून काढणाऱ्या, माशीआहच्या दिवसापर्यंत तुजविना आम्हास कोणीच नाहीं; आणि हे आमच्या तारणाऱ्या, पुनरुत्थितीच्या वेळेस आम्हांस तुजसारिखा कोणीच असणार नाहीं.

אֵל אָדוֹן देव सर्व कृत्यांचा स्वामी आहे; तो सर्व प्राण्यांच्या मुखांकडून धन्य मानलेला व सुवंदित आहे. त्याच्या मोठेपणाकडून व चांगुलपणाकडून पृथ्वी भरलेली आहे; ज्ञान व बुद्धि त्याच्या सभोवतीं आहेत. तो पवित्र हाय्योथांपेक्षां * श्रेष्ठ आणि रथांवर गौरवाने शोभायमान आहे. पुण्य व सरळपणा त्याच्या आसनापुढें आहे, आणि कृपेने व दयेने त्याचें गौरव भरलें आहे. आमच्या देवानें ज्या ज्योती उत्पन्न केल्या त्या उत्कृष्ट आहेत; त्या त्याने ज्ञान, बुद्धि व चातुर्याने घडिल्या आहेत. त्यांस त्याने सामर्थ्य व बळ दिल्हें आहे, कीं त्यांनी

* हाय्योथ एकप्रकारचे दूत आहेत.

सृष्टी चालवावी. त्या तेज व किरणाच्या उजेडाने भरल्या आहेत, सर्व जगांत त्यांचें तेज सुंदर आहे. निघतांना त्या आनंद करितात व परत येतांना उल्हास करितात; आणि आपल्या उत्पन्न करणाऱ्याची इच्छा भयाने (पूर्ण) करितात. त्यानें आपल्या नामाकरितां त्यांस गौरव व महत्व, आणि आपल्या राज्याच्या आठवणी करितां त्यांस हर्ष व उत्साह दिल्हा आहे. सूर्यास हाक मारतांच तो प्रकाशला, आणि चंद्राचे आकार पाहून त्याने त्यांस सुधारलें. (यावरून) उंचावरील सर्व सैन्य त्याचें स्तवन करितें, आणि सेराफीम, ओफानीम आणि पवित्र हाय्योथ * त्याचें गौरव करून त्यास थोर मानितात.

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

לאל אשר שבת जो सर्व कामापासून स्वस्थ राहून सातव्या दिवशीं थोर मानिला जाऊन गौरवाच्या आसनावर बैसला, त्या देवाची ते (दूत) स्तुति करितात. विसाव्याच्या दिवसास त्याने सौंदर्याने शृंगारित करून शाब्बाथ दिवसास त्याने हर्ष असें ह्मटलें. जेव्हां देव आपल्या सर्व कामापासून स्वस्थ राहिला, त्या सातव्या दिवसाच्या स्तुतीचें गीत तें हेंच. आणि सातवा दिवस शाब्बाथ दिवसीं गाण्याचे गीताकडून+स्तुती करून ह्मणतो. यास्तव ईश्वराने सर्व घडलेले पदार्थ त्याचें गौरव करून सर्व पदार्थ घडणाऱ्या राजास, ज्याने आपले लोक इस्राएल यांस शाब्बाथ दिवशीं विसावा दिल्हा, त्याचें गौरव व माहात्म्य करून त्यास थोर मानितात.

शाब्बाथ नसल्यास एथून बोलावें.

שמך יי אלהינו हे परमेश्वरा! आमच्या देवा, तुझ्या हातांच्या स्तुत्य कामाकरितां आणि ज्या तेजस्वी ज्योती

* हीं निरनिराळ्या प्रकारच्या दूतांचीं नावें आहेत.
+ दावीदाचें ९२ वें गीत.

त्वां घडिल्या त्यांकरितां वर आकाशांत व खालीं पृथ्वींत तुझें नाम पवित्र मानिलें जावो; आणि हे आमच्या राजा, तुझी आठवण स्तविली जावो. तीं (सर्व) तुझें गौरव करितील. सेहाल.

תתברך לנצח हे आमच्या खडकरूप आश्रया, आमच्या राजा, आमच्या खंडून घेणाऱ्या आणि पवित्र (दूतांस) उत्पन्न करणाऱ्या, तूं सदासर्वकाळ धन्य आहेस; हे आमच्या राजा, सेवा करणारे दूत उत्पन्न करणाऱ्या, आणि ज्याचे सेवा करणारे दूत जगताच्या उंच भागीं उभे राहून भयानें एकाच वाणीनें जीवंत देव व जगताच्या राजाच्या गोष्टी ऐकवितात, तुझें नाम सर्वकाळ स्तविलें जावो. ते सर्व प्रिय, शुद्ध, पराक्रमी व पवित्र असून ते सर्व आपल्या उत्पन्न कर्त्याची इच्छा भयानें व त्रासानें पूर्ण करितात. आणि सर्व आपलीं मुखें पवित्रतेनें, शुद्धतेनें, गायनानें व कीर्तनानें उघडून थोर, पराक्रमी, भयंकर व पवित्र जो देव राजा, त्याच्या नामास धन्य म्हणतात, स्तवितात, गौरव करितात, पवित्र मानितात, सन्मान देतात, व राज्याधिकार देतात. आणि सर्व आपणावर देवाच्या * राज्याचें जोकड एक मन्येका पासून मान्य करून, आणि आपल्या घडणाऱ्यास स्वस्थ आत्म्यानें, शुद्ध ओंठानें व पवित्र मधुरपणानें आपल्या घडणाऱ्यास पवित्र मानायास सर्व एकदांच भयानें उत्तर देवून त्रासानें म्हणतात कीं, "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे." आणि सेराफीम व पवित्र हाय्योथ उंच होऊन मोठ्या स्वरानें त्यांसमोर स्तवन करीत म्हणतात कीं "त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो."

לאל ברוך सुवंदित देवासाठीं मधुर गायन करून

* मूळ ग्रंथांत देव या शब्दाकरितां आकाश असा शब्द आहे; आणि इसी ग्रंथांत असें पुष्कळ वेळा आढळतें.

राजा आणि जीवंत व निश्चल देव, याचें कीर्त्तन करून व स्तुति ऐकवून (ते दूत) असें म्हणतात कीं, थोर व पवित्र, पराक्रम करणारा, नवीन कृत्यें करणारा, युद्धांचा स्वामी, यथार्थता पेरणारा, तारण उगविणारा, आरोग्यता उत्पन्न करणारा, स्तुतीने भयंकर, आश्चर्य कर्मांचा धनी आणि प्रतिदिवशीं नित्य आपल्या दयेने उत्पत्तीचीं कृत्यें नवीन करणारा, तो एकटाच आहे. जसें म्हटलें आहे कीं, ज्याने मोठ्या ज्योती उत्पन्न केल्या, त्याची स्तुति करा; कारण कीं त्याची दया सर्व काळची आहे. हे परमेश्वरा, ज्योती घडणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אהבת עולם हे परमेश्वरा, आमच्या देवा, सर्व कालिक प्रीतीने त्वां आम्हावर प्रीति केली; हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या मोठ्या नामाकरितां व ज्या आमच्या पूर्वजांनी तुजवर भरंवसा ठेविला, त्यां करितां त्वां अति मोठ्या दयेने आमची करुणा केली; आणि त्यानी आपल्या पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करावी, म्हणून जसे त्वां त्यांस जीवनाचे नियम शिकविले, तसी हे आमच्या बापा, दयाळू पित्या आम्हावर कृपा कर, हे दयावंता, आतां आम्हावर कृपा कर, आणि तुझ्या शास्त्रीय विषयांच्या गोष्टी आम्ही आवडीने समजाव्या, लक्षांत घ्याव्या, ऐकाव्या, शिकाव्या, शिकवाव्या, सांभाळाव्या, पूर्ण कराव्या आणि स्थापित कराव्या; म्हणून तूं आमच्या मनांत बुद्धी दे; आणि तुझ्या शास्त्राकडे आमचे डोळे प्रकाशित कर (उघड); आमचीं मनें तुझ्या आज्ञांकडे लागूं दे; आम्ही कधींच लज्जित होऊं नये, घाबरूं नये, व गळून पडूं नये; या साठीं तुझ्या नावावर आम्ही प्रीति करावी व त्याचें भय धरावें म्हणून आमचीं मनें एक चित्त कर; कारण तुझ्या पवित्र, थोर, व पराक्रमी नावावर आम्ही भरंवसा ठेविला आहे. आह्मी तुझ्या तारणाविषयीं आनंद व हर्ष करूं. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या दयेने व पुष्कळ कृपेने आम्हांस स-

दांसर्वकाळ सोडूं नयेः सेलाह; त्वरा करून पृथ्वीच्या चोहों कोनाकडून आम्हावर आशीर्वाद व शांति येऊंदे; राष्ट्रांचें जोकड आमच्या मानेवरून मोडून टांक. आणि आम्हांस आमच्या देशीं लवकर सुखरूप ने; कारण तारण करणारा देव तूंच आहेस. त्वां आम्हांस सर्व लोकांतून व सर्व भाषांच्या राष्ट्रांतून निवडून घेतलें; आणि आम्ही तुझें स्तवन करावें, तुझें एकत्व मानावें, आणि तुझ्या नावाचें भय धरून त्याजवर प्रीति करावी; ह्मणून हे आमच्या राजा, प्रीतीनें त्वां आम्हास आपल्या थोर नामाजवळ नेलें. हे परमेश्वरा, आपले लोक इस्राएल यांस प्रीतीनें निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

קריאת שמע पृष्ठ ९.

אלהיכם אמת ״ परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

אמת ויציב ही गोष्ट सर्वकाळ आह्मास सत्य, खरी, स्थापित, सिद्ध, सरळ, विश्वसनीय, प्रिय, लाडकी, आवडती, मधुर, भयंकर, उत्कृष्ट, नीयमित, स्वीकरनीय, चांगली व सुंदर असी आहे. जगतांचा देव आमचा राजा, याकोबाचा खडकरूप आश्रय आमच्या तारणाची ढाल, हें सत्य आहे; पिढोपिढीं तो निश्चल, त्याचें नावहि निश्चल, त्याचें आसन स्थापित आहे, आणि त्याचें राज्य व सत्य सर्वकाळ राहातें. त्याने ज्या गोष्टी आमच्या पूर्वजांविषयीं, आह्माविषयीं, आमच्या लेंकरांविषयीं, आमच्या पिढीविषयीं, आणि आपला सेवक इस्राएल याच्या बीजाच्या पिढ्यां विषयीं केल्या आहेत त्या सदांसर्वकाळ, जीवंत (सिद्ध) स्थापित, सत्य, प्रिय आहेत. पूर्वींच्या व मागल्या (लोकांविषयीं) जें त्याचें ह्मणणे आहे, तें चागलें आणि सत्य व खरेपणा यांत स्थापित असून कधीं उल्लंघून न जाणारा असा करार आहे. परमेश्वर आमचा देव, व आमच्या पूर्वजांचा

देव; आमचा राजा व आमच्या पूर्वजांचा राजा; आह्मास खंडून घेणारा व आमच्या पूर्वजांस खंडून घेणारा; आह्मास घडणारा; आणि आमच्या तारणाची ढाल तूं आहेस; हेंहि सत्य आहे. आमचा सोडविणारा व मुक्त करणारा हें सर्वकाळापासून तुझें नाम आहे, तुजवांचून आह्मास दुसरा कोणी देव नाहीं. सेलाह.

עזרת אבותינו जो आमच्या पूर्वजांस सर्वकाळापासून सहायकारी, आणि जो त्यांस आणि त्यांच्या मागें पिढींपिढी त्याच्या लेंकरास ढाल व तारक, तो तूंच; जगाच्या वर तुझें वस्तिस्थान आणि तुझा न्याय व तुझी यथार्थता पृथ्वीच्या शिमेपर्यंत आहे. जो पुरुष तुझ्या आज्ञा ऐकितो, आणि तुझें शास्त्र व तुझीं वचनें आपल्या मनांत ठेवितो, तो आशीर्वाद पावतो; हें सत्य आहे. जो आपल्या लोकांचा स्वामी आणि बापांचा व पुत्रांचा वाद (स्वता) चालविणारा पराक्रमी राजा, तो तूंच, हें सत्य आहे. जो पहिला व शेवटला तो तूंच; तुजवांचून आम्हांस राजा, उद्धारक व तारक कोणीच नाहीं, हें सत्य आहे. हे परमेश्वरा! आमच्या देवा, त्वां आम्हास मिसरांतून सोडविलेंस; दास त्वाच्या घरांतून आम्हास खंडून काढलेंस; त्यांच्या सर्व ज्येष्ठ पुत्रांस मारून आपले ज्येष्ठ पुत्र इस्राएल यांस सोडविलेंस; सूफ समुद्र दुभागलास; गर्विष्टांस त्यांत बुडवून आपल्या मियकरांस समुद्राच्या पार नेलेंस; शत्रूला पाण्यानें झाकिलें; त्यांतून एकहि उरला नाहीं; (असे चमत्कार करणारा) तो तूंच आहेस, हें सत्य आहे. यावरून मियकरांनी देवाची स्तुति करून त्यास थोर मानिलें; आणि आवडत्यांनी राजा, आणि जीवंत व निश्चल देव याचें कीर्त्तन व गायन केलें, स्तुति केली, सुवंदन केलें, व उपकार स्तुति केली. उंच, थोर, मोठा, पराक्रमी, भयंकर, गर्विष्टांस भूमी एवढे नीच करणारा, पडलेल्यांस आकाशा एवढे उंच करणारा, बंदिवा-

नास मोकळे करणारा, नम्रास खंडून घेणारा, गरिबांस सहाय करणारा, आणि आपले लोक इस्राएल यांस काकुळतीच्या वेळेस उत्तर देणारा (तूंच, आहेस.) धन्य व सुवंदित जो थोर देव त्यांचा उद्धारक त्याची स्तुति असो. मोशे व इस्राएलाचे पुत्र यांनी मोठ्या आनंदाने तुला गाऊन सर्वांनी ह्मटलें कीं, हे परमेश्वरा, देवांमध्यें तुजसारिखा कोण ! पवित्रतेने महान, स्तविण्याविषयीं भयमान, चमत्कार कर्त्ता तुजसारिखा कोण आहे ! जे सोडविले गेले त्यांनी समुद्रतिरीं गाऊन तुझ्या मोठ्या नामाची स्तुति केली. त्यासर्वांनी तुझी उपकार स्तुतिकरून व तुझें राज्य मान्य करून म्हणाले कीं, परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील. आणखी असेंहि म्हटलें आहे कीं, आमचा उद्धारणारा कोण ? तर त्याचें नाम सैन्याचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे. हे परमेश्वरा, इस्राएलांचा उद्धार करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אדני שפתי תפתח पृ४.

पाहाटेच्या प्रार्थनेमध्यें (शाहारीयमध्यें) אדני שפתי पाहिल्याने हळू बोलून पुनः मोठ्याने बोलल्या अगोदर हें पुढील गीत बोलण्याची चाल आहे.

“ שמעתי हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहे.

“ שמעתי हे परमेश्वरा, तूं मला आपल्या रागाने कदाचित नाहींसें करशील, ह्मणून माझ्या झडतीच्या दिवसाविषयीं ऐकल्यामुळें मी कांपतो, आणि माझ्या न्यायाच्या दिवसामुळें मी भितों व थरथरतों; कारण देवाचा दिवस मोठा आहे. ”

“ מי לא יירא हे परमेश्वरा, न्यायाच्या भयंकर दिवसामुळें कोण भिणार नाहीं ! कारण अग्नीसारिख्या स्वच्छ ठिकाणीं तुलाच मात्र मोठेपणा व पराक्रम शोभतो; परमेश्वराशीं स्नेहानें कोण वागेल ! ”

" מלך יושב " हे परमेश्वरा, न्यायासनावर बसणाऱ्या राजा, तुझा सरळपणा कळविण्याकरितां, हे परमेश्वरा सेराफीम गायांवर भोंवतालें उभे आहेत, कांकीं नेम व न्याय जाणणाऱ्या सर्व लोकांचा धर्म असा आहे कीं, परमेश्वर (राजा) सरळ आहे असें त्यांनी दाखवावें. "

" מלך אדיר " हे पराक्रमी परमेश्वर राजा, मनुष्यांस नीच व उंच करणाऱ्या, ज्या पवित्राच्या वचनानें व जागणाऱ्यांच्या निवाड्यानें +खडकांचा चुराडा होतो आणि फुटतात, तें परमेश्वराच्या मुखांतून निघतें त्याकडूनच होतें. "

" לפני חילי " हे परमेश्वरा, तूं आपल्या सैन्या पुढें मोठ्यानें ओरडतोस, मग बळवान मनुष्यांस (सत्वशीलांस) जीवनाचें औषध कसें सापडतें ? तर बलवान मनुष्यें * नमल्या अगोदर ते उठून ईश्वराकडे फिरल्यानें (त्यांस तें सापडतें). "

" לבי " हे परमेश्वरा, तुझ्या बाणाच्या अग्नीसारिख्या ज्वाळेपासून मी पळतों, आणि उंच मानिलेल्या लोकांवरील तुझ्या भया मुळें मी शोकानें ओरडतों; ईश्वराच्या अति तीव्र दाहाच्या ठिकाणीं टकळ्या कसा चढून जाईल ! "

" עבה עני " हे परमेश्वरा, तुजपुढें उभा राहिलेला गरीब, जो भिकाऱ्याप्रमाणे तुजपासून क्षमा मागतो, त्यास उत्तर दे; त्याचें मन तूं स्थिर करून आपला कान त्याजकडे लाव; आणि हे परमेश्वरा, तूं आपलें मुखतेज आम्हावर पडूं दे. "

" נהלי דמעותי " हे परमेश्वरा, माझ्या अश्रुपातामुळें माझीं आंतडी उकळतात, आणि परमेश्वर राजापुढें न्याय सभा बसली आहे, आणि त्यापुढें पुस्तकें उघडलीं आहेत, म्हणून माझ्या पापांमुळें माझीं गुर्दकमळें मर्दीम होतात.

+ पवित्र व जागणारा यांचे इब्रीशब्द अनेक वचनांत आहेत; ते दानिएल ४ अध्यायाच्या १४ व्या ओवींत सांपडतात. त्या वाक्यावर टीका करणारांनीं त्या उपमा ईश्वरास दिल्ह्या आहेत. * शरीराचे बळकठ अवयव.

ספרי חיים " हे परमेश्वरा, जीवंतांचीं व मेले-ल्यांचीं पुस्तकें तुजपुढें उघडीं आहेत; आमच्या पूर्वजांवरील तुझ्या दयेप्रमाणे आह्मी (तुजवर) भरंवसा ठेवितों, ह्मणून आमची प्रार्थना शांतिकारक सुवासा प्रमाणे स्थाप, आणि हे परमेश्वरा, तूं आपलें (हस्त) कर्म (या दुःखाच्या) वर्षांत जीवंत राख. "

אתאנו לחלות आम्ही तुजपुढें प्रार्थना करा-यास आलों आहों, कारण कीं, दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आम्हांस लज्जित करूंन नको, आतां आम्हास तुजसमोरून रिकामे परतवूं नको; आम्हांस क्षमा कर आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אתאנו לבקש हे भयंकरा, अघोर व संकट समयीं संरक्षण करणाऱ्या, आम्ही तुझ्या जवळून क्षमा मागायास आलों आहों; तूं आम्हास जीवंत राख, आम्हावर दया कर आणि तुझें नाम आम्हास ठेविलें जाऊं दे; आम्हास क्षमा कर आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אבינו מלכנו हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजवांचून आम्हास कोणी राजा नाहीं.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या नामा करितां आम्हावर (उपकार) कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर चांगल्या-वर्षास आरंभ होऊं दे.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हावरून सर्व कठोर व वाईट निवाडे रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या द्वेषणाऱ्यां-चे विचार रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रूंच्या मसलती मोड.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रूस व आह्मावर बलात्कार करणाऱ्यांस नाहींसे कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या कराराच्या लेंकरांवरून पटकी, तरवार, वाईट, दुष्काळ, पाडावपण, लुटणें नाश, आणि मरी नाहींसी कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या लोकांच्या रोगासाठीं पूर्ण आरोग्यता पाठीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या वतनावरून मरी बंद कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मी माती आहों असी आठवण राख.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमचा राजा, आम्हास नीतीमानाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास यथार्थांच्या व सरळांच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास मुक्ततेच्या व तारणाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हाकरितां तारण लँवकरच उगीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझे लोक इस्राएल यांचे शिंग उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या अभिषिक्काचें शिंगहि उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास तुजपुढें पूर्ण पश्चात्तापानें परतीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमची वाणी ऐकून आम्हावर दया व कृपा कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, जर आम्हाकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां तसें कर.

हे आमच्या बापा व आमचा राजा, दयेनें व प्रसन्नतेनें आमची प्रार्थना मान्य कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजपुढून आम्हास रिकामें परतवूं नको.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्यानें (देवानें) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्काचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविले जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

תענו ותעתרו आकाशांतून (दयेनें) तुम्हांस उत्तर मिळो व तुमचें ऐकिलें जावो, तुमचें ओरडणें मान्य होवो, तुमची प्रार्थना प्रसन्नतेनें ऐकिली जावो, आणि तुमच्या विनंतीचे वाणीचें उत्तरहि मिळो; आणि परमेश्वर आमचा देव आम्हास व

आमच्या सर्व इस्राएल बांधवांस, जेथें ते राहत असतील त्या ठिकाणी प्रकाशाचा, प्रीतिचा व सख्यत्वाचा, आशीर्वादाचा, बुद्धीचा, आपल्या पवित्र मंदिराचा, मुक्तीचा, मोठेपणाचा, आनंदाचा, हर्षाचा, ज्ञानाचा व समजाचा, देवास लगटून राहाण्याचा, गौरवाचा व महत्त्वाचा, सफलतेचा, विस्ताराचा, शांततेचा व सुटकेचा, चांगल्या मंडळीचा, यथार्थतेचा, अधिकाइचा, पुण्याचा, हुशारीचा, सुबोधाचा, किर्तनाचा, उल्हासाचा, करुणेचा, शाहणपणाचा, चांगल्या जीवनाचा, अनुग्रहाचा व दयेचा, चांगुलपणाचा, शुद्धतेचा, दंहिवराचा, सरळपणाचा, तारण्याचा, प्रायश्चित्ताचा, अन्नाच्या पूर्वळ्याचा, सन्मानाचा, शास्त्राचा अभ्यास त्याच्या नामानें करण्याचा, चांगल्या मनाचा, मुगुटाचा, उपजीवनाचा, क्षमेचा, उत्तराचा, विश्रांतीचा, परोपकारबुद्धीचा, मधूरपणाचा, आश्रयाचा, त्याच्या शास्त्राच्या रहस्याचा, माफीचा, सहायाचा, शृंगाराचा, खंडणीचा, शास्त्राचा (अभ्यास करणाऱ्या लेकरांकडून) पुष्कळ होण्याचा व वाढण्याचा, चांगल्या भक्षसामग्रीचा, न्यायत्वाचा, प्रेमाचा, उगवण्याचा, मोकळेपणाचा, प्रार्थना मान्य होण्याचा, तोंडावरील तेजाचा, पूर्ण आरोग्यतेचा, वाढण्याचा, ईश्वरास उंचावण्यांचा, प्रसन्नतेचा, कल्याणाचा, निर्भयपणाचा, अधिकाईचा, शास्त्राचा, प्रार्थनेचा, उद्धाराचा, पश्चात्तापाचा दरवाजा उघडो. आणि तुम्हामधून तो सर्व प्रकारचा हेवा, द्वेष व वाद दूर करो; आणि शास्त्रांत जें लिहिलें आहे कीं, "तुमच्या पूर्वजांचा देव, याने तुम्ही जितकें आहां, त्यापेक्षां हजारपट अधिक करावें; आणि जसें त्याने तुम्हास वचन दिल्हें आहे; तसा तुम्हास आशीर्वाद द्यावा" हें तुम्हामध्यें स्थापित होवो, आणि तुम्हास तो चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिहो. आणि असी त्याची प्रसन्नता होवो. आणि आपण तथास्तु म्हणू.

תתקבל צלותהון सर्व इस्राएलांच्या घराण्या-

ची प्रार्थना व काकळूत आकाश व पृथ्वींतील त्यांच्या बापापुढें मान्य होवो. आणि तुह्मी तथास्तु म्हणा.

יהי שלמא आणि आकाशांतून आम्हास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार, आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुह्मी तथास्तु म्हणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आम्हास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु म्हणा.

शास्त्र काढतेवेळीं हें बोलतात.

אתה הראת परमेश्वर तोच देव, त्याखेरीज दुसरा कोणी देव नाहीं, असें तुम्ही जाणावें ह्मणून हें सर्व तुम्हास दाखवून दिल्हें आहे. हे प्रभु, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोणी नाहीं, आणि तुझ्या कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं.

" יהי " आमचा देव परमेश्वर आमच्या वडिलांस जसा अनुकूळ होता, तसा आम्हास अनुकूळ व्हावा; त्याने आम्हास टाकूं नये, आम्हास सोडूंच नये. तूं आपल्या लोकांस तार, आणि आपल्या वतनाला आशीर्वाद दे; त्यांचा मेंढपाळ असा हो, आणि त्यांस सर्वकाळ वाहा. आणि कोश निघाला तेव्हां असें होत असे कीं, मोशे म्हणे, हे परमेश्वरा, ऊठ; म्हणजे तुझ्या शत्रूंची दाणादाण होवो, आणि तुझे द्वेषी तुझ्या पुढून पळोत. हे परमेश्वरा, तूं आपल्या सामर्थ्याच्या कोशासुद्धां आपल्या विसाव्यासाठीं उठ. तुझ्या याजकांनी नीतिमत्व पांघरावें, आणि तुझ्या भक्तांनी हर्ष शब्द करावा. तूं आपला सेवक दावीद यामुळें, आपल्या अभिषिक्ताचें तोंड विन्मुख करूं नको.

ברוך המקום ज्या सुवंदित सर्वव्यापकानें* आपल्या इस्राएल लोकांस शास्त्र दिल्हें, तो धन्य. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य. तुम्ही माझ्या संगतीं परमेश्वराला थोर माना; आम्ही एकत्र त्याचें नाम उंचावूं.

רוממו ״ परमेश्वर आमचा देव याला तुम्ही उंच माना, आणि त्याच्या पायांच्या आसना जवळ भजा; तो पवित्र आहे. परमेश्वर आमचा देव, याला तुम्ही उंच माना; आणि त्याच्या पवित्र डोंगरावर भजा; कांतर परमेश्वर आमचा देव पवित्र आहे. परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं, तुझ्याशिवाय कोणी नाहीं, आमच्या देवासारिखा खडकरूप असा कोणी नाहीं. कांतर परमेश्वराखेरीज देव कोण आहे ? आणि आमच्या देवावांचून कोण खडकरूप आश्रय आहे ? मोशानें आज्ञा करून आम्हांस शास्त्र दिल्हें; हेंच याकोबाच्या समुदायाचें वतन आहे. जे तें धरितात, त्यांला तें जीवनाचें झाड आहे, आणि जे तें बाळगतात, ते प्रत्येक धन्य आहेत. त्याचे मार्ग आनंदाचे मार्ग, आणि त्याच्या सर्व वाटा कुशल आहेत. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितात, त्यांचें फार कल्याण आहे; आणि त्यांस कांहीं अडखळा नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देतो.

בריך שמיה जगताच्या स्वामीचें नाम धन्य असो. हे परमेश्वरा, तुझें राहण्याचें व वस्तिकरण्याचें स्थानहि धन्य असो; तुझी प्रसन्नता तुझे लोक इस्राएल यांबरोबर सर्वदा असो. आणि तुझ्या उजव्या हाताचें तारण तुझ्या लोकांस तु-

---

*המקום या इब्री शब्दाचा मूळ अर्थ जागा असा होतो, परंतु हास्रामीम लोकांच्या ग्रंथांत या शब्दाचा उपयोग सर्व व्यापक देव या अर्थानें पुष्कळ ठिकाणीं केलेला आढळतो.

इया पवित्र मंदिरांत दाखीव, कीं त्वां आपल्या उत्तम उजेडाकडू-न आम्हांस तिकडे पोंहोचवावें; आणि दयेनें आमची प्रार्थना मान्य करावी. आमचें आयुष्य चांगल्या प्रकारें वाढावें असी तुजपुढें प्रसन्नता होवो. आणि तुझा सेवक जो मी, मला तूं न्यायी लोकांमध्यें गणून मला, जें माझें असेल त्याला, आणि तुझे लोक इस्राएल यांचें जें असेल त्यांला तूं सांभाळ. तूं सर्वांचें पोषण व पाळण करितोस; तूंच सर्वांवर अधिकार करितोस; तूं राजांवरहि अधिकार करितोस; राज्य हें तुझेंच आहे. पवित्र जो धन्य, त्याचा सेवक मी आहें; त्याच्या गौरवयुक्त शास्त्रापुढें नमन करितांना मी त्याच्या पुढे नमन करितों. मनुष्यावर मी भरंवसा ठेवीत नाहीं, आणि देवाच्या पुत्रांवरहि (दूतांवरहि) मी आशा ठेवीत नाहीं; परंतु जो आकाशाचा देव, जो सत्य देव आहे, ज्याचें शास्त्र सत्य, ज्याचे भविष्यवादीहि सत्य, व ज्याचीं चांगलीं व सत्य कृत्यें पुष्कळ आहेत, त्याजवरच मी भरंवसा ठेवितों; आणि त्याच्या पवित्र नामाची मी स्तुति करितों. हे प्रभु! त्वां आपल्या शास्त्राकडे माझें मन लावावें; आमचें चांगलें व्हावें; आम्हास जीवन प्राप्त व्हावें; आणि आमचें कल्याण व्हावें. अशा माझ्या मनांतील व तुझे लोक सर्व इस्राएल यांच्या मनांतील इच्छा पूर्ण कर. तथास्तु.

ישמחו השמים आकाशानी संतोष करावा, पृथ्वीनेहि हर्ष करावा, आणि परमेश्वर राज्य करितो असें राष्ट्रांमध्यें सांगितलें जावें. सीयोन डोंगरानें आनंद करावा; तुझ्या न्यायामुळें यहुदाच्या कन्यानी हर्षावें. राजांचा राजा, पवित्र जो धन्य राजा, यानें जीं जगतें उत्पन्न केलीं आहेत; म्हणजे हें जग व पुढील जग, यामध्यें त्याच्या इच्छेप्रमाणें, त्याच्या भिणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणें आणि त्याचे लोक इस्राएलाचें घराणें यांच्या इच्छेप्रमाणें, त्याचें नाम सर्वांपेक्षां मोठें, पवित्र, धन्य, उंच व

थोर मानिलें जावो. तो आपलें राज्य आम्हावर लवकर प्रगट करून आम्हास दाखवो; आणि आमच्या निभावलेल्यांवर व त्याचे लोक इस्राएलाचें घराणे यांच्या निभावलेल्यांवर दयेकरून, ममतेकरून व कृपेकरून तो दया, करुणा व कृपा करो. आणि सर्व लोक हो, तुम्ही तथास्तु म्हणा. जो दयाळू तो आमचें पाडावपण आणि त्याचे लोक इस्राएलाचें घराणे यांचे पाडावपण लवकर आमच्याच दिवसांत परतवो. आणि आम्हास दुःखांतून काढून सुखांत, आणि आंधारांतून काढून प्रकाशांत नेवो. आणि सर्व लोकहो, तुम्ही तथास्तु म्हणा. कारण कीं मी परमेश्वराचें नाम गाजवीन; तुम्ही आमच्या देवाला थोर मानून द्या. देवाला पराक्रमाचा मान द्या, आणि शास्त्राला मान द्या.

शास्त्र उचलून दाखवितांना मंडळी हें ह्मणते.

וזאת התורה तर जें शास्त्र मोशाने इस्राएलाच्या संतानास सांगून ठेविलें तें हेंच. मोशाने आज्ञा करून आम्हास शास्त्र दिल्हें; हेंच याकोबाच्या समुदायाचें वतन आहे.

כהן קרב וכהן हे आचार्या, ये आणि आपलीं क्रिया कर्मे कर. परमेश्वराचें नेम शास्त्र पूर्ण आहे, जिवाला ठिकाणी आणितें; परमेश्वराचा प्रमाण नेम खरा आहे, भोळयाला ज्ञानी करितो. परमेश्वराचीं बंधारणे नीट आहेत, न्हदयाला आनंदवितात; परमेश्वराची आज्ञा निर्मळ आहे, डोळयांस उजेड करिती.

האל תמים דרכו देवाचा मार्ग नीट आहे, परमेश्वराचें वचन पवित्र आहे, जे सर्व त्याचा आश्रय धरितात त्यांस तो ढालरूप आहे.

ज्यास शास्त्र वाचायास बोलवितात तो शास्त्र वाचल्या पूर्वी हें बोलतो.

עמכם ״ उठणारा. - परमेश्वर तुम्हाबरोबर असो.

יברכך ״ मंडळी. - परमेश्वर तुला आशीर्वाद देवो.

" ברכו את " उठणारा,— सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

. " ברוך " मंडळी.— सुवंदित परमेश्वर सदा सर्वकाळ धन्य असो.

" ברוך उठणारा.— सुवंदित परमेश्वर सदांसर्वकाळ धन्य असो.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सर्व लोकांतून निवडून घेऊन आपलें नेम शास्त्र आम्हास देणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शास्त्रवाचल्या नंतर उठणारा हें बोलतो.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सत्य शास्त्र देणारा आणि आम्हामध्यें सर्वकाळचें जीवन लावून ठेवणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा ! शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

वर्ष प्रतिपदेच्या पहिल्या दिवशीं उत्पत्ति अध्याय २१ आणि या दिवसाच्या आठवणी करितां गणना २९·१-६ ओवीपर्यंत आणि हाफतारा * म्हणजे भविष्य कथनांतील भाग, १ शेमोएल अध्याय १ पासून २ अध्यायाच्या १० व्या ओवीपर्यंत वाचितात. दुसऱ्या दिवशीं उत्पत्ति अध्याय २२ आणि यादिवसाच्या आठवणी करितां गणना २९·१-६ ओवीपर्यंत, आणि हाफतारा म्हणजे भविष्य कथनांतील भाग इर्मेया ३१·२-२० ओवीपर्यंत वाचितात.

भविष्य कथनांतील भाग वाचल्या पूर्वी हें बोलतात.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा,

* टीका ७

जगताच्या राजा, (आपणाकरितां) चांगले भविष्यवादी निवडून घेऊन त्यांनी म्हटलेल्या सत्य गोष्टींस प्रसन्न असणारा जो, तूं धन्य आहेस.

״ברוך אתה״ हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, शास्त्र, आपला सेवक मोशे, आपले लोक इस्राएल, आणि सत्य व यथार्थ भविष्यवादी यांस निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

भविष्यकथनांतील भाग वाचल्यानंतर हें बोलतात.

״גאלנו״ आमच्या उद्धारणारा कोण? तर त्याचें नाम सैन्याचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे.

״ברוך אתה״ हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, सर्व जगतांच्या खडकरूप आश्रया, सर्व पिढ्यांत न्यायी असणाऱ्या, ज्याचे शब्द सत्य व न्यायी असा विश्वसनीय देव, म्हणणारा व त्याप्रमाणे करणारा, बोलणारा व तें सिद्ध करणारा; सत्य जो, तूं धन्य आहेस. परमेश्वर आमचा देव जो विश्वसनीय, तो तूंच; तुझीं वचनेंहि विश्वसनीय; तुझ्या वचनांतून एकहि शब्द माघारें रिकामा परतत नाहीं; कारण तूं विश्वसनीय व दयाळू देव राजा आहेस. हे परमेश्वरा आपल्या सर्व वचनांत विश्वसनीय असणाऱ्या, तूं धन्य आहेस.

רחם על ציון सियोनेवर तूं दया कर, कारण ते आमचे जिवनाचें घर; आणि लवकर आमच्या दिवसांत खिन्न झालेल्या जीवांस तूं तार. हे परमेश्वरा! सियोनेस तिच्या लेंकरांत हर्षित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמחנו״ אלהינו हे परमेश्वरा! आमच्या देवा, तुझा सेवक येलीया भविष्यवाद्याचें आणि तुझा अभिषिक्त दावीद याच्या घराण्याच्या राज्याचें येणें होऊन आम्हास आनंदित व आमच्या मनांस हर्षित कर. त्याच्या आसनावर दुस-

त्याने बसूं नये, आणि परक्याने आणखी त्याच्या गौरवाचें वतन पावूं नये; कारण कीं, तूं त्याचा दिवा सदासर्वकाळ विझविणार नाहींस, असी तूं त्याजवळ आपल्या पवित्र नामाने शपथ वाहिली आहेस, हे परमेश्वरा ! दावीदाच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस.

על התורה शास्त्र, भक्ति, भविष्यवादी (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाचा दिवस, हा पवित्र मेळामिळण्याचा सुदिन, जो हे परमेश्वरा, आमच्या देवा, त्वां आम्हास (शाब्बाथ असल्यास पवित्रतेकरितां विश्रांतिकरितां व) गौरवाकरितां व शोभे करितां दिल्हा आहेस, यांपेक्षां आणि सर्व गोष्टीपेक्षां आम्ही तुला अधिक मानितों; आणि धन्य म्हणतों. सर्व प्राण्यांच्या तोंडाकडून नित्य व सर्वकाळ तुझें नाम सुवंदित असो. आणि हे आमच्या राजा, तुझीं वचनें सर्वकाळ सत्य व स्थापित आहेत. हे परमेश्वरा, सर्व पृथ्वीवरील राजा, (शाब्बाथ असल्यास शाब्बाथास व) इस्राएलास व स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

राजास आशीर्वाद.

जो राजांस तारण आणि अभिषिक्तांस अधिकार देतो; ज्याचें राज्य सर्वकाळचें राज्य आहे; जो आपला सेवक दावीद यास नाशकारक तरवारीपासून सोडवितो; जो समुद्रांत वाट आणि अगाध जलांत मार्गकरितो तो आमचा प्रभु; राजा-सुभेदार आणि सर्व सरदार लोक यांस आशीर्वाद देवो, सांभाळो, रक्षण करो, सहायकरो, उंचावो, मोठे करो आणि अति थोर पदास चढवो. राजांचा माहाराजा आपल्या दयेंकरून त्यांस रक्षो, जीवंत राखो, आणि सर्व दुःख व संकट यांपासून सोडवो. राजांचा माहाराजा आपल्या दयेकरून त्याच्या न्यायसभेचें नक्षत्र चढवो, उंचावो आणि त्यांच्या राज्यावर त्यांचे दिवस वाढवो. त्यांनी आम्हासी

व आमचे बंधू सर्व इस्राएल यांजसी चांगलें करावें म्हणून राजांचा माहाराजा दयेंकरून त्यांच्या मनांत व त्यांच्या मसलत देणारांच्या व सरदारांच्या मनांत आम्हाविषयीं दया उत्पन्न करो. आणि आमच्या दिवसांत व त्यांच्या दिवसांतहि येहुदाचें तारण होवो; इस्राएल निर्भयपणें वसो; उद्धार करणारा सियोनेस येवो ! आणि असी त्याची प्रसन्नता होवो, आणि आपण तथास्तु म्हणावें.

मंडळीस आशीर्वाद.

מי שברך ज्याने आमचे पूर्वज आब्राहाम, इसहाक, याकोब, मोशे, आहारोन, दावीद, शेलोमो आणि सर्व पवित्र व शुद्ध मंडळ्या यास आशीर्वाद दिल्हा, तो या पवित्र मंडळीस, तिजमधील लाहान थोरांस, त्यांस, त्यांच्या पुत्रांस, त्यांच्या स्त्रियांस, त्यांच्या शिष्यांस व जें त्यांचें असेल त्यास, तो आशीर्वाद देवो. जगताचा राजा तुम्हास आशीर्वाद देवो; शुद्ध करो; तुमच्या विनंतीची वाणी ऐको; सर्व दुःखापासून व क्लेशापासून तुम्हास सोडवो व मुक्त करो. ईश्वराचें वचन तुम्हास आश्रय व तुम्हावर छाया असें होवो; तो आपला शांतीचा मंडप तुम्हावर विस्तारो; आणि प्रीति, सख्यत्व, सल्ला, व मित्रत्व यांची लागवड तुम्हामध्यें करो; आणि व्यर्थ हेवा तुम्हापासून दूर करो; आणि अन्यराष्ट्राचें जोडक(राज्याधिकार)तुमच्या खांद्यावरून मोडूनटाको. आणि शास्त्रांत जें वाक्य लिहिलें आहे कीं, " तुमच्या पूर्वजांचा देव, याने तुम्ही जितके आहां, त्यापेक्षां हजार पट अधिक करावें; आणि जसें त्याने तुम्हास वचन दिल्हें आहे, तसा तुम्हास आशीर्वादहि द्यावा; " हें तुम्हामध्यें स्थापित होवो; आणि तुम्हास तो चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिहो. आणि असी त्याची प्रसन्नता होवो. आणि आपण तथास्तु म्हणूं.

शाब्बाथ असला तरी हें गीत बोलावें.

עת שערי רצון (हे परमेश्वरा) मी विनंती करितों कीं, प्रसन्नतेचा दरवाजा उघडण्याच्या वेळीं, आणि ज्या दिवशीं मीं आपले तळहात देवापुढें पसरितों; त्या निषेधाच्या दिवशीं मजकरितां बांधणाराची, * बांधला गेलेल्याची × व स्थंडिलाची आठवण कर.

עוקד והנעקד बांधणाराची, बांधला गेलेल्याची व स्थंडिलाची (आठवण कर.)

באחרית נסה (आब्राहामाच्या) दाहाव्या +परिक्षेच्या शेवटीं, (ईश्वर त्यास म्हणाला) तुला सारेपासून जो पुत्र झाला आहे आणि जरी तुझा जीव त्याशीं गुंतला आहे, तरी ऊठ आणि ज्या डोंगरावर गौरव प्रकाशलेलें (दिसेल) त्यावर मजकरितां त्याचा शुद्ध होम कर. עוקד והנעקד

אמר לשרה तो सारेस म्हणाला कीं, तुझा आवडता इसहाक वाढला, परंतु आकाशाची (देवाची) सेवा करायास शिकला नाहीं; म्हणून मी जातों आणि देवानें जें स्थापन केलें आहे तें मी त्यास शिकवितों; ती म्हणाली स्वामी जा, परंतु दूर जाऊं नका; मग त्यानें उत्तर केलें कीं, तूं आपल्या मनानें देवावर भरंवसा ठेव. עוקד והנעקד

שחר והשכים सकाळीं जाण्याकरितां तो मोठ्या पाहांटेस उठून त्यानें खोटे मनुष्यांतून (अन्यजातीचे) दोन मुलें आपणाबरोबर घेतलीं; आणि तिसऱ्या दिवशीं शोधलेले ठिकाणीं पोहोंचला; आणि गौरव, महत्त्व आणि वैभव यांची प्रतिमा पाहिल्यावर अभिषिक्त करण्याविषयीं उभा राहून विचार करूं लागला. עוקד והנעקד

ידעו נעריו त्यामुलांस त्यानें असें विचारलें कीं,

* आब्राहाम × इसहाक + टीका ८

मोरीया डोंगराचे शिखरावर मफुल्लित झालेला उजेड तुम्हास दि-सतो काय ? तेव्हां ते म्हणाले आम्हास दिसत नाहीं, खांच मात्र दिसती; तेव्हां त्याने उत्तर केलें कीं, अहो गाढवासारिख्या लोकां-नो, तुम्ही एथें राहा, आणि मी व मुलगा साष्टांग नमस्कार क-रावयास जातों. עוקד והנעקד

הלכו שניהם ते दोघे आपलें कार्य करायास जाते झाले, तेव्हां इसहाकाने आपले बापास असें उत्तर केलें कीं, बापा, पाहा, विस्तव आणि रचायाचीं लांकडें आहेत, परंतु हे माझे स्वामी, रीतीप्रमाणें मेंढरूं (पाहिजे) तें कोठें आहे ? तुम्ही आपला नियम आज विसरलां काय ? עוקד והנעקד

ויענה אביו त्याच्या बापाने उत्तर केलें कीं, तूं जीवंत देवावर भरंवसा ठेव, ह्मणजे तो होमाकरितां शेरडूं पाहून मिळवील, कारण असें जाण कीं, जसी देवाची इच्छा असेल तसें तो करील; माझ्या पुत्रा आज आपण त्यापुढें आसन (स्थं-डील) बांधूं; मग अर्पला जाणारा व आर्पण करणारा वाखाणिले जातील. עוקד והנעקד

דפקו בשערי רחמים पुत्र आर्पिला जाण्या-स आणि बाप आर्पण करण्यास सिद्ध होऊन त्यांनी दयेचा दर-वाजा उघडला जावा म्हणून ठोकलें (प्रार्थना केली), देवावर आशा ठेविली, आणि त्याच्या दयेवर भरंवसा ठेविला, (कारण असें आहे कीं) परमेश्वरावर आशा ठेवणारे आपली शक्ति नवी करि-तील; आणि देवाकडील वतनास आपण योग्य व्हावें ह्मणून त्यां-नी तें शोधिलें. עוקד והנעקד

הכין עצי עולה त्याने धैर्याने व धिटाईने होमाचीं लाकडें रचून जसा एडक्यास बांधावा तसा इसहाकास बांधला; तेव्हां असें झालें कीं, दिवसाचा प्रकाश असतां त्याच्या डोळ्यांवर (झांक येऊन) रात्रीप्रारिखा अंधार दिसूं लागला,

आणि अश्रूधारा जोरानें वाहूं लागल्या. परंतु जरी त्याचे डोळे मोठ्या खेदानें शोक करीत होते, तरी त्याचें मन हर्षित होतें. עוקד והנעקד

שיחו לאמי तुम्ही माझे आईस सांगा, कीं तिचा हर्ष संपला आहे, तिला नव्वद वर्षांनी झालेला पुत्र अग्नि आणि सुरा यांमध्यें विभागला गेला; आतां तिजकरितां मी सांत्वन कोठें शोधूं; हे माझे आई, तूं शोक करशील व घुसमशील ह्मणून मला दुःख वाटतें. עוקד והנעקד

ממאכלת יהמה सुरा पाहून माझा शब्द गर्जतो (मी ओरडतों) म्हणून हे माझ्या बापा, आतां, तो पाजीव, आणि माझे बंद ओंवळ, आणि माझें मांस जाळण्याचे समयीं तूं धैर्य धरून जी माझी राख उरेल त्यांतून कांहीं घेऊन सारेला असें म्हण कीं, हा इसहाकाचा सुगंध. עוקד והנעקד

ויהמו כל (या मुळें) स्वारीचे सर्व दूत घाबरले, आणि ओफान, साराफ * आणि त्यांचे सेनापतिहि भिक्षा मागून ईश्वराजवळ विनंती करून म्हणाले (हे परमेश्वरा,) आम्ही विनंती करितों कीं, आम्हासाठीं जीवदान देऊन त्याच्या बद्दल दे; आतां पृथ्वीस चंद्रावाचून×ठेऊं नको. עוקד והנעקד

אמר לאברהם तेंव्हां आकाशाचा स्वामी आब्राहामास म्हणाला, तूं आपला हात तीन ज्योतींतील+ एका ज्योतीवर टाकूं नको; आणि अहो, माहानाइमांतल्या दूतानो तुम्ही शांतीनें परता; हा दिवस येरूशालेमेच्या पुत्रास पुण्याचा दिवस आहे, त्या (दिवशीं) मी दयेचीं द्वारें उघडीन עוקד והנעקד

शाब्दार्थ असल्यास कित्येक ठिकाणी हें बोलत नाहीं

לבריתך שוכן हे आकाश मडळांत वस्ति क;

---

* ओफान आणि साराफ ह्या दूतांच्या जाती आहेत. × इसहाक.

\+ आब्राहाम, इसहाक व याकोब या तीन ज्योतींतील इसहाक या जोतीवर.

रणाऱ्या, विखरलेल्या आणि पिडलेल्या मंडळीकरितां तुझा करार व शपथ आठीव; (शाब्दार्थ नसल्यास त्यांच्या करण्याची वाणी व गजर ऐक,) (शाब्दार्थ असल्यास त्यांची प्रार्थना ऐक, आणि गजराची आठवण कर;) आणि सीयोनेस असें ह्मण कीं, तुझ्या तारणाचा वेळ जवळ आला आहे, मी इन्नोन * आणि एलिया यांस पाठवीन.

किरयेक ठिकाणीं हें गीताहि बोलतात.

'' המלך हे परमेश्वर राजा, वरील व खालील पदार्थ, ज्यांकडून माझा विश्वास वाढविला जातो त्यांच्या स्वामी, गीताच्या व उत्तराच्या मधुरपणानें (मी स्तवन करितों), आणि अहो त्याचे भक्तहो तुह्मीहि त्यासमोर तुताऱ्यांनी व कर्ण्याच्या शब्दानें गजर करा. בחצרות

हे परमेश्वर राजा, माझ्या विनंतीकडे कान लाव; आणि पूर्वीच्या दिवसांप्रमाणें तूं आपलें घर स्थापून आपलें पवित्र मंदिर लवकर बांध. בחצרות

परमेश्वर राजा, पुस्तकें उघडून सात्विकांचीं, ज्ञान्यांचीं, आणि अति दुष्टांचींहि (कर्मे लिहितो;) परंतु या लोकांस नीतिमान, व शुद्ध (सात्विक) लोकांबरोबर तो मोजील. בחצרות

हे परमेश्वर राजा, त्यागलेले लोकांचें तूं मेंढवळण कर, आणि "त्यांनी हाक मारिल्यापूर्वी मी त्यांस उत्तर देईन" हें तुझें सत्य वचन त्यांवर पूर्ण कर. בחצרות

हे परमेश्वर राजा, उंच (आकाशांत) राहाणाऱ्या, उघडे पडलेल्या, पिडलेल्या, आणि जुलूम करणाऱ्यांच्या हातांकडून लुटलेल्या व नाशिलेल्या लोकाकडे पाहा आणि लक्ष लाव. בחצרות

हे परमेश्वर राजा, तुझ्या सोडून जाण्यापासून लवकर फीर,

* हालामीन लोकांच्या मताप्रमाणें इन्नोन हें नाम ७२ व्या गीतांत मशीयाहास दिल्हें आहे.

मग त्यादिवशीं तुझे लोक सर्व नगरांतून व बुरजांतून एकवट करण्याकरितां मोठा करणा वाजेल, आणि त्यांचे कळप पुनः गणणाऱ्यांच्या हातांकडून पार जातील. בהצרות

हे परमेश्वर राजा, प्रसवतेवेळीं वेदना देणाऱ्या स्त्रीसारिखे दुःखित मनाचे होऊन संकटाचे दिवशीं आम्ही तुला शोधितों पाहा, तारण करण्याविषयीं तुझा हात आखूड नाहीं; आमचें तारण करण्यास त्वरा करून आम्हामध्यें तूं वस्ति कर. בהצרות

हे परमेश्वर राजा, ज्याचीं कामें थोरपणाची व वैभवाचीं आहेत, तूं आपल्या लोकांच्या पापाची व (वाईट) कर्माची क्षमा कर; आणि त्यांच्या वैऱ्यानें व शत्रूनें लादलेलें जोकडाचें ओझें हलकें कर. בהצרות

हे परमेश्वर राजा, भिकाऱ्याप्रमाणें तुझें दार ठोकणाऱ्या तुझ्या लोकांची विनंती तूं ऐक. कारण तुझें वचन असें आहे कीं, त्यांनी हाक मारिल्या अगोदर मी त्यांस उत्तर देईन. בה צרות

हे परमेश्वर राजा, जीवनासाठीं लिहिले जाणाऱ्या यथार्थांच्या नियमाप्रमाणे आम्हासहि जीवनासाठीं लिही; म्हणजे एक मी परमेश्वराचा आहें असी सई करील, आणि दुसरा आपणावर इस्राएल असें अडनाव लावून घेईल. בהצרות

शोफार वाजविणाऱ्यानें उभें राहून हें बोलावें.

בקול שופר יי परमेश्वर विखरलेल्या शेरडांस एकवट करायास करण्याच्या शब्दानें तारण ऐकवील, तेव्हां तारणाचें भविष्य पूर्ण होईल; आणि तेव्हां देव जयनादानें, परमेश्वर करण्याच्या शब्दानें चढेल.*

* चढेल याचा עלה हा इब्री शब्द भूतकाळांत आहे, परंतु मूळ कवीनें त्याचा उपयोग भविष्यकाळांत केला आहे कारण कवितेमध्यें असें करण्यास अगत्य पडतें आणि ते शास्त्रांतील वाक्य आहे म्हणून तें पाळूंहि नये.

עלה אלהים देव जयनादाने, परमेश्वर करण्याच्या शब्दाने चढेल.

परमेश्वर करण्याच्या शब्दाने पवित्र डोंगरावर आणि येरुशालेमेवर आकाशांतून आवाज करील. तेव्हां तुझ्या उजव्या हाताचा रोपा पहिल्या प्रमाणे लावला जाईल. עלה אלהים

परमेश्वर करणा वाजवीत, आणि दक्षणेंतील वावटळींतून जातेसमयीं करणा वाजवून शेवट आणि नेमलेला वेळ कळवील; तेव्हां दुष्टाईचें राज्य नाशाप्रत जाईल. עלה אלהים

हे परमेश्वरा पवित्र डोंगरावर तूं करण्याचा शब्द काढून सीयोनेची वस्ती विस्तारशील; तेव्हां सेईर डोंगर फोडला आणि बसविलेली मेख * उपटली व तोडली जाईल. עלה אלהים

शोफार वाजविल्या अगोदर हीं वाक्यें म्हणावीं, तीं असीं कीं जें वाक्य हाज्ञान म्हणेल तेंच मंडळीने पुनः म्हणावे.

עלה אלהים בתרועה देव जयनादाने, परमेश्वर करण्याच्या शब्दानें चढला. परमेश्वर जो राजा त्यासमोर करण्याच्या शब्दाने तुतान्यानी गजर करा. चंद्र तिथोस व पौर्णिमेस, आमच्या सनाच्या दिवशीं करणा वाजवा. कां तर हा इस्राएलाचा नेम, याकोबाच्या देवाचा ठराव आहे. अहो सर्व लोकहो, तुम्ही टाळ्या वाजवा; हर्ष नादाने देवाजवळ जय शब्द करा. अहो पृथ्वींतले सर्व तुम्ही परमेश्वराजवळ गजर करा. त्याजवळ नवें गायन गा; तुम्ही हर्षनादाने उत्तम प्रकारें वाजवा. अहो पृथ्वींतले सर्व, तुम्ही परमेश्वराजवळ गजर करा, हाक फोडा, आणि हर्ष शब्द काढून कीर्त्तन करा. आणि परमेश्वर त्यांवरती दृष्टीस पडेल, आणि त्याचा तीर विजेप्रमाणे निसटून जाईल; आणि प्रभु परमेश्वर करणा वाजवील, आणि दक्षिणेच्या

* यशाया २२·२५.

वावटुळी सुद्धां चालेल. मग शिंगाचा शब्द वाढून फार मोठा झाला तेव्हां मोशे बोलला, आणि देवाने शब्दें करून त्याला उत्तर दिल्हें. आणि त्यासमयीं असें होईल, कीं मोठा करणा वाजेल, तेव्हां जे अश्शुर देशामध्यें नाशाच्या लागास आलेले ते, आणि मिसर देशांत जे घालविलेले ते येतील, आणि यरूशालेमेंत पवित्र पर्वतावर परमेश्वराला भजतील. अहो जगांतले सर्व लोकानो व पृथ्वींतले राहणारे हो, तो पर्वतावर झेंडा उभारील, तेव्हां पाहा; आणि करणा वाजवील, तेव्हां ऐका.

शोफार वाजविल्यापूर्वीं ही स्तुति करावी.

ברשות מורי ורבותי माझे गुरू व स्वामी यांच्या आज्ञेवरून (मी शोफार वाजवितों).

בָּרוּךְ אַתָּה יי हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, शोफाराची वाणी ऐकविण्याची आज्ञा * आम्हास देऊन पवित्र करणारा जो, तूं धन्य आहेस.

בָּרוּךְ אַתָּה יי हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास या वेळपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोंहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

תשרת תשרת תשרת +
תשת תשת תשת
תרת תרת תרת

शोफार वाजविल्यानंतर मंडळीने तीन वेळा हें बोलावें.

אַשְׁרֵי הָעָם जे लोक उत्साह शब्द जाणतात ते धन्य, हे परमेश्वरा तुझ्या मुखतेजानें ते चालतील. तुझ्या नामानें सर्व दिवस हर्ष करितील, तुझ्या नीतीनें उंच होतील. कांतर तूं त्यांच्या शक्तीचें गौरव आहेस; तुझ्या प्रसन्नतेनें आमचें शिंग

* टीका ९. + टीका १०.

उंच असतें. कारण कीं परमेश्वर आमची ढाल, इस्राएलाचा पवित्र आमचा राजा आहे. कोणतेंहि हत्यार जें तुजविरुद्ध घडलेलें आहे, तें साधणार नाहीं; आणि जी कोणती जीभ तुजसीं वाद करायाला उठेल, तिला तूं अन्यायी ठरविशील, हाच परमेश्वराच्या सेवकांचा विभाग, आणि हेंच मजपासून त्याचें न्यायीपण आहे, असें परमेश्वर म्हणतो. जे परमेश्वरासीं विरुद्ध होतील ते पराभव पावतील, तो आकाशांतून त्यावर गर्जना करील; परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांची न्यायाधिशी करील, आणि तो आपल्या राजाला शक्ति देईल, आणि आपल्या अभिषिक्ताचें शृंग उंच करील.

" יהי חסדך " हे परमेश्वरा! जसी आम्ही तुजवर आशा ठेविली आहे तसी तुझी दया आम्हावर होवो. जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहमीं तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

शाब्बाथ असल्यास एथून बोलावें.

" ברוך " परमेश्वराची स्तुति असो, कांतर जें जें त्याने सांगितलें, त्या सर्वा प्रमाणे आपल्या इस्राएल लोकांस विसांवा दिल्हा; त्याने आपला सेवक मोशे याकडून जें जें सांगितलें त्याच्या त्या सर्व चांगल्या वचनांतली एकहि गोष्ट पडून गेली नाहीं.

इतर दिवस असल्यास एथून बोलावें.

" יהי " אלהינו आमचा देव परमेश्वर आमच्या वडिलांस जसा अनुकूळ होता, तसा आम्हास अनुकूळ व्हावा; त्याने आम्हास टाकूं नये आम्हांस सोडूंच नये. म्हणजे त्याच्या सर्व मार्गांत चालायास आणि त्याच्या आज्ञा व त्याच्या नेमणुकी व त्याचे न्याय, जे त्याने आमच्या वडिलांस आज्ञाकरू-

न लाविले, ते पाळायास त्याने आपल्याकडे आमचें अंतःकरण वळवावें. आणि ज्या शब्दांकडून म्या परमेश्वरा पुढें विनंती केली, ते रात्रंदिवस आमचा देव परमेश्वर याच्या जवळ व्हावे; म्हणजे त्याने आपल्या सेवकास न्याय व आपल्या इस्राएल लोकांचा न्याय दिवसादिवसाच्या प्रसंगाप्रमाणे करावा; यासाठीं कीं, पृथ्वीच्या सर्व लोकांनी जाणावें कीं, परमेश्वर तोच देव, त्यावांचून कोणी देव नाहीं. त्या शास्त्राच्या लेखाने तुझें तोंड न सोडावें; यासाठीं कीं त्यांत जें लिहिलेलें त्यासर्वाप्रमाणे त्वां सांभाळून चालावें; कारण कीं तशाने तूं आपला मार्ग सफल करिशील, आणि तेव्हां सुज्ञपणाने वागसील. म्या तुला आज्ञा दिल्ही कीं नाहीं ? तूं धीर धरून धीट हो; घाबरूं नको, आणि भिऊं नको; कारण कीं जेथें कोठें तूं जासील, तेथें तेथें तुझा देव परमेश्वर तुला अनुकूळ होईल.

हें पुढील वाक्य हाज्जान उंच स्वराने दोन वेळ बोलतो.

ימלוך יי לעולם परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने तुझा देव पिढोपिढीं आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

शास्त्र ठेवायास नेतांना २४ वें गीत बोलतात.

שאו שערים अहो दरवाजे, तुह्मी आपले शिरोभाग उंच करा; सर्वकाळाचीं दारें हो, तुम्ही उंचाविलीं जा; मग गौरवाचा राजा आंत जाईल, हा गौरवाचा राजा कोण ? बळवान व पराक्रमी परमेश्वर, युद्धांत पराक्रमी परमेश्वर तो. अहो दरवाजे आपले शिरोभाग उंच करा; सर्वकाळचीं दारें हो, तुम्ही उंच व्हा; मग गौरवाचा राजा आंत जाईल. जो गौरवाचा राजा हा कोण? सैन्याचा परमेश्वर, तो गौरवाचा राजा आहे. सेलाह. तर तूं हें जाण कीं परमेश्वर जो तुझा देव तोच देव; तो विश्वसनीय देव; जे त्यावर प्रीति करितात व त्याच्या आज्ञा पाळि-

तात, त्यांजवळ तो हजारांच्या पिढी पर्यंत करार पाळून त्यांवर दया करितो. कारण कीं तुमचा देव परमेश्वर कृपाळू देव आहे; तो तुह्मांस सोडणार नाहीं आणि तुम्हाला नाहींसे करणार नाहीं; आणि त्याने तुमच्या पूर्वजांसीं जो करार शपथ वाहून केला त्याला तो विसरणार नाहीं. कां, कीं परमेश्वर म्हणतो, कीं याकोबासाठीं हर्षानें गायन करा, आणि राष्ट्रांतल्या मुख्यांमध्यें गजर करा; वदा, आणि म्हणा हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांस, इस्राएलाच्या शेषास तार.

हेखालाच्या दरवाजापुढें हें बोलतात.

יהללו את שם יי (सर्व पदार्थ) यांनी परमेश्वराच्या नावाला स्तवावें; कारण कीं केवळ त्याचेंच नाव उंच मानायाचें; त्याचें गौरव पृथ्वीवरतीं व आकाशावरतीं आहे. आणि तो आपल्या लोकांचें शिंग उभारितो; त्याचे सर्व भक्त, त्याच्या जवळचा लोक इस्राएलसंताने यांनी स्तवन करावें. तुम्ही परमेश्वराला स्तवा. वर आकाशांत आणि खालीं पृथ्वीवर परमेश्वर तोच देव; परमेश्वर तोच देव; दुसरा नाहीं. हे प्रभु, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोणी नाहीं. आणि तुझ्या कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं

हेखालांत शास्त्र ठेविताना हें बोलतात.

שובה למעונך (हे देवा) तूं आपलें वसतिस्थानाकडे फीर, आणि तुझ्या इष्टमंदिरांत राहणे कर; कारणकीं सर्व तोंडें व सर्व जीभा तुझें गौरव करितील आणि तुझ्या राज्याचें महत्वहि करितील. आणि तो उतरतेवेळेस तो म्हणे, हे परमेश्वरा, इस्राएलाच्या हजारांच्या अयुत्यांकडे फीर. हे परमेश्वरा! आम्हाला तुजकडे फिरीव, ह्मणजे आम्हीं फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

पहिल्यादिवशीं अधिक प्रार्थने अगोदर (मुसाफा अगोदर) हें बोलावें.

אהיה במאמר अनंत देव* कथनांत गौरवयुक्त आहे, त्यांत कांहींच न्यूनता नाहीं; शोभायमान आकाशाच्या सौंदर्यासहि सीमा आहे, परंतु त्यास (देवाला) अंत नाहीं. हे माझ्या बापा, जें पहिलें अर्पण अर्पिलें जाणार, तें आजच होवो; जो सर्वांच्या आदीपासून असणारा माझा बाप, त्याची दया पुष्कळ भयंकर आहे. अगदीं नाशास जाणें हेंहि तुझ्या मोठेपणाच्या आठवणीसारिखें आहे; हें स्तविण्याविषयीं भयंकर, उगा राहिल्यानेंहि तुझी स्तुति होते. अनंत (देव) जीवंत, निश्चल, चांगला, प्रसन्न होणारा व सर्व शक्तिमान आहे; तर विशेष तत्वाकडून सर्व व्यापक जें तत्व, त्याची स्तुति कशी होऊं शकेल! निश्चयें, माझा बापा (माझ्या) तोंडच्या वचनांमुळें (प्रार्थनेमुळें) मजवर कृपा करील, ह्मणून जें त्याचें तेंच मी त्यापुढें आणितों, कारण मी गरीब आहें. माझे अवयवांस (मरणानंतर) राहायास चार हातहि जागा नको; ते माझ्या पुष्कळ ओझ्यामुळें गळून पडतात. वरील आकाशें एकत्र होऊनहि तुला (व्यापूं) शकत नाहीं; यद्यपि मजमधील एका अंधारमय कोठडींत तुला जागा होऊं शकते. हे देवा, करुणा करून आणि प्रसन्नता हातीं धरून तुझ्या आवडत्या उत्पन्न केलेल्या[1] पदार्थांचे शब्द, जरी उणे अथवा अधिक असले, तरी तूं त्यांस वश्य हो. (तूं) जो पहिला व शेवटला, तुझ्या थोर गौरवापुढें मी आपलें डोकें लववून गायन करून तुझें वैभव गाजवीन. जो पवित्र व पवित्र कर्त्ता झरा, यास दया यावी, ह्मणून हे उठविणाऱ्या, व नवीन रूपें करणाऱ्या, तुला मी एकादें लहानसें नवें गीत गातों. ईश्वराचीं सर्व कामें एकत्र होऊन त्याच्या दूतांप्रमाणें त्याचें एकत्व

---

* अनंत देव या शब्दांच्या אהיה या शब्दाचा अर्थ मी असेन असा· होतो, परंतु निर्गम ३·१४ एथें हें ईश्वराचें नाम आहे असें सांपडतें.

मानितात; त्यांचीं सैन्यें आपल्या रीतिप्रमाणे त्याची उपकार स्तुति करितात. जगांतील पदार्थांकडून आम्हासीं बोलणाऱ्या हे खडकरूप आश्रया, मी आपल्या गळ्याने तुला गाईन; हे माझ्या राजा, तुझें स्तवन करण्यासाठीं मी आपली वाणी करण्या प्रमाणे उंचावीन. अशुद्धांस शुद्ध करणें तुझ्या हातीं आहे; म्हणून आम्ही एकत्र होऊन शुद्धतेनें तुला पवित्र मानितों.

दुसऱ्या दिवशीं हें बोलावें.

ארשת שפתינו हे दयाळू बापा, आमच्या ओठांची विनंती तूं ऐक. तोच आम्हावर दया करून आमच्या प्रार्थनेची वाणी व त्याचे लोक इस्राएलाचें घराणे, यांच्या प्रार्थनेची व काकुळतीची वाणी ऐकून तिजकडे आपला कान व लक्ष लावून आम्हास उत्तर देईल; आणि आपल्या कृपेने व प्रसन्नतेनें आम्हास दर्शन देऊन आह्मास उत्तर देईल व आमचा गजर ऐकेल. आणि तुम्ही तथास्तु ह्मणा.

आधिक प्रार्थनेंतील (मुसाफांतील) אדני שפתי मोठयाने बोलल्या अगोदर हें पुढील गीत बोलण्याची चाल आहे.

"שמעתי" हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें.

"חסד ואמת" हे परमेश्वरा, दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत; ह्मणून न्यायाधीश जेव्हां न्याय करायास उठेल, तेव्हां हे परमेश्वरा, तूं आपली दया आवरून धरूं नको; आणि जे तुझें नाम जाणतात, ते तुजवर आशा ठेवितात; कारण कीं, हे परमेश्वरा, जे तुला शोधितात, त्यांस तूं सोडीत नाहींस.

"יושב על כסא" हे परमेश्वरा, आकाशावरील आपल्या माड्यांतील आसनावर बसणाऱ्या, तूं मनुष्यास त्याच्या मार्गाप्रमाणे व त्याच्या गुणाप्रमाणे देतोस; ह्मणून दुष्ट

आपल्या मार्गास, व अन्यायी मनुष्य आपल्या संकल्पास सोडून ईश्वराकडे फिरो.

"ידין אפסי ארץ" परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांचा न्याय करील, आणि त्यापुढें अगणित (मनुष्यें उभीं) राहतील; तेव्हां पृथ्वीचे शेवट जसें करण्याच्या शब्दानें व गजरानें तसे कांपतील, आणि ईश्वराच्या भयामुळें तीं (मनुष्यें) खडकांच्या गुहांत व भुमीच्या बिळांत शिरतील. "

"מגן בעדי" हे परमेश्वरा, मजवर ढाल असणाऱ्या, मी आपलें हाई तुजपुढें ओतितों; पाहा, कीं मला दुःख झालें आणि पापामुळें माझें बळ खचतें; हे परमेश्वरा, मी आपला आत्मा तुझ्या हातीं सोंपितों, तूंच मला खंडून सोडविशील.

"מלכנו" हे परमेश्वरा, आमच्या राजा, तारणाऱ्या उगमांकडून तूंच आमचें तारण करशील; आम्ही जगूं आणि मरणार नाहीं; परमेश्वर देव माझीं अश्रूं पुसून टाकील, आणि मी त्याच्या राहुटींत गजराचें अर्पण करीन; आणि परमेश्वरासाठीं गाईन व कीर्त्तन करीन.

"וכל קרבי" हे परमेश्वरा, मजमधील सर्व अवयव, व माझे सर्व उगम (तुला धन्य म्हणतात); माझ्या जीवानें तुजवर भरंवसा ठेविला; मी आपले डोळे तुजकडे लावितों; जेव्हां त्वां म्हटलें कीं, तुम्ही माझें तोंड शोधा, तेव्हां माझें मन तुला म्हणालें कीं, हे परमेश्वरा, मी तुझें तोंड (शोधीन)

"דרך חקיך" हे परमेश्वरा, तुझ्या नियमाचा मार्ग मला शिकीव; आणि तुझ्या आज्ञांच्या मार्गानें मला चालीव; हे परमेश्वरा, तुझ्या वचनाप्रमाणें तुझी बहुत दया, आणि तुझें तारण मला प्राप्त होऊं दे; मी तुझ्या दयेवर भरंवसा ठेवितों, तुझ्या तारणामुळें माझें ह्रदय आनंदित होईल; मी परमेश्वराला गाईन.

"עיניך" हे परमेश्वरा, तुझी दृष्टी सत्याकडे व सर-

ळ मनुष्यांकडे नाहीं काय ? आणि स्तुति व प्रार्थना ऐकणें हें तुला गुरांपेक्षां अधिक आवडत नाहीं काय? माझे पांय सरळ मार्गीं उभे राहातात, मी सभांमध्यें परमेश्वराला धन्य म्हणेन.

שמע יי परमेश्वर नागव्याची, दीनाची व दरिद्र्याची प्रार्थना ऐकेल; आणि माझ्या जीवाची खंडणी अमोलीक असतांहि तो त्यास नरकापासून सोडवील; हे परमेश्वरा, तुला माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या मनांतील ध्यान मान्य होवो.

אתאנו לחלות आम्ही तुजपुढें प्रार्थना करायास आलों आहों, कारण कीं दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आम्हास लज्जितकरूं नको, आतां आम्हास तुजसमोरून रिकामे परतवूं नको.

אוחילה לאל मी देवाची वाट पाहीन, मी त्याच्या पुढें प्रार्थना करीन; त्यापासून मी जिभेचें उत्तर (वक्तव्व) मागेन, कीं त्याकडून लोकांच्या समुदायामध्यें त्याच्या पराक्रमाविषयीं गाण्यास मी शक्तीमान् होईन; त्याच्या आश्चर्य कृत्यांवरून मी हर्षानें किर्त्तन करीन; मनाचे संकल्प मनुष्याचे; परंतु परमेश्वरा कडून जिभेचें उत्तर आहे.

מוסף
अधिक प्रार्थना.

אדני שפתי हे प्रभु, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा, मोठ्या, पराक्रमी, भयंकर व परात्परदेवा, कृपादानें देणाऱ्या, सर्व पदार्थांच्या धनी, पूर्वजांच्या यथार्थतेची आठवण करणाऱ्या, आणि दयेकरून आपल्या नामाकरितां उद्धारक पाठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

זכרנו לחיים हे जिवनांत आनंद मानणाऱ्या देव राजा! जीवनाकरितां आमची आठवण कर; हे जीवनाच्या देवा, तूं आपणाकरितां आम्हास जीवनाच्या पुस्तकांत लिही. हे जीवंत देवा, तूं राजा, सहायकर्त्ता, तारक, व (आम्हावर) ढालरूप असणारा आहेस. हे परमेश्वरा, आब्राहामाच्या ढालरूप (आश्रया,) तूं धन्य आहेस

אתה גבור हे प्रभु, तूं सर्वकाळ पराक्रमी आहेस! मेलेल्यांस जीवंतकरणारा, तारायास समर्थ, दंहिवर पाडणारा, कृपेने प्राणिमात्रांचें पोषणकरणारा, बहुत दयेने मेलेल्यांस जीवंत करणारा, पडलेल्यांस आश्रय देणारा, रोग्यांस निरोगी करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, आणि धुळींत निजलेल्यांबरोबर आपली सत्यता स्थापन करणारा, तूंच आहेस. हे अद्भुत कर्त्यें करणाऱ्या, तुजसारिखा कोण! आणि हे राजा, मारणाऱ्या, जीवंत करणाऱ्या व तारण उगविणाऱ्या, तुझी बरोबरी कोण करूं शकेल!

מי כמוך हे दयाळू बापा, दयेने प्राणिमात्रांची जीवनाकरितां आठवण करणाऱ्या, तुजसारिखा कोण आहे! आणि मेलेल्यांस जीवंत करणारा तूं सत्य आहेस. हे परमेश्वरा मेलेल्यांस जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

मोठ्याने बोलताना हें बोलतात.

כתר יתנו हे परमेश्वरा, आमच्या देवा, दूतांचीं वरील सैन्यें. खालीं एकवट झालेल्या तुझ्या इस्राएल लोकांसहित तुला मुगुट देतात (तुझा राज्याधिकार मान्य करितात.) आणि तुझ्या भविष्यवाद्या कडून म्हटलेलें जें वाक्य आहे कीं, "तें एकमेकांला मोठ्याने बोलत म्हणाले, पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे;" त्याप्रमाणे ते सर्व एकदांच तीन वेळ तुझी पवित्रता गाजवितात.

ल्याच्या गौरवाकडून सर्व जग भरलें आहे; आणि त्याच्या गौरवाचें स्तवन करावें म्हणून त्याची सेवा करणारे दूत त्याजविषयीं विचारून शोध करितात. त्याच्या समोर जे असतात, ते स्तुति करून असें म्हणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. त्याचे लोक त्यांचें एकत्व मानून जे प्रत्येक दिवशीं सकाळीं व संध्याकाळीं असे दोन वेळा भीतीनें ह्मणतात कीं, हे इस्राएला ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे; त्यांकडे तो आपल्या स्थानांतून दयेनें वळेल.- तोच आमचा देव; तोच आमचा बाप; तोच आमचा राजा; तोच आमचा तारणारा; तोच आम्हास तारील आणि दुसऱ्यावेळीं आम्हास सोडवील; आणि सर्व प्राण्यांच्या दृष्टीपुढें दयेनें असें ऐकवील, कीं पाहा, मी परमेश्वर तुमचा देव तुह्मास देव असा व्हावा ह्मणून पहिल्याप्रमाणें शेवटीं तुह्मास सोडविलें आहे. आणि तुझ्या पवित्र शास्त्रांतहि लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

אתה קדוש तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे; आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात.

לדור ודור पिढोपिढीं तुम्ही देवाचें राज्य मान्य करा; कारण तो एकटाच महान व पवित्र आहे.

ובכן יתקדש यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या इस्राएल लोकांमध्यें तुझें नाम पवित्र मानिलें जावो.

ובכן תן פחדך यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कामांवर आपलें भय, जें सर्व त्वां उत्पन्न केलें आहेस त्यावर आपला त्रास घाल; ह्मणजे सर्व कृत्यें तुला भितील, आणि सृष्टींतील सर्व पदार्थ तुजपुढें नमन करितील, आणि पूर्ण मनानें तुझी इच्छा पूर्ण करण्या करितां ते एक मेळा करि-

तील. कारण आह्मी जाणतों कीं, राज्य तुलाच शोभतें; सामर्थ्य तुझ्या हातीं व पराक्रम तुझ्या उजव्या हातीं आहे; आणि सर्व उत्पन्न केलेले पदार्थांस तुझें नाम भयंकर आहे.

ובכן תן כבוד यास्तव लवकर व आमच्या आयुष्याच्या दिवसांत तूं आपल्या लोकांस मोठेपणा दे, आपल्या भिणाऱ्यांची प्रशंसा कर, आपल्या शोधणाऱ्यांस चांगली आशा व आपली वाट पाहाणाऱ्यांस भरंवसा दे. आपल्या देशास आनंदित कर, आपल्या नगरास हर्षित कर, आपला सेवक दावीद याचें, शिंग उगीव (उभार), आणि इशायाचा पुत्र माशीयाह याचा दिवा सिद्ध (प्रकाशित) कर.

ובכן צדיקים यामुळें पुण्यवान् पाहून आनंद करितील, यथार्थ हर्ष करितील, आणि धार्मिक उल्हासाने गातील; परंतु पापाचें तोंड बंद होईल, दुष्टाई धुराप्रमाणे नाहींसी होईल; कारण दुष्कर्मांचा अधिकार तूं पृथ्वींतून काढून टाकिशील.

ותמלוך אתה मग हे परमेश्वरा, आमच्या देवा, लवकरच तूं आपल्या सर्व कृत्यांवर सियोन डोंगर जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान, आणि येरूशालेम जें तुझें पवित्र नगर, त्यामध्यें लवकरच राज्य करिशील. तुझ्या पवित्र वचनांतहि तसेंच लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुह्मी परमेश्वराला स्तवा.

קדוש אתה तूं पवित्र आहेस, आणि तुझें नामहि भयंकर आहे, आणि तुजवांचून दुसरा कोणी देव नाहीं; आणि लिहिलेंहि तसेंच आहे कीं, सैन्याचा परमेश्वर नीतीनें उंचावेल, आणि देव जो पवित्र त्याला न्यायानें पवित्र मानितील. हे परमेश्वरा पवित्र राजा, तूं धन्य आहेस !

אתה בחרתנו त्वां आम्हास सर्व लोकांतून निवडून घेतलें, आम्हावर प्रीतिकरून व आम्हास प्रसन्न होऊन

सर्व भाषांपेक्षां (जातींपेक्षां) आम्हास उंचाविलें, आपल्या आज्ञांकडून आम्हास पवित्र केलें, हे आमच्या राजा, आपली सेवा करण्याकरितां आम्हास जवळ घेतलें, आणि तुझें मोठें व पवित्र नाम आम्हास दिल्हें आहे.

ותתן לנו आणि हे परमेश्वरा, प्रीतिभावेंकरून तूं आम्हास (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन; गजराचा दिवस (शाब्बाथ असल्यास गजर आठविण्याचा दिवस) जो मिसरांतून निघण्याच्या आठवणी करितां प्रीतिरूप पवित्र मेळा, तो दिल्हा आहेस.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या पापांमुळें आम्ही आपल्या देशांतून पाडाव करून नेले गेलों आणि आमच्या मुलुकापासून दूर केले गेलों आहों; यास्तव नेमून दिल्हेलीं अर्पणें तुजपुढें अर्पायास आम्हास सामर्थ्य नाहीं. हे परमेश्वरा ! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, दयाळू राजा, तुजपुढें असी प्रसन्नता होवो कीं, तूं फिरून आम्हावर आणि आपल्या अत्यंत दयेने आपल्या पवित्र मंदिरावर दया कर; आणि तें लवकर बांधून त्याचें वैभव वाढीव. हे आमच्या बापा, राजा, व देवा, आम्हावर तूं आपल्या राज्याचें गौरव लवकर प्रगट कर; सर्व प्राण्यांच्या देखतां आम्हावर प्रकाशित होऊन थोर मानिला जा; आमच्या विखरलेल्यांस राष्ट्रांमधून जवळ आण; आणि आमच्या परागंदा झालेल्यांस पृथ्वीच्या शेवटापासून एकवट कर. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझें नगर सियोन एथें आम्हास गायन करीत आणि तुझें पवित्र नगर येरूशालेम एथें सर्वकाळाच्या आनंदाने ने. हे परमेश्वरा, मग तेथें नित्याचीं नेमलेलीं अर्पणें त्यांच्या रीतीप्रमाणे आणि अधिक अर्पणें त्यां-

च्या पद्धतीप्रमाणे आम्ही करूं; म्हणजे (शाब्बाथ असल्यास या शाब्बाथ दिवसाचें अधिक अर्पण व) या स्मरणाच्या दिवसाचें, या पवित्र मेळा मिळण्याच्या सुदिनाचें अधिक अर्पण, असीं आम्ही तुजपुढें भीतीनें तुझ्या इच्छेच्या आज्ञां प्रमाणें, जसें तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून आम्हाकरितां तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे, त्या प्रमाणे आम्ही करूं व अर्पूं.

עלינו לשבח पृष्ठ २५

על כן נקוה לך पृष्ठ २५

ונאמר לא הביט און आणि असें म्हटलें आहे कीं, त्यानें याकोबाकडलें अनुचित न्याहाळिलें नाहीं; इस्राएलांतलें दुष्कर्म पाहिलेंच नाहीं; त्याचा देव परमेश्वर त्याला अनुकूळ आहे; आणि त्यामध्यें राजाचा जयजयकार आहे. आणि तो येशुरूनावर राजा होता; जेव्हां लोकांचे अधिकारी व इस्राएलाचे वंश एकत्र मिळाले तेव्हां.

ובדברי קדשך आणि तुझ्या पवित्र वचनांत असें लिहिलें आहे कीं, कांतर राज्य परमेश्वराचें आहे; तोच राष्ट्रांवर अधिकार करितो. आणखी असें म्हटलें आहे कीं, परमेश्वर राज्य करितो; तो उत्कृष्टता ल्यालेला; परमेश्वर ल्यालेला आहे, त्यानें आपल्याला पराक्रम वेष्टिला आहे, आणखी पृथ्वी स्थिर स्थापलेली आहे; ती हालणार नाहीं. आणखी असें म्हटलें आहे कीं, अहो दरवाजे, तुम्ही आपले शिरोभाग उंच करा; सर्वकाळचीं दारें हो, तुम्ही उंचाविलीं जा; मग गौरवाचा राजा आंत जाईल. हा गौरवाचा राजा कोण! बळवान व पराक्रमी परमेश्वर, युद्धांत पराक्रमी परमेश्वर तो. अहो दरवाजे, तुम्ही आपले शिरोभाग उंचकरा; सर्वकाळचीं दारें हो, तुह्मी उंच व्हा; मग गौरवाचा राजा आंत जाईल. जो गौरवाचा रा-

जा हा कोण ? सैन्याचा परमेश्वर, तो गौरवाचा राजा आहे. सेलाह.

ועל ידי עבדיך तुझे सेवक भविष्यवादी यांच्या हातांकडून असें लिहिलेलें आहे कीं, परमेश्वर इस्राएलाचा राजा आणि त्याचा उद्धारणारा सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं मीं पहिला व शेवटलाहि मीं आहें, आणि मजवांचून कोणी देव नाहीं. आणखी असें ह्मटलें आहे कीं, आणि एसावाच्या पर्वताचा न्याय करायाला सियोन पर्वतावर तारणारे चढतील; आणि राज्य परमेश्वराचें असत जाईल. आणखी असें ह्मटलें आहे कीं, आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, आणि परमेश्वर एकच आहे.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, सर्व जगावर तूं आपल्या गौरवाने राज्य कर; आपल्या वैभवाने सर्व पृथ्वीवर थोर मानिला जा; आणि आपल्या सामर्थ्याच्या महत्वाने भूमंडळाच्या राहाणाऱ्यांवर प्रकाशितहो; मग सर्व उत्पन्न केलेले पदार्थ जाणतील, कीं त्वा त्यांस उत्पन्न केलें; सर्व घडिवलेले पदार्थ जाणतील, कीं त्वां त्यांस घडिलें; आणि ज्यांच्या नाकपुड्यांत श्वास आहे, ते ह्मणतील कीं, इस्राएलाचा परमेश्वर देव राज्य करितो; आणि त्याचा अधिकार सर्वांवर चालतो.

קדשנו במצותיך तूं आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्रकर; तुझें शास्त्र आमचें वतन होऊं दे; आपल्या चांगुलपणाकडून आह्मास तृप्तकर; आपल्या तारणाकडून आमचा

जीव आनंदित कर; तुझी सेवा सत्यानें करायास आमचीं मने शुद्धकर; कारण तूं (स्वतां) सत्य परमेश्वर देव आहेस आणि हे आमच्या राजा, तुझें वचन सर्वकाळ सत्य व स्थापित आहे. हे परमेश्वरा सर्व पृथ्वीच्या राजा, (शाब्बाथ असल्यास—शाब्बाथास व) इस्राएलास व स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

एथें कोणी תשרת तीन वेळ वाजवितात

आणि कोणी תשרת.תשת.תרת एकवेळा असे वाजवितात.

היום הרת עולם आजच पृथ्वीनें गर्भ धरिला; आणि आजच जगांतील सर्व घडविलेले पदार्थ न्यायांत उभे केले जातात. जरी तूं आम्हास लेंकरांप्रमाणे अथवा सेवकांप्रमाणे जाणिलेंस (तरी आमचें तारण होईल;) जर आम्हास लेंकरांप्रमाणें जाणसील, तर बापाप्रमाणे आम्हावर दया कर; आणि जर आम्हास सेवकांप्रमाणे जाणसील, तर तूं आम्हावर दया करीस तोंपर्यंत आमचे डोळे तुजकडे लागले आहेत; आणि हे पवित्र (देवा,) आमचा न्याय तूं उजेडांत आण.

אתה זוכר तूं जगांतील कृत्यांचें स्मरण राखितोस आणि पूर्वीच्या घडविलेल्या पदार्थांची पाहाणी करितोस; सर्व गुह्य आणि प्रारंभापासून गुप्त राखलेल्या बहुत गोष्टी तुजपुढें प्रगट आहेत; कारण तुझ्या गौरवाच्या आसनापुढें विस्मरण नाहीं, आणि तुझ्या दृष्टीपुढून काहींच लपलें जात नाहीं तूं सर्व कामांची आठवण ठेवितोस आणि तुजपुढून घडलेले पदार्थांतून कोणताहि दडून राहात नाहीं. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, सर्व पिढ्यांचा शेवट पाहून लक्षांत ठेवणाऱ्या ! सर्व तुजपुढें उघड व प्रगट आहेत. कारण सर्व प्राणी व जीव यांची पाहाणी करण्याकरितां, पुष्कळ कर्मांची व अगणीत गुह्यांची आठवण देण्याकरितां तूं नियम व याद (पुढें) आणिशील. याप्रमाणे तूं

प्रारंभापासून कळविलें आहेस; आणि पूर्वीपासून तें प्रगट केलें आहेस; कीं हा दिवस तुझ्या कृत्यांच्या आरंभाचा आणि पहिल्या दिवसाच्या स्मरणाचा दिवस असा आहे; कांतर हा इस्राएलाजवळ नेम व याकोबाच्या देवाचा ठराव आहे.

ועל המדינות आणि (याचदिवशीं) नगरांविषयीं ठराव विदित केला जातो; ह्मणजे (पुढीलवर्षी कोणत्यावर तरवार व कोणत्यावर समाधान येणार; कोणत्यावर दुष्काळ व कोणत्यावर सुकाळ येणार; हें आजच ठरतें; आणि जीवनाकरितां किंवा मरणाकरितां आठवण व्हावी, ह्मणून सर्व प्राणिमात्रांची आजच पाहाणी होते. आज ज्याची पाहाणी होणार नाहीं असा कोण आहे ? कारण सर्व कृत्यें, मनुष्याचीं कामें व त्यांची वर्त्तणूक; त्याचीं दुष्कर्मे व आचरण; त्याचे विचार व संकल्प यांची आठवण तुजपुढें होते. जो मनुष्य तुला विसरत नाहीं; जो मनुष्यपुत्र तुजवर विश्वास ठेऊन राहातो, तो धन्य; कांतर तुला शोधणारे कधीं गळून पडत नाहीं; आणि तुजवर भरंवसा ठेवणारे कधींच विस्मित होत नाहीं. सर्व घडलेल्या पदार्थांची आठवण तुजपुढें होते; आणि तूं सर्वांचीं कामें शोधितोस. आणि जेव्हां मासमयांचा त्यांच्या कर्मांच्या दुष्टाईमुळें नाश करायास जलप्रलय आणिलास, तेव्हां तूं दयेनें नोहाची आठवण केलीस, आणि तारणाच्या व दयेच्या वचनाकडून त्यास दर्शन दिल्हेंस. यास्तव हे परमेश्वरा, आमच्यादेवा, त्याचें बीज पृथ्वीवरील धूळीप्रमाणें आणि त्याचें संतान समुद्राच्या कांठावरील रेतीप्रमाणें वाढावें ह्मणून त्याची आठवण तुजपुढें होवो; जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे.- आणि नोहा आणि त्याच्या संगती तारवांत जे सर्व पशू त्यांची आठवण देवानें केली; आणि देवानें पृथ्वीवर वारा वाहविला, मग पाणी शमलें. आणखी असें म्हटलें आहे कीं, तसीं देवानें त्यांचीं कण्हणीं ऐकिलीं, आणि देवानें आब्राहामासीं, इस-

इाकासीं, व याकोबासीं जो आपला करार तो आठविला, आणखी असें म्हटलें आहे कीं, आणखी इस्राएलाचीं संताने ज्यांस मिसरी लोक चाकर करितात त्यांचें कण्हणें म्या ऐकिलें, आणि आपला करार आठविला आहे.

ובדברי קדשך तुझ्या पवित्र वचनांत असें लिहिलें आहे कीं, त्याने आपल्या आश्चर्य कृत्यांविषयीं सूचना केली आहे; परमेश्वर कृपाळू व ममताळू आहे. आणखी असें म्हटलें आहे कीं, तो आपल्या भीणाऱ्यांस भक्ष देतो; तो आपला करार सर्वकाळ आठवील. आणखी असे ह्मटलें आहे कीं, आणि त्यांच्यासाठीं त्याने आपला करार आठवून आपल्या मोठ्या दयेप्रमाणे अनुताप केला.

ועל ידי עבדיך तुझे सेवक भविष्य वादी यांच्या हातांकडून असें लिहिलेलें आहे कीं, तूं जाऊन येरुशालेमेच्या कानांत गाजवून सांग, परमेश्वर ह्मणतो, कीं मी तुझ्या तरुणपणाची दया, तुझ्या वाङ्निश्चयाची प्रीति स्मरतों, ज्या त्वां रानांत न पेरलेल्या भूमींत मला अनुसरून केली ती. आणखी असें ह्मटलें आहे कीं, तथापि तुझ्या तरुणपणाच्या दिवसांत जो माझा करार तुजसीं झाला, तो मी स्मरेन, आणि तुजसीं सर्वकाळचा करार ठरवीन. आणखी असेंहि ह्मटलें आहे कीं, काय, एफ्राइम माझा प्रियपुत्र आहे? आणि मनोरम लेंकरू आहे कीं नाहीं? तर मी त्याला बोललों, तेव्हांपासून एव्हांपर्यंत मी त्याला खचीत स्मरतों; याकरितां माझें अंतर्याम त्याविषयीं कळवळतें; निश्चयें त्याजवर दया करीन, असें परमेश्वर ह्मणतो.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या येरुशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो माशीयाह त्याची, आणि तुझे सर्व लोक इस्राएलाचें घराणे यांची आठवण

या (शाब्बाथ असल्यास शाब्बाथ दिवशीं व या) स्मरणाच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या सुदिनीं यशस्वी तारणाकरितां कृपेने, दयेने व ममतेने तुजपुढें चढो, येवो, पोंहोचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो, लक्षांत आणिली आणि आठविली जावो. आह्मावर दया करण्यास व आमचें तारण करण्यास; हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचें कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर; आह्मावर आशीर्वाद होण्याकरितां आह्मास दर्शन दे; आह्मास चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनाने आह्मास राख, आह्मावर कृपाकर, आमची करुणा येऊं दे, आह्मावर दयाकर आणि आह्मास तार, कारण तूंच दयाळू व कृपाळू देव राजा आहेस; ह्मणून आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.

אלהנו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा तुजपुढें चांगल्या आठवणीने आमची आठवण करून पूर्वीच्या आकाशांच्या आकाशांतून दयेच्या व तारणाच्या दर्शनाकडून आह्मास दर्शन दे. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचा बाप आब्राहाम याजबरोबर केलेला करार, त्याजवरील दया व मोरिया डोंगरावर त्याजवळ वाहिलेली शपथ; आणि त्याचा पुत्र इसहाक याचें स्थंडिलाच्या बाजूवर बांधलें जाणे तूं आठीव. आणि जसें त्याने पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां आपल्या दयेस जिंकिलें, तसें तुझ्या दयेने तुझ्या रागास जिंकावें; आणि तुझ्या दयेने तुझ्या न्यायत्वाच्या गुणास अगदीं झांकावें असें कर; आणि आपल्या मोठ्या चांगुलपणामुळें आपल्या लोकांवरून, नगरावरून, देशावरून व वतनावरून आपला राग फिरीव. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा सेवक मोशे याजकडून तूं आपल्या शास्त्रांत आह्मास अभयवचन दिल्हेल्या गोष्टी आमचे प्रत्ययास आण. जसें ह्मटलें

आहे कीं, तर त्यांच्या पूर्वजांसीं जो करार, तो मी त्यांच्या सा-ठीं आठवीन; कांतर त्या पूर्वजांस त्यांचा देव व्हावा ह्मणून त्या राष्ट्रांच्या देखतां मिसर देशांतून काढिलें; मी परमेश्वर आहें.

כי זוכר כל הנשכחות तूं सर्व विसरलेल्या गोष्टींची आठवण करितोस, आणि तुझ्या गौरवाच्या आसनापुढें विस्मरण नाहीं; म्हणून आज इसहाकाचें बांधलें जाणें त्याच्या बीजाकरितां आठीव. हे परमेश्वरा! करार आठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

एथें कोणी תשרת तीन वेळ वाजवितात

आणि कोणी תשרת תשת תרת एक वेळ असें वाजवितात.

היום הרת עולם आजच पृथ्वीने गर्भ धरिला; आणि आजच जगांतील सर्व घडविलेले पदार्थ न्यायांत उभे केले जातात जरी (तूं) आम्हास लेंकरांप्रमाणे अथवा सेवकांप्रमाणे जाणिलेंस (तरी आमचें तारण होईल;) जर आम्हास लेंकरांप्रमाणे जाणसील, तर बापाप्रमाणे आम्हावर दया कर; आणि जर आम्हास सेवकांप्रमाणे जाणसील, तर तूं आम्हावर दया करीस तोंपर्यंत आमचे डोळे तुजकडे लागले आहेत. आणि हे पवित्र (देवा,) आमचा न्याय तूं उजेडांत आण.

אתה נגלית तूं आपल्या पवित्र लोकांशीं बोलण्याकरितां गौरवयुक्त ढगांत प्रगट झालास; तूं आपली वाणी आकाशांतून त्यांस ऐकविलीस; आणि तेजस्वी मेघांतून प्रगट झालास. आणि हे आमच्या राजा! आपल्या लोकांस शास्त्र व आज्ञा शिकविण्यासाठीं जेव्हां तूं सीनाय पर्वतावर प्रसिद्ध झालास, जेव्हां तूं आपल्या वाणीचे गौरव व अग्नीच्या ज्वालांतून आपलीं पवित्र वचनें त्यांस ऐकविलींस; तेव्हां सर्वलोक तुजपुढें कांपले आणि प्रारंभीं उत्पन्न केलेले (पदार्थ) घाबरले. तूं गर्जनेकडून व विजांकडून त्यांजवर प्रसिद्ध झालास, आणि शिंगाच्या वाणीकडून त्यांजवर प्रकाशित झालास. जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं, मग

तिसऱ्यादिवशीं सकाळीं असें झालें कीं, गर्जना, व विजा, व डोंगरावर भारी ढग, आणि शिंगाचा फार मोठा शब्द झाला, यास्तव तळांतील सर्व लोक कांपले. आणखी असें म्हटलें आहे कीं, मग शिंगाचा शब्द वाढून फार मोठा झाला तेव्हां मोशे बोलला, आणि देवानें शब्देंकरून त्याला उत्तर दिल्हें. आणखी असेंहि म्हटलें आहे कीं, तेव्हां त्या गर्जना, व ते जाळ, व शिंगाचा शब्द, व धुरयुक्त डोंगर हीं सर्वलोकांनीं पाहिलीं; यास्तव लोक पाहून पळाले आणि दूर उभे राहिले.

ובדברי קדשך तुझ्या पवित्र वचनांत असें लिहिलें आहे कीं, देव जयनादानें, परमेश्वर करण्याच्या शब्दानें चढला. आणखी असें म्हटलें आहे कीं, परमेश्वर जो राजा त्यासमोर करण्याच्या शब्दानें तुतान्यांनीं गजर करा. चंद्रतिथीस व पौर्णिमेस, आमच्या सणाच्यादिवशीं करणा वाजवा.

הללויה गीत १५०

ועל ידי עבדיך तुझे सेवक भविष्यवादी यांच्या हातांकडून असें लिहिलेलें आहे कीं, आणि त्यासमयीं असें होईल, कीं मोठा करणा वाजेल, तेव्हां जे अश्शुर देशांमध्यें नाशाच्या लागास आलेले ते, आणि मिसर देशांत जे घालविलेले ते येतील, आणि येरूशालेमेंत पवित्र पर्वतावर परमेश्वराला भजतील. आणखी असें म्हटलें आहे कीं, अहो जगांतले सर्वलोकानो व पृथ्वींतले राहाणारे हो, तो पर्वतांवर झेंडा उभारील, तेव्हां पाहा; आणि करणा वाजवील, तेव्हां ऐका. आणखी असेंहि म्हटलें आहे कीं, आणि परमेश्वर त्यावरतीं दृष्टीस पडेल, आणि त्याचा तीर विजेप्रमाणें निसटून जाईल; आणि प्रभु परमेश्वर करणा वाजवील, आणि दक्षिणेच्या वावटळीसुद्धा चालेल. सैन्याचा परमेश्वर त्यांचें निवारण करील; सैन्याचा परमेश्वर तुमचें निवारण करील; सैन्याचा परमेश्वर आमचें निवारण करील.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या मुक्ततेकरितां मोठा करणा वाजीव, आणि आमच्या पाडाव करून नेलेल्यांस एकवट करण्याकरितां झेंडा उभार, आणि तुझ्या गौरवी मुखांतील जें वचन तुझा सेवक मोशे याचा हातांकडून लिहून तूं आपल्या शास्त्रांत आह्मास अभयवचन दिल्हें आहेस तें पूर्ण कर. जसें ह्मटलें आहे कीं, आणि तुह्मी आपल्या हर्षाच्या दिवसांत व आपल्या सणांत व आपल्या महिन्याच्या प्रारंभीं व आपल्या होमाजवळ, व आपल्या शांतिकारक यज्ञाजवळ करणे वाजवा; ह्मणजे ते तुमच्या देवाच्या लक्षांत तुह्माविषयीं सूचक असे होतील; मी परमेश्वर तुमचा देव आहें.

כי שומע קול שופר तूं करण्याची वाणी ऐकितोस, आणि गजराकडे लक्ष लावितोस, आणि तुजसारिखा कोणी नाहीं; ह्मणून हे परमेश्वरा, इस्राएलाच्या गजराची वाण (शा. अ. बोलूं नये आज) दयेनें ऐकणाऱ्या, तूं धन्य आहेस.

एथे कोणी תרת तीन वेळ वाजवितात

आणि कोणी תשרת תשת תרת एकवेळ असे वाजवितात.

רצה יי אלהינו हे परमेश्वरा, आमच्या देवा; तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो; त्यांची प्रार्थना मनावर घे; आपल्या घराच्या प्रसाद स्थानीं पूजन पुनः चालूकर; इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर आवडीनें मान्यकर; आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला आवडो.

ואתה ברחמיך הרבים तूं आपल्या बहुत दयेनें आम्हाविषयीं संतोषित होऊन आम्हास प्रसन्न हो. मग आमचे डोळे तुला कृपेकरून सियोनेकडे फिरताना पाहतील. हे परमेश्वरा ! आपला शेखीना सियोनेमध्यें पुनः स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מודים אנחנו לך सदासर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव जो तूं, तुलाच आम्ही स्तवितों. तूं आमचा व आमच्या जीवांचा खडकरूप आश्रय, व आमच्या तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या हातीं सोंपिलेला आहे, आमचा आत्मा तुझ्या स्वाधीन आहे; तुझे चमत्कार आम्हामध्यें नित्य केले जातात आणि तुझीं आश्चर्य कृत्यें व तुझा चांगुलपणा आह्मी संध्याकाळीं, सकाळीं व दोन प्रहरीं अनुभवितों, त्यांकरितां आम्ही पिढीपिढीं तुझें कीर्त्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया आम्हावरून नाहींसी होत नाहीं; तूं कृपाळू, कारण सर्वकाळ आम्ही तुजवर आशा ठेवितों; म्हणून तुझी कृपा आम्हावरून सरत नाहीं.

מודים דרבנן सदां-सर्वकाळ आमचा परमेश्वर **देव** व आमच्या पूर्वजांचा देव, **सर्व** मांसमयांचा देव, आमचा व **मा**-रंभी (पृथ्वीचा) घडणारा **जो** तूं, तुलाच आम्ही स्तवितों. त्वां आम्हास जीवंत राखिलें व आम्हास रक्षिलें, म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या व पवित्र नामास धन्य म्हणतों व त्याचें स्तवन करितों. आणि आम्ही तुझे नियम पाळावे, तुझी इच्छा पूर्ण करावी आणि पूर्ण मनानें तुझी सेवा करावी; म्हणून (आम्ही विनंती करितों कीं,) त्याचप्रमाणे आम्हास जीवंत राख, आम्हावर दया कर, आणि आपल्या मंदिरीं आमच्या पाडाकरून नेलेल्यांस एकवट कर; कीं यावरून, हे सुवंदित व धन्य देवा, आम्ही तुझी स्तुति करावी.

ועל כלם יתברך हे आमच्या राजा, या सर्व (दयेवरून) तुझें नाम अखंडित व सर्वकाळ धन्य म्हटलें, उंचावलें व वर्णिलें जावो. आणि सर्व प्राणी तुझें स्तवन करोत. सेलाह. तूं आपल्या कराराच्या लेंकरांस चांगल्या जीवनाकरितां लिही.

ויהללו ויברכו मग हे आमच्या तारणाच्या व सहायकारी देवा, आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास सत्यतेने स्तवितील; आणि धन्य ह्मणतील कारण तें चांगले आहे. सेलाह. हे परमेश्वरा ! तूं धन्य आहेस, चांगलें तुझे नाम, आणि स्तवन तुलाच शोभतें.

मोठ्याने बोलताना हें बोलतात

אלהנו ואלהי אבותינו हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा,जो तिप्पट आशीर्वाद,तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून शास्त्रांत लिहिला आहे,आणि जो, आहारोन व तुझे पवित्र लोक त्याचे पुत्र,हे उच्चारित असत, कीं " परमेश्वराने तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वराने आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वराने आपली दृष्टी तुजवर लावून तुझें कल्याण करावें. तसें त्यानी माझें नाम इस्राएलाच्या संतानावर लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन; तो आशीर्वाद तूं आह्मास दे.

שים שלום (हे परमेश्वरा,) आम्हावर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर चांगलें, आशीर्वाद, जीवन, दया, कृपा, यथार्थता व ममता असूं दे. आणि हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आम्हासर्वांस एकमेळीं आशीर्वाद दे; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मास शास्त्र व जीवन, प्रीति व दया, यथार्थता व कृपा, आशीर्वाद व शांति दिल्ही आहेस. आणि आम्हास व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा सामर्थ्य रूप व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें असो.

ואתם הדבקים पृष्ठ २०

ובספר חיים आणि आह्मी व तुझे सर्व इस्राएल लोक हे चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जी-

वनाच्या, आशीर्वादांच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्नसामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होवून लिहिले जावोत.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याण युक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

יהיו לרצון हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडची वाक्यें आणि माझ्या ऱ्हदयांतलें ध्यान मान्य होवो.

אלהי נצור हे माझ्या देवा, माझी जीभ वाईटापासून, आणि माझे ओंठ कपटी भाषणापासून राख. हे माझ्या जीवा, जे कोणी मला शाप देतात, त्यांविषयीं तूं मौन्य धर; आणि माझाजीव सर्वांपुढें धुळीप्रमाणे नम्र होवो. माझ्या जीवानें तुझ्या आज्ञाप्रमाणें चालावें; ह्मणून माझे मन तूं आपल्या शास्त्राकडे उघड (लाव). आणि जे माझ्या वाईटावर उठतात, त्यांचे विचार लवकर मोडून त्यांच्या कुकल्पनाचा नाश कर; असें तूं आपल्या नावांकरितां, आपल्या उजव्या हाताकरितां (पराक्रमाकरितां), आपल्या शास्त्राकरितां व आपल्या पवित्रतेकरितां, तसें कर. तुझा प्रिय मुक्त व्हावा; ह्मणून तूं आपल्या उजव्या हातानें मला तार व मला उत्तर दे. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, व माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या त्दयांतील ध्यान मान्य होवो.

עשה שלום जो उंच (आकाशांत) शांति राखितो, तो दयेनें आह्मास व सर्व इस्राएल लोकांस शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

קדיש תתקבל पृष्ठ ८४

मागें लिहिल्याप्रमाणे קדיש תתקבל बोलताना

त्यांतील תענו बोलल्या अगोदर תשרת תשת תרת हे एक एक वेळ वाजवितात. आणि קדיש תתקבל झाल्यावर वरील प्रकार प्रत्येक तीन तीन वेळ ह्मणजे एकंदर तीस वेळा वाजवितात.

אין כאלהינו आमच्या देवासारिखा कोणी नाहीं; आमच्या प्रभुसारिखा कोणी नाहीं; आमच्या तारणाऱ्या सारिखा कोणी नाहीं. आमच्या देवासारिखा कोण! आमच्या प्रभुसारिखा कोण! आमच्या राजासारिखा कोण! आमच्या तारणाऱ्यासारिखा कोण! आह्मी आपल्या देवाला स्तवूं! आह्मी आपल्या प्रभुला स्तवूं! आह्मी आपल्या राजाला स्तवूं! आह्मी आपल्या तारणाऱ्याला स्तवूं! आमचा देव धन्य; आमचा प्रभु धन्य; आमचा राजा धन्य; आमचा तारणारा धन्य. तूंच आमचा देव; तूंच आमचा प्रभु; तूंच आमचा राजा; तूंच आमचा तारणारा! तूंच आमचें तारण करिशील, तूं उठून सियोनेवर दया करिशील, कारण तिजवर कृपा करण्याचा नेमिलेला वेळ आला आहे.

כל ישראל सर्व इस्राएलांस पुढील जगांत विभाग आहे; जसें ह्मटलें आहे कीं, तुझे सर्व लोक न्यायी होतील; आणि म्या गौरवलेलें व्हावें ह्मणून, जसें माझ्या हाताचें कर्म तसें ते सर्वकाळपर्यंत भूमीचें वतन भोगितील. रिब्बी येहुदा असें ह्मणतो, कीं जो कोणी शास्त्राचा अभ्यास करण्याकरितां श्रम करितो, आणि तेणेंकरून आपल्या उत्पन्न कर्त्याचा आत्मा संतुष्ट करितो, तो कीर्ति मिळवितो, आणि या जगांतून कीर्तीनेच जातो, याजविषयीं शेलोमो आपल्या बुद्धीनें असें ह्मणाला आहे, कीं कीर्ति उत्कृष्ट तेलापेक्षां, आणि एकाद्याच्या जन्म दिवसापेक्षां, त्याचा मरण दिवस चांगला आहे. शास्त्र पुष्कळ शिक; ह्मणजे

तुला त्याचें वेतन पुष्कळ मिळेल. परंतु असें जाण कीं, पुण्यवंतां स वेतन पुढील जगांत मिळतें.

רבי חנניה आकशयाचा पुत्र रिब्बी हानानया असें ह्मणतो कीं, इस्राएलास पुण्यवंत करावें, ह्मणून शास्त्र व आज्ञा वाढवाव्या अशी ईश्वरी इच्छा झाली. जसें ह्मटलें आहे कीं, त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे; तो नेम शास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणे उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्यस्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणे लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्यासर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिले आणि स्तविलें जावो. आणि तुह्मीहि तथास्तु ह्मणा.

על ישראל जे इस्राएल, आमचे गुरु, त्यांचे शिष्य व त्याच्या शिष्यांचे शिष्य या गावीं व गांवोगावीं पवित्र शास्त्राचा अभ्यास करितात, त्यांजवर व आह्मावर आकाश व पृथ्वीच्या स्वामी पुढून दया कृपा व अनुग्रह होवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

יהי שלמא आणि आकाशांतून आह्मास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, अरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत.) आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेनें आह्मास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עלינו לשבח पृष्ठ. २५
על כן נקוה לך पृष्ठ. २५

מנחה.

प्रार्थनारूप नैवेद्य.

למנצח על הגתית गीत ८४
וידבר יי पृष्ठ ३९

एथें פטום הקטרת सुगंधाचा प्रकार बोलण्याची चाल आहे.

וערבה יי तेव्हां जसें पुरातन दिवसांत, आणि जसें पूर्वींच्या वर्षांत, तसें यहुदाचें आणि येरूशालेमेचें अर्पण परमेश्वराला मनोरम होईल.

אשרי יושבי בתיך जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

ובא לציון גואל आणि उद्धारणारा सियोनेस येईल, व याकोबांत जे अपराधापासून फिरतात, त्यांजकडे येईल असें परमेश्वर ह्मणतो. आणि परमेश्वर ह्मणतो, त्यांसीं माझा करार हाच आहे, जो माझा आत्मा तुझ्याठायीं आहे, व जे माझे शब्द म्यां तुझ्या मुखांत घातले आहेत, ते तुझ्या मुखांतून,

अथवा तुझ्या संतानाच्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानाच्या संतानाच्या मुखांतून, आतांपासून सर्वकाळपर्यंत सरणार नाहींत, असें परमेश्वर म्हणतो. तथापि तूं पवित्र इस्राएलांच्या स्तवनांमध्यें राहतोस. आणि ते (दूत) एकमेकाला मोठ्याने बोलत म्हणाले, पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे. आणि त्यांनी एक मत्येकाचा शब्द मान्यकरून म्हणाले, उंच आकाश, जें त्याच्या साक्षात्काराचें प्रतिष्ठित वसतिस्थान तेथें पवित्र; त्याच्या पराक्रमाचें कृत्य जी पृथ्वी, तिजमध्यें पवित्र; तो सदासर्वकाळ पवित्र आहे; तो सैन्याचा देव आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाच्या वैभवाने भरली आहे.* तेव्हां आत्म्याने मला उंचावलें आणि म्या आपल्या पाठीमागून मोठा गोंगाटाचा शब्द ऐकिला, तो असा, कीं त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. तेव्हां आत्म्याने मला उंचललें आणि मी आपल्या मागें स्तुति करणारांचा मोठा सुसाऱ्याचा आवाज बोलतां ऐकिला कीं, ईश्वराचें गौरव त्याच्या महत्वाच्या मंदिराच्या स्थानांतून सुवंदित असो.* परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. परमेश्वराचें राज्य सर्वकाळ स्थापित आहे.* हे परमेश्वरा, आमच्या वडिलांच्या, आब्राहामाच्या, इसहाकाच्या व इस्राएलाच्या देवा, तूं आपल्या लोकांच्या अंतःकरणाच्या कल्पणांतल्या विचारांत असें सर्वकाळ राख आणि त्यांचें अंतःकरण आपल्यासाठीं स्थिर कर. तथापि तो, ममताळु होता, यास्तव त्याने अन्यायाची क्षमा केली, नाश केला नाहीं; त्याने बहुतवेळ आपला राग टाळिला आणि आपला सर्व संताप चेतविला नाहीं. कां तर, हे प्रभु, तूं चांगला व

हीं तीन वाक्यें योनाथान बेन उज्जीएल याने यशाया. ६. ३ येहेजकेल ३. १२ आणि निर्गम. १५ १८ यावा वाक्यांवर केलेले तारगूम भाषेंतील भाषांतर आहे.

क्षमाशील आणि जे तुला हाक मारितात, त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. तुझी नीति सर्वकाळ नीतिच; आणि तुझें शास्त्र सत्य आहे. तूं याकोबासाठीं खरेपण आणि आब्राहामासाठीं करुणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांपाशीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहिलीस ती. प्रभुची स्तुति असो, दिवसोंदिवस तो आह्मास उपकार लादून देतो, तो आमच्या तारणाचा देव आहे. सेलाह. सैन्यांचा परमेश्वर आमच्या संगती आहे; याकोबाचा देव आह्मास आश्रय आहे. हे सैन्यांच्या परमेश्वरा, जो मनुष्य तुजवर आशा ठेवितो, तो धन्य. हे परमेश्वरा, तारण कर; आह्मी हाक मारितों, त्या दिवशीं राजाने आह्मास उत्तर द्यावें.

ברוך אלהינו हे आमच्या देवा, ज्याने आम्हास आपल्या महत्वाकरितां उत्पन्न करून आह्मास भ्रमिष्टांपासून निराळे केलें, आणि आह्मास सत्य शास्त्र देऊन आह्मामध्यें सर्वकाळच्या जीवनाची लागवड केली; तूं धन्य आहेस. तोच आपल्या शास्त्राकडे आमचीं मनें उघडील (लावील;) आणि आह्मी त्याची इच्छा पूर्ण करून त्याची सेवा पूर्ण मनाने करावी परंतु व्यर्थ कष्ट करूं नयेत व गोंधळ उत्पन्न करूंनये; म्हणून तोच आमच्या मनांत आपली प्रीति व आपलें भय घालील. हे परमेश्वरा ! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी या जगीं तुझे नेम पाळून पुढील जगाच्या आयुष्यासाठीं पुण्याईकरून त्यांतील जीवनास व वतनास योग्य व्हावें असी तुझी प्रसन्नता होवो. यासाठीं कीं माझ्या गौरवानें तुझें कीर्त्तन करावें. आणि उगेंच राहूंनये; हे परमेश्वरा माझ्या देवा, मी सर्वकाळ तुझी स्तुति करीत जाईन. त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे; तो नेम शास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील. आणि जे तुझें नाम जाणतात ते तुजवर आशा ठेवितील; कारण कीं हे परमेश्वरा, जे तुला शोधितात, त्यांस तूं सोडीत नाहींस.

हे परमेश्वरा, आमच्या प्रभु, तुझें नाम सर्व पृथ्वींत किती महान ! अहो परमेश्वराचे वाट पाहणारे, तुह्मी सर्व धीर धरा, ह्मणजे तो तुमचें व्हदय सबळ करील.

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

ואני תפלתי परंतु मजविषयीं हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस माझी प्रार्थना केली आहे; हे देवा, तूं आपल्या पुष्कळ दयेने, आपल्या तारणाच्या सत्यतेने मला उत्तर दे.

मग पाहाटेच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणे शास्त्र काढून पुढल्या शनवारीं जो शास्त्राचा भाग वाचायाचा असेल, त्यांतील दाहा वाक्यें वाचायास तीन मनुष्यें उठवावीं. नंतर शास्त्र गुंडाळावें.

מזמור שיר ליום השבת गीत. ९२

शास्त्र ठेवायास नेतांना पाहाटेच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणे יהללו बोलावें.

השיבנו יי हे परमेश्वरा ! आह्माला तुजकडे फिरीव, ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वींप्रमाणे आमचे दिवस नवे कर.

כי לקח טוב कांकीं मी तुह्माला उत्तम विद्या देतों, माझा नेम सोडूं नका. माझी प्रार्थना धूपासारिखी, माझें हात उभारणें संध्याकाळच्या नैवेद्यासारिखें तुझ्या समोर सादर होवो.

קדיש לעילא पृष्ठ ७

אדני שפתי पृष्ठ १३

אבינו מלכנו पृष्ठ ८२

शब्बाथ असल्यास हें बोलावें.

צדקתך כהררי אל तुझी नीति सबळ डोंगरां-सारिखी, तुझा न्याय मोठा समुद्र आहे; हे परमेश्वरा, तूं मनुष्याचें व पशूंचें संरक्षण करितोस. हे देवा, तुझे न्याय फार उंच आहेत; त्वां मोठालीं कामें केलीं आहेस; हे देवा तुजसारिखा कोण आहे ? तुझी नीति सर्वकाळ नीतीच; आणि तुझें शास्त्र सत्य आहे.

קדיש תתקבל पृष्ठ ८४

למנצח על הגתית לאסף गीत ८१

קדיש יהא שלמא पृष्ठ २४

עלינו לשבח पृष्ठ २५

על כן נקוה לך पृष्ठ २५

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

टीका

टीका १

במה מדליקין

हा मिशनांतील एक अध्याय आहे. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे शाब्बाथ दिवशीं अग्नि पेटवूं नये; ह्मणून त्या रात्रीं दिवा विझून अडचण न पडावी, यासाठीं दिव्यांत कशाची वात लावावी आणि कोणतें तेल घालावें हें, व शाब्बाथास आरंभ झाल्या अगोदर कोणत्या गोष्टी करणे अवश्य आहे हेंही त्यांत सांगितलें आहे.

टीका २

סברי מרנן

द्राक्षरसाच्या प्याल्यावर धन्यवाद करितांनां हाज्जान סברי מרנן म्हणजे "आमच्या गुरूच्या मताप्रमाणें" असें म्हणतो व मंडळी त्यास उत्तर करून לחיים म्हणजे "जीवनाकरितां" असें म्हणते. हें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वी अपराधी मनुष्यास जेव्हां धोंडमार करायास नेत; तेव्हां त्यास शुद्धी न राहावी, म्हणून त्यास एक द्राक्षरसाचा प्याला प्यावयास व थोडा ऊद श्वास घेण्यास देत असत. त्यासारिखा हा प्याला मरणाचा नव्हे, परंतु जीवनाचा आहे असा भेद दर्शविण्याकरितां असें म्हणतात.

टीका ३

सुगंधाचा प्रकार

צרי या पदार्थास נטף असेंहि आणखी इब्री नाम आहे. हा पदार्थ या देशांत उत्पन्न होत नाहीं; म्हणून त्यास मराठी नाम सांपडत नाहीं. त्यास "रोगाने बलासान" या आरबी नावावरून ओळखतात. बलासान या नावाचे आणखीहि पदार्थ आहेत, परंतु हा पदार्थ मात्र आरबस्थानाच्या उत्तर प्रांतांकडून येतो.

צפורן या पदार्थास שחלת असेंहि आणखी इब्री नाम आहे; त्यास मराठींत नखी असें म्हणतात, परंतु तो समुद्रांत उत्पन्न होतो; तो शिंपीसारिखा आहे.

חלבנה यास गंधाबेरोजा असें म्हणतात. हा पदार्थ फारकरून राळेसारिखा दिसतो; आणि तो राळेचाच एक प्रकार आहे.

לבונה ऊद; शास्त्रांत निर्मळ ऊद असें लिहिलें आहे, म्हणून कवड्या ऊद असावा.

מור बोळ; म्हणजे तांबडा बोळ.

קציעה तज; या पदार्थामध्यें व दालचीनीमध्यें फारसा भेद नाहीं; कित्येक हे दोन्ही पदार्थ एकच असें मानितात; परंतु तज हा दालचीनीपेक्षां जाड असून सुवासहि थोडा निराळा आहे.

שבלת נרד जटामांशी; या पदार्थाच्या नावावरून असा कांहीं भास होतो कीं, हा पदार्थ केंसांच्या जटांसारिखा असावा, आणि तो काहींसा तसा दिसतो. हें एक प्रकारचें सुगंधी गवत आहे.

כרכם केशर.

קשט कोष्ट; या पदार्थाचें नाव इब्री, इंग्लिश व मराठी या तिन्ही भाषेंत सारखेंच आहे. इंग्लिश भाषेंत त्यास कास्टस असें म्हणतात.

קלופה या पदार्थाची अलीकडे पूर्ण माहिती नाहीं. या आकरा सुगंधाचा प्रकार משנה मधील כריתות या अध्यायांत सांपडतो. याजवर टीका करणारांची या קלופה पदार्थाविषयीं निरनिराळीं मत्तें आहेत. परंतु त्याच्या इब्री नावावरून असें समजून येतें कीं, ती एका सुगंधी झाडाची साल असावी. हा पदार्थ अगरु आहे असेंहि कित्येक मानितात.

קנמון दालचीनी; या पदार्थाविषयीं तज या पदार्थावर केलेले टीकेंत सांगितलें आहे.

टीका ४

מי רגלים

מי רגלים या शब्दाचा अर्थ मूत्र असाहि होतो; परंतु एथें हा अर्थ लागत नाहीं. एथें मेरगलाइम झऱ्याचें पाणी असा अर्थ होतो. हा झरा दोन डोंगराच्या मधील खिंडींतून वाहात होता, ह्मणून त्यास मेरगलाईम ह्मणजे मूत्र झरा असें नाव दिल्हें होतें. या झऱ्याचें पाणी सुगंधी द्रव्यें तयार करण्याच्या कामास उपयोगी होतें. परंतु त्या झऱ्यास मूत्र झरा असें नाव होतें; ह्मणून या अमंगळ नावावरून तें पाणी पवित्र मंदिरांत आणीत नसत.

टीका ५

शास्त्राचे अर्थ समजण्याचे तेरा नियम.

१ מקל וחומר लहान गोष्टीवरून मोठ्या गोष्टी विषयीं; आणि मोठ्यागोष्टीवरून लहान गोष्टीविषयीं अनुमान करणे. लाहान गोष्टीवरून मोठ्या गोष्टीविषयीं अनुमान करणें. उदाहरण. गणना १२. १४, " तिचा बाप तिच्या तोंडावर थुंकलाच (रागें भरला) असता, तर ती सात दिवस न लाजती कीं काय? तिला सात दिवस छावणी बाहेर घालून प्रतिबंध व्हावा आणि मग तिला घ्यावें " यावरून जर बापाच्या रागामुळें सातदिवस छावणी बाहेर राहावें लागतें; तर ईश्वराचा राग झाला असतां, खचितच सर्वकाळपर्यंत त्याच्या लोकांबाहेर राहावें लागेल, असें अनुमान करितां येतें.

मोठ्या गोष्टीवरून लहान गोष्टीविषयीं अनुमान करणे. उदाहरण. उत्पत्ति ४४.८ "जो पैका आम्हास आमच्या गोणीच्या तोंडीं सांपडला, तो आम्ही खनान देशाहून परत आणिला; तर

तुझ्या धन्याच्या घरांतून रुपें अथवा सोनें आम्ही कसें चोरूं ?" जर त्यांनी मोठ्या लाभावर दृष्टी दिल्ही नाहीं, तर खचितच त्यानी अल्प लाभावर दृष्टि दिल्ही नसेल असें अनुमान होतें.

२. מגזרה שוה सारखेपणावरून अनुमान करणें. उदाहरण. लेवीय. २१. ५." त्यांनी आपल्या डोक्यावर टक्कल करूं नये;" आणि अनुवाद. १४.१ (तुह्मी) "मेलेल्यामुळें फांसण्या करून घेऊं नका, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नका." या वाक्यांतील पहिलें उपाध्यांविषयीं मात्र, आणि दुसरें सर्व इस्राएल लोकांविषयीं आहे. या दोंही वाक्यांमध्यें "टक्कल करूं नये" हा सारखेपणा असल्यामुळें, असें अनुमान होतें कीं, जरी इस्राएलांस "दोंही डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नका" असें मात्र सांगितलें आहे; तरीं त्यांनी सर्व डोक्यावर टक्कल करूं नये असें अनुमान होतें. आणखी जरी इस्राएलास मात्र सांगितलें आहे कीं (तुह्मी) "मेलेल्यामुळें आपल्या दोही डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नका" तरी त्या वाक्यांच्या सारखेपणावरून असें अनुमान होतें कीं, उपाध्यानींहि मेलेल्यांमुळें फांसण्याकरून घेऊं नये आणि आपल्या दोही डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नये.

३. מבנין אב וכתוב אחד एका वाक्यांतील मूळ विषय दुसऱ्यास लागू करणें. उदाहरण निर्गम १२.१६ "आणि तुह्मास पहिल्यादिवशीं पवित्र मेळा व सातव्या दिवशीं पवित्र मेळा व्हावा; त्यामध्यें काहीं काम करायाचें नाहीं, केवळ जें प्रत्येक मनुष्याने खावें तें मात्र तुह्मी करावें." परंतु जरी जेवणाचें काम करायास या एका वाक्यांतच आणि पेसाच्या सणाविषयीं मात्र सांगितलें आहे; तरी हा मूळ विषय दुसऱ्या सणाच्या दिवसांसहि लागू आहे.

מבנין אב ושני כתובים दोन वाक्यांतील मूळ

विषय एक मत्येकांस लागू करणें. उदाहरण. लेवीय. २१. १८-२० एथें उपाध्यांस ज्या खोडी नसाव्या त्या सांगितल्या आहेत. आणि २२. २२. एथें अर्पणाच्या गुरांस अथवा शेरडांस ज्या खोडी नसव्या त्या सांगितल्या आहेत. यांतील ज्या उपाध्यांच्या खोडी गुरांविषयीं किंवा शेरडांविषयीं सांगितल्या नाहींत; आणि ज्या गुरांच्या किंवा शेरडांच्या खोडी उपाध्याविषयीं सांगितल्या नाहींत, त्या या नियमावरून एक मत्येकांस लागू आहेत.

४ מכלל ופרט. पहिल्याने मोहोगम पद असून मग विशेष पद असलें, तर विशेष पदाचा मात्र अर्थ धरावा. उदाहरण. लेवीय. १. २. "जर तुमच्यांतला माणूस परमेश्वराला पशूंतल्याचें अर्पण करील, तर तुम्ही आपलें अर्पण गुराचें किंवा शेरडांचें करा." या वाक्यांत पहिल्याने "पशू" हें मोहोगम पद असून मागून "गुरें आणि शेरडें" हीं विशेष पदें आहेत; ह्मणून "गुरें आणि शेरडें" हीच अर्पावीं असा अर्थ होतो.

५. מפרט וכלל जर पहिल्याने विशेष पद आणि मागाहून मोहोगम पद असलें, तर मोहोगम पदाचा अर्थ धरावा. उदाहरण. अनुवाद. २२. ३ "आणि त्याच्या गाढवाविषयीं तसें कर; त्याच्या वस्त्रांविषयीं तसें कर; आणि तुझ्या भावाचें जें कांहीं हरवलेलें म्हणजे त्यापासून गाहाळलेलें असतां तुला सांपडतें, त्याविषयीं तसें कर;" यावाक्यांत पहिल्याने "गाढव आणि वस्त्र" हीं विशेष पदें आहेत; आणि मागाहून जें कांहीं हरवलेलें हें मोहोगम पद आहे; म्हणून सर्व पदार्थांविषयीं तसें करावें; म्हणजे ज्याचें त्यास परत करावें असा अर्थ होतो.

६ כלל ופרט וכלל पहिल्याने मोहोगम पद, मग विशेष पद आणि पुनः मोहोगम पद असल्यास, विशेष पदाप्रमाणें त्याचा अर्थ करावा. उदाहरण. निर्गम २२. ८. "प्रत्येक अपराधा-

च्या गोष्टीविषयीं, गुरांविषयीं, गाढवांविषयीं, शेरडांविषयीं, पांघरूणाविषयीं, कांहीं हरपलेल्याविषयीं, हें आपलें असे कोणी म्हणतों, तर त्याविषयीं दोघांचा वाद न्यायाधीशाजवळ जावा; ज्यास न्यायाधीश अन्यायी ठरवितील, त्याने आपले शेजाऱ्याला दुप्पट मोल भरून द्यावें. "या वाक्यांत पहिल्याने "प्रत्येक अपराधाच्या गोष्टीविषयीं" हें मोहोगम पद मग "गुरांविषयीं, गाढवांविषयीं, शेरडांविषयीं, पांघरूणाविषयीं" हीं विशेष पदें आहेत; आणि कांहीं हरपलेल्यांविषयीं "हें पुनः मोहोगमपद आलें; यावरून गुरं " गाढव, शेरडूं, पांघरूण इत्यादिक, जे हरपण्याजोगे पदार्थ आहेत, त्यांविषयीं मात्र न्यायाधीशांनी चौकशी करावी; ज्यास न्यायाधीश अन्यायी ठरवितील, त्यानें आपल्या शेजाऱ्याला दुप्पट मोलभरून द्यावें. ह्या निवाडा जमीन, चाकर इत्यादिक न हारपण्यासारिखें पदार्थ आहेत त्यांस लागू नाहीं, आणि लेख यांसहि लागू नाहीं; कारण तें प्रमाणासाठीं मात्र असतात.

७ מכלל שהוא צריך לפרט ज्या मोहोगम पदाच्या विशेषपदाचें अगत्य आहे. उदाहरण. निर्गम. १३. २ तूं प्रत्येक ज्येष्ठ, मजसाठीं पवित्र कर. या इब्रीवाक्यांत ज्येष्ठ एवढेंच मात्र आहे यावरून ज्येष्ठ पुत्र अथवा ज्येष्ठ कन्या असल्यासहि देवासाठीं पवित्र करावी असा अर्थ होईल; परंतु तेथें विशेषपदाचें अगत्य आहे, कारण तें ज्येष्ठ पुत्रांविषयीं मात्र म्हटलें आहे.

ומפרט שהוא צריך לכלל ज्या विशेषपदाच्या मोहोगमपदाचें अगत्य आहे. उदाहरण अनुवाद २२. १० "बैल व गाढव एकत्र लावून तूं नांगरूं नको. " या वाक्यांत बैल व गाढव हीं विशेषपदें आहेत; ह्मणून मात्र बैल व गाढव या दोन जातींचीं जनावरें एकत्र लावूं नये असा अर्थ होईल; परंतु तेथें मोहोगमपदाचें अगत्य आहे, कारण त्या वाक्यांवरून असें समजलें पाहिजे, कीं कोणत्याहि दोन जातींचीं श्वापदें एकत्र

लावून नांगरूं नये.

८ ויצא מן הכלל ללמד जें कांहीं मोहोगम पदांत असून विशेषपदांत निराळेंच दाखविलेलें असतें, त्या विशेष पदाविषयीं जें सांगितलेलें असतें, तें त्या विशेषपदाविषयीं मात्र नसतें; परंतु मोहोगमपदासहि तें लागू होतें. उदाहरण लेवीय. २०. २ "जो कोणी आपलें कांहीं संतान मोलेखाला देईल, त्याला मारावेंच मारावें; देशांतल्या लोकांनी त्याला धोंडमार करावा." जीं कामें ईश्वरास ओंगळ असून त्याविषयीं जिवें मारण्याची शिक्षा आहे, त्यांतील हें एक आहे. परंतु "मोलेखाला देईल" हें विशेष पद निराळेंच दाखविलें असून त्याविषयीं "धोंडमार करावा" असें सांगितलें आहे. यावरून धोंडमार करणें हा शिक्षेचा प्रकार, जीं कामें ईश्वरास ओंगळ असून त्याविषयीं जिवें मारण्याची शिक्षा आहे, त्यांसहि लागू होतो.

९ ויצא לטעון טען जें कांहीं मोहोगम पदांत असून पुनः त्या विषयाचा संबंधी सिद्धांत ठरविण्याकरितां निराळें दाखविलें असतें, त्याचा निर्णय भारी होत नाहीं, परंतु हलका होतो, उदाहरण. लेवीय. २४. २१ "जो मनुष्याला मारील, त्याला मारावेंच मारावें; परंतु अनुवाद १९. ५. एथें पुनः त्याच विषयाचा संबंधीसिद्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें आहे, ते असें कीं "जर कोणी लाकडें कापायास आपल्या शेजाऱ्या संगतीं जातो, आणि लाकूड तोडायास आपल्या हातानें कुऱ्हाड मारिताना लोखंड दांड्यांतून निसटून आपल्या शेजाऱ्याला लागून तो मरतो, तर तशानें (आश्रयाच्या) एका नगरांत पळून जाऊन जगावें." पहिलें वाक्य मोहोगम असल्यामुळें जाणून किंवा न जाणून खून करणारा मरावा असा अर्थ होतो. परंतु मागल्या वाक्यांत "लोखंड दांड्यांतून निसटून आपल्या शेजाऱ्याला लागून तो मरतो, म्हणजे न जाणून तो मरतो" हा त्या

विषयाचा संबंधी सिद्धांत ठरविला आहे; म्हणून त्याचा निर्णय भारी होत नाहीं, परंतु हलका होतो; म्हणजे तो न मरावा परंतु त्याने आश्रयाच्या एका नगरांत पळून जावून जगावें.

ו.ל.ט אחד שלא כענינו १०

जें काहीं मोहोगम पदांत असून त्यापासून निराळा सिद्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें असतें, त्याचा निर्णय हलका व भारीहि होतो. उदाहरण. निर्गम. २१.२ "जर तूं इब्री चाकर (म्हणजे पुरुष किंवा स्त्री) विकत घेतोस, तर त्याने साहा वर्षें चाकरी करावी, परंतु सातव्या वर्षी तो फुकट मोकळा व्हावा." परंतु त्याच अध्यायाच्या ७ ओवींत असें आहे कीं "जेव्हां कोणी आपली कन्या चाकरीण होण्यास विकितो, तेव्हां जसे चाकर निघतात तसें तिने न निघावे." यांतील पहिलें वाक्यांत चाकर व चाकरीण या दोहोंविषयीं "चाकर" हे मोहोगम पद आहे. कारण अनुवाद १५.१२. एथेंहि त्या दोघांविषयीं उघडपणें तसेच सांगितलें आहे कीं, "जर तुझा भाऊ इब्री किंवा इब्रीण तुला विकली जाते, तर तशाने तुझी चाकरी साहा वर्षें करावी, मग सातव्या वर्षी तूं त्याला मोकळें करून आपणाजवळून सोड" असें असतां निर्गम २१.७ या वाक्यांत चाकरीणीविषयीं मात्र निराळा सिद्धांत ठरविला आहे. यावरून त्याचा निर्णय हलका व भारीहि होतो, म्हणजे जर तिचा स्वामी मरण पावला, तर ती साहा वर्षें भरल्या अगोदरहि सुटूं शकते, परंतु ती तारुण्यावस्थेंत आल्यावर तिचा स्वामी तिला जाऊं नदेतां तिजशीं लग्नहि करूं शकेल.

ויצא לדון בדבר חדש ११ जें काहीं मोहोगम पदांत असून नवी गोष्ट ठरविण्याकरितां पुनः निराळेंच दाखविलें असतें, त्याविषयीं उघडपणें सांगितल्यावांचून तें पुनः मोहोगम पदांत मोजलें जात नाहीं. उदाहरण. लेवीय २२. ११. जर याजक

कोणाला विकत घेतो, तर तो त्याच्या पैक्याचा माल आहे; आणि त्याने तें (पवित्र पदार्थ) तें खावें; आणि त्याच्या घरीं जन्मलेले यांनीही त्याचें अन्न खावें. या वाक्यांत " घरीं जन्मलेले " असें आहे, म्हणून त्याच्या कन्येने लग्न झालें नसतां व असतांहि तें खावें असा अर्थ होतो. आणि त्याच अध्यायाच्या १२ ओवींत असी नवी गोष्ट ठरविली आहे कीं, याजकाची कन्या जर परक्यांतल्या नवऱ्याला दिल्हेली आहे, तर तिने पवित्र अर्पणांतून खावूंनये; म्हणजे लग्नानंतर कधींच खाऊंनये. परंतु या नियमांत, सांगितल्याप्रमाणें १३ ओवींत तिजविषयीं उघडपणें सांगितल्यावरून ती पुनः मोहोगम पदांत मोजली जाते; म्हणजे ती विधवा झाली असतां, अथवा तिला नवऱ्याने घालविली असतां, आपल्या बापाचे घरीं राहते, तर तिने पवित्र अर्पणांतून खावें.

१२ הלמד מענינו ומסופו मूळ विषयावरून आणि शेवटीं सांगितलेल्या गोष्टीवरून अनुमान करणे.

मुळविषयावरून अनुमान करणे. उदाहरण लेवीय. २१, १२, "आणि (उपाध्याने) पवित्र स्थानांतून जाऊं नये." या वाक्यावरून असा अर्थ होतो कीं, उपाध्याने पवित्रस्थान सोडून कोठें जाऊं नये. परंतु या वाक्याचा मूळ विषय ११व्या ओवींत सांगितला आहे; म्हणजे त्याने कोणतेहि मेलेल्याचे शरिराजवळ जाऊं नये; आपला बाप किंवा आपली आई यांचेहि त्याने विटाळ घेऊं नये. यावरून असें अनुमान होतें कीं त्याने मात्र कोणाचा विटाळ घेण्यासाठीं पवित्रस्थानांतून जाऊं नये.

शेवटीं सांगितलेल्या गोष्टीवरून अनुमान करणे; उदाहरण लेवीय १८.६ " तुम्हांतील कोणीएकाने आपल्या नातलगाचें गुह्य उघडें करायास जवळ जाऊं नये " (म्हणजे कोणत्याहि नातलगाबरोबर लग्न करूं नये,) परंतु मागाहून ज्या ज्या नातलगांबरोबर लग्न करूं नये, त्यांची नावें स्पष्ट सांगितलीं आहेत

म्हणून त्यांखेरीज दुसऱ्या नातलगांबरोबर लग्न करायास अड-थळा नाहीं.

१३ ושני כתובים המכחשים जर दोन वाक्यांचा अर्थ एक प्रत्येका विरुद्ध असला; तर तिसरे वाक्यांव-रून त्याचा अर्थ मिळवून घ्यावा. उदाहरण. उत्पत्ति १.१"प्रारंभीं देवानें आकाश व पृथ्वी यांस उत्पन्न केलें;" या वाक्यावरून पहिल्यानें आकाश व मागाहून पृथ्वी उत्पन्न झाली असें अनुमान होतें; आणि उत्पत्ति २.५"ज्या काळीं परमेश्वर देव यानें पृथ्वी व आकाश यांस उत्पन्न केलें." इ. या वाक्यावरून पहि-ल्यानें पृथ्वी व मागाहून आकाश उत्पन्न झालें असें अनुमान होतें. या दोन वाक्यांचा अर्थ एक प्रत्येकाविरुद्ध आहे; म्हणून यशाया ४८.१३ या तिसऱ्या वाक्यावरुन त्याचा अर्थ मिळवून घ्यावा; तें वाक्य असें कीं, माझ्या हातानें पृथ्वीचा पाया घात-ला, आणि माझ्या उजव्या हातानें आकाशें विस्तारिलीं; म्हणजे आकाश आणि पृथ्वी हीं एकदांच उत्पन्न झालीं.

टीका ६

वर्षप्रतिपदेच्या दिवशीं ईश्वरास नऊ धन्यवाद योजून तितक्याच वेळा करणा वाजवितात, ते धन्यवाद व तें वाजविणें येणेप्रमाणे.

हे नऊ धन्यवाद अधिकप्रार्थनेंत (मुसाफांत) सांपडतात, ते येणेप्रमाणे; १ पृष्ठ १०८ ओळ. ५ हे परमेश्वरा, आब्राहा-माच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस; २. पृष्ठ १०८ ओळ१८ हे परमेश्वरा, मेलेल्यांस जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस; ३ पृष्ठ११० ओळ२४ हे परमेश्वरा, पवित्र राजा, तूं धन्य आहेस; ४ पृष्ठ ११४ ओळ ४ हे परमेश्वरा, सर्व पृथ्वीच्या राजा, (शा. अ. शाब्बाथास व) इस्राएलास व स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस;५ पृष्ठ११८ओळ७ हे परमेश्वरा, करार आठविणाऱ्या, तूं धन्य आहेस;६ पृष्ठ१२० ओळ१४ हे परमेश्वरा,

इस्राएलाच्या नगराची वाणी (शा. अ. आज) दयेनें ऐकणाऱ्या, तूं धन्य आहेस; ७ पृष्ठ १२० ओळ २५ हे परमेश्वरा, आपला शेखीना सियोननेमध्यें पुनः स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस; ८ पृष्ठ १२२ ओळ ४ हे परमेश्वरा, तूं धन्य आहेस; चांगलें, तुझें नाम आणि स्तवन तुलाच शोभतें ९ पृष्ठ १२३ ओळ ४ हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

आणि या दिवशीं शोफार वाजवितात तोहि प्रत्येक नऊवेळा असा वाजवितात; कारण תשרת वाजवितांना शोफार वाजविण्याच्या प्रकारांत सांगितल्याप्रमाणें שברים आणि תרועה एकदांच वाजवितात. तर תשת תשרת किंवा תרת हे प्रत्येक तीनवेळा वाजविल्यास अथवा हे तिन्ही प्रकार एकवेळा वाजविल्यास नऊवेळ होतात.

टीका ७.

हाफतारा म्हणजे भविष्य कथनांतील भाग वाचण्याचें कारण.

शास्त्र वाचल्यानंतर भविष्य कथनांतून जो भाग वाचितात, त्यास הפטרה म्हणजे शेवट असें म्हणतात. आणि तो वाचण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वींपासून शाब्बाथ दिवशीं व सणाच्या दिवशीं शास्त्रांतील भाग अनुक्रमानें वाचण्याची रीति आहे. परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराचा संस्कार झाल्यावर ३४९ व्या वर्षी आरामाचा राजा आनतिओखोस यानें यरुशालेमेवर स्वारी करून तिच्या सभोंवतें तळ धरिला. आणि शाब्बाथ दिवशीं सर्व इस्राएल ईश्वरी भजनांत व धर्म कृत्यांत गुंतलेले पाहून त्यानें हल्ला केला, आणि नगरास आग लावून व लुटून लोकांचा वध केला. याशिवाय त्यानें असी आज्ञा केली कीं, कोणी इस्राएलानें सुंता करूं नये, शाब्बाथ दिवस पाळूं नये आणि शास्त्र वाचूं नये; त्याच्याच देवाचें मात्र भजन करावें. यद्यपि बहुतेक पुरुषांनीं व

स्त्रियांनीं त्या आज्ञा न मानिल्या, आणि आपल्या धर्मावरील दृढ विश्वास दाखविल्यावरून तीं आपल्या जीवास मुकलीं. त्या दुष्टाच्या हातीं ज्या शास्त्राच्या प्रति सांपडल्या, त्या सर्व त्याने फाडून व जाळून टाकिल्या. असें झाल्यावरून इस्राएलांस शाब्बाथ दिवशीं शास्त्र वाचायास न सांपडे असें झालें; म्हणून त्यांनी असे ठरविलें कीं, शाब्बाथ दिवशीं शास्त्राचा जो भाग वाचायाचा असेल; त्यांतील विषयाप्रमाणेच भविष्य कथनांत जो भाग असेल तो वाचावा. हा जुलूम सहन होत नाहीं; म्हणून मतातया मुख्य आचार्य व त्याचे पांच पुत्र यांनीं ईश्वरी नामाचा आवेश धरून त्याशीं लढले व त्याचा पराजय केला.

याप्रमाणें ही भविष्यकथनांतील भाग वाचण्याची चाल पडली आहे. आणि या संकटाची व त्यांतून ईश्वराच्या दयेकरून मुक्त होण्याची सर्वांनी आठवण ठेवावी; म्हणून ती चाल अझून चालू ठेवून शास्त्र वाचल्यानंतर त्याच विषयांसंबंधी भाग भविष्य कथनांतून वाचितात.

टीका ८

आब्राहामाच्या दाहा परिक्षा.

ईश्वराने आब्राहामाच्या दाहा परिक्षा केल्या त्या येणेप्रमाणे. १. त्यास आपली जन्म भूमि व बापाचें घर सोडावें लागलें; २ तो प्रवासी असतां खानान देशांत दुष्काळ पडला, हा दुष्काळ हाखामीम लोकांच्या मतें पृथ्वीवरील पहिलाच व तो त्या देशांत मात्र पडला होता; ३ सारेवर फारोचें धरणें; ४ लोटास केदोरलाओमेराने धरून नेलें, म्हणून त्याबरोबर लढाई करावी लागली; ५ त्याच्या संततीचें दुःख त्यास अगोदरच कळविलें; ६ सुंता करावी लागली; ७ सारेवर आबीमेलेखाचें धरणें; ८ हागारीचें पळून जाणें; ९ इस्माएलास घालविणें; १० इसहाकास अर्पण करणें. येणेप्रमाणे आब्राहामाच्या दाहापरिक्षा शास्त्रांत सांपडतात; परंतु

हाखामीम लोकांच्या मतें, त्याने बापाच्या घरांतील मूर्ति फोडल्या ही पहिली; आणि त्याकरितां त्यास अग्नीच्या भट्टींत टाकिलें ही दुसरी; अशा धरून वर सांगितलेल्या दाहांतील आठ मात्र धरून दाहा पुऱ्या करितात.

टीका ९

वर्ष प्रतिपदेच्या दिवशीं शोफार वाजविण्याचीं कारणें.

रिब्बी सादीयाच्या मतें वर्ष प्रतिपदेच्या दिवशीं शोफार वाजविण्याचीं मुख्य दाहा कारणें आहेत, तीं्येणेप्रमाणें.

१ ईश्वराने जग उत्पन्न करून त्याजवर राज्य करूं लागला त्या उत्पत्तीचा हा पहिला दिवस आहे; आणि राजांस अभिषिक्त करिताना त्यांच्या राज्यास आरंभ होतो, हें सर्वांस कळविण्याकरितां जसे करणे वाजवितात; तसेंच आपला उत्पन्न करणारा हा आपला राजा आहे, हें सर्वांस कळविण्यासाठीं शोफार वाजवितात. जसें दावीदाने म्हटलें आहे कीं, परमेश्वर जो राजा त्यासमोर करण्याच्या शब्दाने तुताऱ्यानीं गजर करा.

२ वर्ष प्रतिपदेचा दिवस पश्चात्तापाच्या दाहा दिवसांतील पहिला आहे; म्हणून जसे मानवीराजे आपल्या कायद्याविषयीं गैरमाहितीचें निमित्त कोणी सांगूंनये, म्हणून ते कायदे जाहीर करितात; तसी शोफार वाजवून सर्वांस असी सुचना केली जाते कीं, त्यानी गैरमाहितीचें काहींच निमित्त नसांगतां ईश्वराकडे फिरून पश्चात्ताप करावा.

३ ईश्वराने आपणास जें शास्त्र सीनाय पर्वतावर देताना शिंगाचा फार मोठा शब्द झाला, त्याची आपणास आठवण व्हावी; आणि परमेश्वराची जी प्रत्येक गोष्ट, ती आम्ही करूं व पाळूं, असें जें आपल्या पूर्वजांनी वचन केलें व त्याप्रमाणे वर्तले, तसें आपणहि त्या शास्त्राप्रमाणे वर्तलें पाहिजे, असें कळविण्यासाठीं शोफार वाजवितात.

४ भविष्यवादी व त्यांचीं वचनें यांविषयीं आपण सावध राहावें, म्हणून शोफार वाजवितात. कारण येहेजकेल ३३. ४ एथें भविष्यवाद्यास करणा वाजविणाऱ्या पाहारे कऱ्याची उपमा दिल्ही आहे, ती असी; जो कोणी करण्याचा शब्द ऐकून सुचना घेत नाहीं, त्याला जर तरवार येऊन घेऊन जाईल, तर त्याचें रक्त त्याच्याच डोईवर राहील. त्याने करण्याचा शब्द ऐकून बोध घेतला नाहीं, त्याचें रक्त त्याजवरच राहील; परंतु जो बोध घेईल तो आपला जीव सोडवील.

५ पवित्र मंदिराच्या नाशाची आणि शत्रूच्या लढाव मनुष्याच्या लढाईकरितां ओरडण्याच्या गजराची आठवण व्हावी ह्मणून शोफार वाजवीत. जसें इर्मेया ४. १९ एथें सांगितलें आहे कीं, कारण त्वां करण्याचा शब्द, लढाईचा गजर ऐकिला आहे. असें आहे ह्मणून आपलें पवित्र मंदिर पुनः बांधलें जावें, म्हणून सर्व शक्तिमान देवाची आपण विनंती करावी.

६ ईश्वराच्या इच्छेस स्वेच्छेने मान्य होऊन अर्पिला जाण्यास सिद्ध झाला जो इसहाक, त्याच्या बंधनाची आठवण करून देवाच्या पवित्रनामाच्या एकत्वास पवित्र मानण्याकरितां आपला जीव देण्यासहि सिद्ध राहावें म्हणून शोफार वाजवितात.

७. जेव्हां आपल्या कानीं करण्याचा शब्द पडतो, तेव्हां आपण भयभीत होऊन परात्पर देवापुढें नम्र व्हावें; ह्मणून शोफार वाजवितात; कारण " करणा नगरांत वाजेल तर लोक भिणार नाहींत काय ? असें आमोस ३. ६ एथें लिहिल्याप्रमाणें या लढाऊ वाद्यांत भय व त्रास उत्पन्न करण्याचा गुण आहे.

८. ज्या मोठ्या व भयंकर न्यायाच्या दिवशीं करणा वाजविला जाणार, त्याची आठवण राहावी ह्मणून शोफार वाजवितात. कारण जफान्या १.१४—१६एथें असें लिहिलें आहे कीं, परमेश्वराचा मोठा दिवस जवळ आहे, तो जवळच आहे, आणि फार

त्वरा करितो, परमेश्वराच्या दिवसाचा शब्द होईल; तेथें वीर कडूपणे ओरडेल. तो दिवस कोपाचा दिवस, पिडेचा व संकटाचा दिवस; उजाडीचा, व ओसाडीचा दिवस; अंधाराचा, व काळोखाचा दिवस; आभाळाच्या काळोखाचा व दाट अधाराचा दिवस होईल; तो गांवकुसवी नगरांवर व उंच दुर्गांवर करण्याचा व आरोळीचा दिवस होईल. ”

९. इस्राएलाचे दूर केलेले एकत्र होण्याच्या वेळेसाठीं प्रार्थना करण्याची आठवण व्हावी, म्हणून शोफार वाजवितात. जसें यशाया २७.१३ एथें ह्मटलें आहे कीं, “ त्यासमयीं असें होईल, कीं मोठा करणा वाजेल, तेव्हां जे अश्शूर देशामध्यें नाशाच्या लागास आलेले ते, आणि मिसर देशांत जे घालविलेले ते येतील, आणि यरूशालेमेंत पवित्र पर्वतावर परमेश्वराला भजतील. ”

१० जे मेलेले ते खचित पुनः उठतील याची आठवण व्हावी, म्हणून शोफार वाजवितात; जसें यशाया १८. ३ एथें ह्मटलें आहे कीं “ अहो जगांतले सर्व लोकांनो व पृथ्वींतले राहाणारे हो तो पर्वतांवर झेंडा उभारील, तेव्हां पाहा; आणि करणा वाजवील, तेव्हां ऐका. ”

टीका १०.

शोफार वाजविण्याचा प्रकार.

शोफार वाजविण्याचा प्रकार असा आहे की ת म्हणजे תקיעה हा एकसारिखा वाजवावा; ש म्हणजे שברים हा तुटक वाजवा, हा वाजवितेवेळीं तीनवेळ तोडावें; ר म्हणजे תרועה हा घोळवून वाजवावा. बहुदा שברים आणि תרועה एकदांच वाजवितात; प्रत्येक दिवशीं एकशें एक वेळा वाजविला पाहिजे; तो असा कीं, मुसाफ ह्मणजे अधिक प्रार्थनेअगोदर तीस वेळा. आणि अधिक

प्रार्थना मोठ्याने बोलतांना היום הרת עולם म्हणजे " आजच पृथ्वीने गर्भ धरिला" असें तीन वेळ लिहिलें आहे; त्यांतील पहिल्यापूर्वीं तीनवेळा תשרת ह्मणजे बारा वेळा; दुसऱ्यापूर्वीं תשת ह्मणजे नऊवेळा; तिसऱ्यापूर्वीं תרת ह्मणजे नऊवेळा; תענו ותעתרו यापूर्वीं תשרת תשת תרת असें दाहावेळा; आणि אין כאלהינו यापूर्वीं पहिल्याप्रमाणें तीसवेळा. कित्येक ठिकाणीं अशी रीति आहे कीं अधिक प्रार्थना मोठ्याने बोलतानां " आजच पृथ्वीने गर्भ धरिला " असें तीनवेळ लिहिलें आहे, त्यापूर्वीं जसें तीनवेळ वाजवितात, तसें अधिक प्रार्थना हळू बोलतांनाहि त्याठिकाणीं त्याचप्रमाणें वाजवितात. आणि प्रार्थना आटोपल्यावर शेवटीं एकवेळ תרועה גדולה वाजवितात.

वर्गणीदारांचीं नावें.

मुंबई.

हासकेलजी आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम··	२
आहारोन आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम	४
एस्तेर बाई दीवेकरां कमोदाना मुकादमा··	२
शीलेमान आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम	२
सीमहाबाई दीवेकरां कमोदाना मुकादमां··	१
दावीद हाईम दीवेकर कमोदान मुकादम··	२
शेमोएल याकोब दीवेकर मेस्त्री··	२
इसाजी पीठाजी नवगांवकर मेस्त्री··	३
दानीएल इसूबजी तालकर दाक्तर··	१
आहारोन दानीएल तलकर	२
याकोब दानीएल तलकर	१
मोशे दानिएल तेलकर··	१
सीमहा बाई तलकरां··	१
येहेजकेल शेमोएल नवगांवकर··	२
बनाजी भाऊजी घोसालकर व त्यांचे मुलगे	४
दावीद शेलोमो बोरघरकर	१
हाईमजी येलोजी झीराटकर	२
हाईम आबाजी मलेकर··	१
शेमोएल सकोजी नवगांवकर··	१
शीमशोन येहेजकेल मजगांवकर··	१
येठुजी दावीदजी आवासकर मेस्त्री	१
येहेजकेल येठुजी आवासकर··	१
मीर्याम बाई आवासकरां	१
मोशे येहेजकेल खंडालकर	१

हाईम दानीएल थलकर ··	१
येहेजकेल शेमोएलजी कुरूलकर	१
इसहाक शालोम नौगावकर ··	१
हाईम आबाजी चरीकर ··	१
तानाजी शेमोएल मल्यानकर मेस्त्री	१
राहामीम तानाजी मल्यानकर ··	१
शिमशोन मोशे दीवेकर ··	१
आब्राहाम धोंडजी चीचोलकर ··	१
बीनयामीन शालोम वालवटकर ··	१
शालोमजी दानीएलजी भास्तेकर ··	१
शेमोएल शालोमजी कुरूलकर ··	१
मोशे येहेजकेल सानकर	१
मोशे राहामीम मलेकर ··	१
याकोब शेलोमो वासकर	१
शालोमजी धोंडजी सारलकर ··	१
शालोम बाळाजी पेझारकर ··	१
शालोमजी शेमोएलजी कुरुलकर दाक्तर ··	१
रऊबेन आब्राहामजी भीनजेकर ··	१
याकोबजी फकीरजी शापुरकर ··	२
रऊबेन हाईमजी आपटेकर ··	१
आहारोन याकोबजी आवासकर ··	१
आब्राहाम राहामीम मलेकर ··	१
शालोम आब्राहाम मोशे हिब्रा ··	१
आब्राहाम येलीएजेर भोरपकर ··	१
योसेफ आबाजी तलकर	१
दावीद याकोब चरीकर ··	१
योसेफ इसहाक तलकर ··	१

शेमोएल दावीद शापुरकर १
शेमोएल याकोब शीरगांवकर १
हाईम इसाजी गालसुलकर २
शेमोएल रऊबेनजी पुगांवकर १
मोशे रऊबेनजी पुगांवकर १
शेमोएल येहेजकेल पेझारकर १
शालोमजी बापुजी थलकर १
येटु पीठाजी आवासकर मेस्त्री १
पीनहास दाद्जी सासोनकर मेस्त्री १
हासकेल इस्रुबजी तलकर व त्यांचे मुलगे २
हाईम शिमशोनजी दीवेकर १
हाईम इस्रुबजी तलकर हावलदार २
आब्राहाम इसाजी गालसुलकर १
शेमोएल शालोमजी आष्टमकर १
शालोमजी शीलेमानजी चेऊलकर सुभेदार १
हासकेल याकोबजी भोरपकर २
शीमशोन शेमोएल दीवेकर २
शेमोएल येलोजी तलकर १
येलीयाहु शेमोएल नौगांवकर १
शालोम दावीदजी तलकर १
येहेजकेल दावीद दीवेकर १
शेमोएल येलीया वरोलकर गब्बाय १
दावीद शेमोएल वरोलकर १
शिमशोन बंदुजी वरोलकर. १
योसेफ आहारोन खुलाबकर १
येलीया योसेफ राजपुरकर हाज्जान १
रऊबेन येलीया राजपुरकर १

मोशे येलीया राजपुरकर	१
आब्राहाम सकोबा पेनकर	१
शालोम सकोबा पेनकर..	१
शेमोएल मोशे किलेकर..	१
राहेल बाई किलेकरीं..	१
रऊबेन शेलोमो नागांवकर मेस्त्री..	२
शीलेमानजी मुसाजी आगरवारकर दाक्तर..	१
आब्राहाम शीलेमानजी उमर्डेकर दाक्तर..	१
शेमोएल राहामीम भोनकर	१
रऊबेन योसेफ गडकर..	१
मोशे बीनयामीनजी पेझारकर..	१
आहारोन इसहाकजी भास्तेकर दाक्तर	१
आब्राहाम आबाजी केहीमकर पंतोजी	१
आहारोन आब्राहामजी केहीमकर	१
दावीद बीनयामीन शापुरकर	१
शालोम बीनयामीन चीचोलकर..	१
शालोम बीनयामीनजी सानकर..	१
रऊबेन इसहाकजी नीगडेकर	१

ठाणे.

मुसाजी बाळाजी उमर्डेकर सुभेदार मेजर बाहादुर.. ..	१
आब्राहाम मुसाजी उमर्डेकर फौजदार	१
हिलेल मुसाजी उमर्डेकर	१

भींवडी.

शिमशोनजी आवासकर जमादार..	१

टिटवाला.

याकोब शेमोएल शीरकोलकर..	१

पनवेल.

याकोब दावीदजी उमर्डेकर	१
दावीद बावाजी मशीलकर	१
मुसाजी बनाजी दीवेकर	१
रऊबेन योसेफजी सानकर	१
योसेफ रऊबेन सानकर..	१
शेमोएल आब्राहामजी तरणखोपकर पंतोजी	१
आब्राहाम शेमोएल तरणखोपकर..	१
शेमोएल शालोमजी चीचोलकर..	१
शेमोएल शीलिमानजी नवगांवकर	१
शेमोएल आलोजी शापुरकर काजी	१
हासाजी बाळाजी शापुरकर काजी	१
आब्राहाम दावीदजी चरीकर	१
आब्राहाम येहेजकेलजी भास्तेकर	१

साय.

बंदुजी आबाजी सायकर हतर	२
आहारोनजी भावजी कोलेटकर..	१
बावाजी येलोजी तलकर	१

चीरनेर.

सकोजी शालोमजी फनसापुरकर	१
येलोबा सामाजी फनसापुरकर..	१

पेण.

शालोम येहेजकेल बेलकर पंतोजी	१
आब्राहाम राहामीमजी पेनकर..	१
बीनयामीन येहेजकेल पेनकर..	१
बीनयामीनजी बापुजी वरवटनेकर जमादार	१
बंदुजी दावीदजी पेनकर हतर..	१

दावीदजी आब्राहामजी खरीलकर	१
शेलोमो येहेजकेल वरसोलकर हावलदार मेजर	१
भीकाजी उर्फ दावीदजी दानीएलजी पेनकर	१
शेलोमो आहारोनजी दीवेकर	१
शेमोएल इसाजी नागांवकर	१
शालोम आहारोनजी दीवेकर	१
रोबेनजी गौरोजी कांदलेकर	१
बंदुजी सामाजी मुलना	१
येहेजकेल सकोजी चांडगांवकर मेस्त्री	१
शालोम योसेफजी पेनकर	१

आलीबाग.

बाळाजी शेमोएलजी भोनकर सुभेदार मेजर	३
शेमोएल बाळाजी भोनकर	२
एस्तेर बाई भोनकरां	१

रेवदंडा.

दावीदजी बावाजी दांडेकर	१
शेलोमो योसेफ राजपुरकर पंतोजी	१
शेमोएल योसेफ राजपुरकर पंतोजी	१
सामाजी बापुजी भोरपकर सुभेदार मेजर बाहादुर	१
हाईमजी सामाजी भोरपकर	१
शेमोएल याकोबजी दांडेकर	१
हीराचंद ऊर्फ रऊबेन बाबाजी ढोकरकर	१
दावीद योसेफजी मलेकर	१
दावीद आबाजी खानावकर	१

बोरलय.

बाळाजी इसूबजी सोगांवकर	१
शालोमजी शीलेमनजी दांडेकर	१

रऊबेन जेबुलुन दांडेकर	१
फकीरजी येलोबा भास्तेकर	१

कोरलय.

येलोजी याकोबजी दांडेकर	१

आष्टमी.

बंदुजी येलोजी आष्टमकर म्हेतर.	१
आहारोन शेमोएल आष्टमकर ह्मेतर	२
आबाजी येलोजी आष्टमकर ह्मेतर	१
आहारोन शीलेमानजी आष्टमकर पंतोजी	१

सीवर्धन.

शालोम शेमोएलजी सायगांवकर	१

पुणे.

याकोब राहामीम तलकर दाक्तर	२
मोशे याकोब तलकर	१
बीनयामीन याकोब तलकर	१
योसेफ याकोब तलकर	१
शीमशोन याकोब तलकर	१
येहेजकेल मोशे नागांवकर दाक्तर	१
आब्राहाम शेमोएल नागांवकर	१
बापुजी याकोबजी भोनकर	१
रऊबेन बापुजी भोनकर	१
शेमोएल दानीएल खरीलकर दाक्तर	१
आहारोनजी शीलेमानजी नागांवकर	१
बंदुजी केहीमकर हावलदार	१

अहमदनगर.

आब्राहाम दावीद चरीकर सुभेदार नेटीव कमांडान्ट	१

बीनयामीन आब्राहाम चरीकर १
शेलोमो आब्राहाम चरीकर १
बापुजी आब्राहामजी वरघरकर सुभेदार.. .. .. १
शालोम बापुजी वरघरकर १

सातारा.

आब्राहामजी आहारोनजी आगरवारकर सरवेर.. .. १
बंदुजी इसाजी भोनकर सुभेदार.. .. .. .. १
हाईम येहेजकेल म्हशीलकर दाक्तर १
बंदुजी याकोबजी किलेकर सुभेदार १
दावीदजी आहारोनजी आगरवारकर ड्राफ्समान १

बेलगांव.

बंदुजी बापुजी भोनकर ड्राफ्समान १

ह्मौ.

इसहाक आब्राहामजी वरघरकर रैटर १

मसावद (जिल्हा खानदेश)

इसहाक आबाजी मेंद्रेकर १

भडोच.

शालोम बीनयामीन वासकर टेलेग्राफ सीगनेलर १

अहमदाबाद.

आब्राहाम बीनयामीनजी येरलकर दाक्तर.. .. .. १

राजकोट.

इसहाक शीलेमानाजी तलकर रैटर १

कराची.

येलीएझेर दानीएल कोलाटकर.. .. .. .. २

हैद्राबाद (सिंद)

रऊबेन येलीया दुदकर.. .. .. २

योसेफ रऊबेन दुदकर..	१
बीनयामीन रऊबेन दुदकर	१
येलीया रऊबेन दुदकर..	१
इसहाक बीनयामीन पेनकर	१
शालोम बंदुजी चरीकर..	१
आब्राहाम दावीद ह्लेडेकर	१
येलीया आहारोन नागोटनेकर..	१

सक्कर.

हाईम शीमशोनजी किलेकर ड्राफ्समान	१

शीकारपुर.

बीनयामीन शीलेमानजी कासुकर दाक्तर	१

आदन.

याकोब आब्राहामजी केहीमकर टौन ओवरसीयर.. ..	२
शेमोएल याकोबजी केहीमकर..	१

रेजींमेंट २ ग्रेनेडीयर.

शीलेमान दावीदजी ह्लेडकर सुभेदार	१
सादीकजी कांदलेकर दाक्तर	१
दानीएलजी शेमोएलजी भोनकर हावलदार..	१
रऊबेनजी आब्राहामजी कोरलेकर	१
हासकेलजी शीलेमानजी वरसोलकर दाक्तर	१

रेजींमेंट ३.

येहेजकेल इसहाकजी जावलीकर सुभेदार मेजर	२
शेमोएल इसहाकजी जावलीकर सुभेदार..	१
हाईमजी हासाजी आवासकर सुभेदार	१
शेमोएल मुसाजी आष्टीवकर जमादार	१

येलोजी दावीदजी चरीकर कलर हावलदार ..	.. १
हासकेलजी सामाजी वासकर कलर हावलदार ..	.. १
शालोमजी शेमोएलजी चरीकर हावलदार रैटर ..	.. १
हाईमजी बापुजी वढांवकर लान्स नाईक	.. १
आब्राहामजी हाईमजी आवासकर	.. १
हासकेलजी सतकोजी इंदापुरकर	.. १
सतकेलजी याकोबजी किलेकर	.. १
दावीदजी म्हेंडेकर	.. १
रऊबेन शालोमजी चरीकर	.. १
इसहाकजी शालोमजी चरीकर दाक्तर	.. १
हासकेलजी हाईमजी बीरवाडकर	.. १
येलीएझेर रऊबेन रोहेकर	.. १
शीलेमानजी सतकेलजी वरोलकर लान्स नाईक ..	.. १
योसेफ येहेजकेल जावलीकर	.. १
बीनयामीन येहेजकेल जावलीकर	.. १
सादीक येलोजी चरीकर	.. १

रेजीमेंट ४ रैफलकोर.

दावीद सकोजी भोरपकर सुभेदार	.. २
दानीएल राहामीम तलकर सुभेदार	.. १
आहारोन दानीएलजी तलकर	.. १
हासकेलजी तलकर हावलदार	.. १
याकोबजी पालकर हावलदार	.. १
शालोमजी इंदापुरकर नाईक	.. १
मुसाजी तलकर बीगलर	.. १
रऊबेनजी उमर्डेकर बीगलर	.. १
शालोमजी घोसालकर	.. १

आब्राहामजी आष्टमकर १
सतकीएलजी नवगांवकर १
रऊबेन दावीदजी भोरपकर १
रऊबेन इसहाकजी वरघरकर १
शालोमजी सीलेमानजी दीघोरकर १

रेजीमेंट ६.

याकोब शेमोएलजी वासकर दाक्तर १
शेलोमो राहामीम तलकर रैटर १

रेजीमेंट ८.

सीलेमान दानीएलजी चरीकर १

रेजीमेंट १०.

शेमोएल मुसाजी नागांवकर सुभेदार १
याकोब येसबा मेंद्रेकर जमादार १
शालोम मोशे नागांवकर स्कुलमास्तर १
शालोम आबाजी खरीलकर १
शालोम याकोबजी खरीलकर १
येहेजकेल शीमशोनजी किलेकर दाक्तर १

रेजीमेंट १२.

येहेजकेलजी बापुजी मलेकर सुभेदार मेजर १
सीमशोनजी येलोजी डांडुलकर सुभेदार १
मुसाजी दानीएलजी कोलेटकर सुभेदार १
मुसाजी बापुजी मलेकर जमादार १
आब्राहामजी गौरोजी तलकर हावलदार १
रऊबेनजी बापुजी मलेकर क्वारटर मास्तर हावलदार .. १
लीयाबाई मलेकरां १

इसाजी धंवाजी सानकर हावलदार	१
सीलेमानजी शालोमजी गरचकर नाईक	१
सीलेमानजी सतकीएलजी कोकबानकर नाईक	१
दावीदजी इसाजी सातामकर लान्स नाईक	१
आब्राहामजी दानीएलजी थलकर लान्स नाईक	१
बनाजी सीलेमानजी भास्तेकर लान्स नाईक	१
जक्राएलजी सीलेमानजी कांदलेकर लान्स नाईक	१
सीमशोनजी शालोमजी शापुरकर	१
शालोमजी सकोजी पेनकर	१
आब्राहामजी शेमोएलजी चरीकर	१
बनाजी सादीकजी भास्तेकर स्कुलमास्तर	१
दानीएलजी बनाजी केहीमकर	१
सतकेलजी याकोबजी बीरवाडकर	१
आब्राहामजी चंदुजी चांडगांवकर	१
शालोमजी सीलेमानजी खांबकर	१
याकोबजी भाऊजी तलकर	१
योसेफजी दानीएलजी कोरलेकर डाक्तर	१
बनाजी मुसाजी तलकर	१

रेजीमेंट १४.

सीलेमानजी बाळाजी झीराटकर सुभेदार मेजर	२
शालोमजी बाळाजी तलकर जमादार	१
येलीएझेर शालोमजी कोलेटकर ड्रील हावलदार	१
शेमोएल शीलेमानजी चीचोलकर कलर हावलदार ..	१
आब्राहामजी आहारोनजी कोलाटकर	१
शेमोएलजी शालोमजी बांबनोलकर	१

रजीमेंट १६.

आहारोनजी शोमोएलजी आष्टमकर सुभेदार १
योसेफ दानीएलजी खरीलकर सुभेदार १
दावीद शेमोएलजी आष्टमकर हावलदार १
इसाजी बावाजी म्हेडेकर हावलदार १
याकोब मुसाजी आवासकर नाईक १
आब्राहाम बीनयामीनजी वरोलकर १
रऊबेनजी शीलेमानजी सोनगांवकर १
रऊबेन योसेफजी पेनकर १

रेजीमेंट १८.

शालोमजी सामाजी कासुकर सुभेदार १
आहारोनजी मुसाजी नागांवकर हावलदार १
दावीदजी दानीएलजी बोरघरकर १
रऊबेनजी बापुजी पालकर १

रेजीमेंट १९.

रऊबेनजी हांसाजी म्हशीलकर जमादार १
शमोएलजी शीलेमानजी उमर्डेकर नाईक १

रेजीमेंट २२.

आब्राहामजी सामाजी शापुरकर जमादार १

रेजीमेंट २३.

हाईमजी शेमोएलजी पेझारकर १

रेजीमेंट २४.

शीमशोनजी शेमोएलजी किलेकर सुभेदार मेजर बाहादर .. १
इसुबजी शीमशोनजी किलेकर हावलदार मेजर १
यलीएझेर शीमशोनजी किलेकर नाईक १
शेमोएल शीमशोनजी किलेकर १

मोशे शीमशोनजी किलेकर १
शेमोएल बापुजी झीराटकर काजी जमादार १
शीलेमानजी दावीदजी कुरूळकर नाईक १

रेजीमेंट २५.

शीलेमानजी दानीएलजी घोसालकर सुभेदार मेजर .. २
बीनयामीनजी नागांवकर हावलदार आर्डरली १
हासकेलजी बापुजी कोलाटकर १
हाईमजी शेमोएलजी पींगले १
शालोमजी बापुजी बांबनोलकर १
येहुदा इसाजी आष्टमकर स्कुलमास्तर १

रेजीमेंट २७.

शेमोएलजी हासकेलजी ढोकरकर हावलदार १
हासकेल इसहाक पुगांवकर दाक्तर १

रेजीमेंट २८.

येलोजी आहारोनजी पेनकर हावलदार १

रेजीमेंट २९.

दानीएल शेलोमो नौगांवकर रैटर १
येलीया शेमोएल शीरकोलकर १

स्यापरस आन्ड मैनरस

हासकेलजी कासुकर १
सकोजी पालकर १

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
३	२५	अनुवाह	अनुवाद
८	७	राजाच्या	राजाचा
११	२०	जेष्ठ	ज्येष्ठ
१६	२१	स्मरणाची	स्मरणाचा
२०	२७	द्ध	शुद्ध
२६	१	गुढगे	गुढघे
३३	१५	आहेस या शब्दापुढें हे परमेश्वरा शास्त्र देणाऱ्या तूं धन्य आहेस.	
४१	१८	मद्य	मध
४६	१८	आभार मानण्याचा यज्ञ व नाजीराचा मेंढा याचा नेम व मूळ ग्रंथांत त्याच्या मागून सांगितलेला शांतिकारक यज्ञाचा नेम सारखाच आहे. शांतिकारक यज्ञ दोन दिवस व एक रात्र खावा एवढा मात्र भेद आहे.	
५४	१८	परमेश्वर राज्य करितो. हे शब्द दोन वेळा.	
५६	१४	आब्राहाम	आब्राम
५८	६	आपले शेतांतील	पलेशेतांतील
८०	१४	पृष्ठ	पृष्ठ १३
९१	१९	असणाऱ्या	असणाऱ्या देवा
१०२	८	नसोडावें,	नसोडावें, तर दिवस व रात्रीं त्वां त्याचें मनन करावें

शूद्धिपत्र.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध.	शुद्ध.
११०	१६	लवकरच तूं	तूं
१२९	५	ואני תפלתי	यापूर्वीं קדיש לעילא
१४१	१	(शा-अ.)	(शा. न)

·התרת נדרים ह्मणजे नवस शपथी इत्यादिकांपासून मोकळे होण्यासाठीं जी प्रार्थना आहे ती, आणि תשליך ह्मणजे वर्षप्रतिपदेच्या दिवशीं समुद्रतिरीं जाऊन करायाची प्रार्थना; या निराळ्या छापल्या जातील.

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधकमंडळीने छापविलेलीं पुस्तकें.

	रु.	आ.	पै.
प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणे	”	१	३
पापाच्या क्षमेसाठी प्रार्थना	”	८	”
इस्राएलांचा लग्नविधि	”	३	”
वर्षप्रतिपदेची प्रार्थना	१	”	”